

# ज्ञान प्रबोधिनी

## वार्षिक वृत्त

**सौर शके १९३२-३३ (इ.स. २०१०-११)**

**(१एप्रिल२०१० ते दि. ३१ मार्च २०११)**

(न्यास नोंदणी क्र. एफ-२५४/पुणे)

पत्ता : ५१०, सदाशिव पेठ , पुणे ३०
दूरभाष क्र. - (०२०) २४२०७०००
फॅक्स - (९१)(०२०) २४४९१८०६
संकेत स्थळ - www.jnanaprabodhini.org
ई-मेल - contact@jnanaprabodhini.org

# ज्ञान प्रबोधिनी, पुणे

**सन्माननीय सदस्य**

| | |
|---|---|
| **डॉ. वसंतराव गोवारीकर** | - माजी कुलगुरु, पुणे विद्यापीठ |
| **श्री. अण्णा हजारे** | - सामाजिक कार्यकर्ते |
| **श्रीमती अनु आगा** | - उद्योजिका |
| **डॉ. रघुनाथ माशेलकर** | - माजी संचालक, CSIR नवी दिल्ली |
| **डॉ. जयंत नारळीकर** | - माजी संचालक, आयुका, पुणे |
| **डॉ. बी. एम्. उद्गावकर** | - माजी शास्त्रज्ञ, TIFR मुंबई |

**पदाधिकारी २०१० - २०११**

| | | |
|---|---|---|
| **अध्यक्ष** | - | वा. वसंतराव गोवारीकर |
| **उपाध्यक्ष** | - | श्री. अण्णा हजारे |
| **कार्याध्यक्ष** | - | वा. प्र. ल. गावडे |
| **उपकार्याध्यक्ष** | - | वा. पद्माकर दुभाषी |
| **संचालक** | - | वा. गिरीश श्री. बापट |
| **कार्यवाह** | - | श्री. वि.शं./सुभाष देशपांडे |
| **सहकार्यवाह** | - | श्री. वि. ध. गुर्जर |

---

## ◆ *ज्ञान प्रबोधिनी कार्यकारी मंडळ २०१०-२०११* ◆

**निर्वाचित सदस्य**

१. वा. प्र. ल. गावडे
२. वा. प. रा. दुभाषी
३. वा. गि. श्री. बापट
४. प्रा. वि.शं. /सुभाष देशपांडे
५. प्रा. वि. ध. गुर्जर
६. प्रा. वा. ना. अभ्यंकर
७. वा. उषाताई खिरे
८. श्री. मोहन चि. गुजराथी
९. श्री. विवेक द. पोंक्षे
१०. वा. सुधाताई कोठारी
११. श्री. महेश आठवले
१२. वा. वि. बा. कुलकर्णी
१३. वा. स्वर्णलता भिशीकर
१४. श्री. रामकुमार राठी
१५. प्रा. महेंद्र सेठिया

**नियुक्त सदस्य**

१६. श्री. मनोज देवळेकर
१७. वा. अनघाताई लवळेकर
१८. श्री. आशुतोष बारमुख
१९. प्रा. हर्षाताई किर्वे
२०. प्रा. मिलिंद नाईक

---

➢ **मुख्य केंद्रे** : पुणे, निगडी, सोलापूर

➢ **उपकेंद्रे** : शिवापूर, वेल्हे, साळुंब्रे (पुणे जिल्हा)
हराळी (उस्मानाबाद जिल्हा)
शिरवळ (सातारा जिल्हा)

➢ **विस्तार केंद्रे** : अंबाजोगाई (बीड जिल्हा),
बोरीवली, डोंबिवली, सांगली

---

• १) ज्ञान प्रबोधिनी संशोधन संस्था २) ज्ञान प्रबोधिनी शिवप्रदेश ३) ज्ञान प्रबोधिनी सोलापूर व ४) ज्ञान प्रबोधिनी आयुर्विज्ञान संस्था या न्यासांचे वृत्तांत स्वतंत्रपणे प्रसिद्ध केले जातात.

# अनुक्रमणिका


◆ **शिक्षण प्रभाग**

| | |
|---|---|
| ज्ञान प्रबोधिनी प्रशाला | ५ - ८ |
| शैक्षणिक उपक्रम संशोधिका | ९ - १० |
| छात्र प्रबोधन | ११ |
| स्पर्धा परीक्षा केंद्र | १२ - १७ |
| नवनगर विद्यालय, निगडी | १८ - २२ |

◆ **संघटन प्रभाग**

| | |
|---|---|
| युवक विभाग | २३ |
| युवती विभाग | २४ - २५ |
| स्त्री शक्ती प्रबोधन | २६ - २७ |
| अंबाजोगाई विस्तारकेंद्र | २८ - २९ |
| बोरीवली विस्तार केंद्र | २९ - ३० |
| डोंबिवली विस्तार केंद्र | ३० - ३१ |
| विस्तार कार्य - रत्नागिरी व अन्य | ३२ |
| नागरी वस्ती अभ्यास गट | ३२ - ३३ |

◆ **ग्रामविकसन प्रभाग**

| | |
|---|---|
| नैसर्गिक संसाधने | ३४ |
| राम-सीता पुराणिक तंत्र निकेतन, शिवापूर | ३५ |
| स्त्री शक्ती प्रबोधन | ३५ |
| महिला विकास | ३६-३७ |

◆ **सीमावर्ती प्रांतांमधील काम**

| | |
|---|---|
| ईशान्य भारत कार्यवृत्त | ३८ |

◆ **मध्यवर्ती कार्यक्रम**

| | |
|---|---|
| वास्तु उद्घाटन | ३८ |
| भगिनी निवेदिता स्मृती शताब्दी कार्यक्रम | ३९ |

◆ **सन्माननीय देणगीदार** ४० - ४३

◆ **पद्य : उपासनेची जोड हवी** ४४


---


ज्ञान प्रबोधिनी
समग्रता

# शिक्षण प्रभाग

## ज्ञान प्रबोधिनी प्रशाला, पुणे

### ➤ विद्यार्थ्यांचे शैक्षणिक व विविध स्पर्धांमधील यश

प्रशालेच्या इ. १०वीचा अंतिम निकाल दि. २८ मे रोजी जाहीर झाला. निकाल १००% लागला. एकूण ८० विद्यार्थ्यांपैकी ४१ विद्यार्थ्यांना ९०% च्या वर गुण मिळाले. तसेच ८० पैकी ६८ जणांना ८०% च्या वर गुण मिळाले. एकूण सरासरी ८७.५% असून १०/१० श्रेण्यांक मिळविलेले विद्यार्थी - विद्यार्थिनी पुढील प्रमाणे : १) ईशान ढेकणे २) हर्षवर्धन जोग ३) रोहित केंजळे ४) तेजस कुलकर्णी ५) विभा नासेरी ६) अनिहा पटवर्धन

महाराष्ट्र प्रज्ञा शोध (MTS) या परीक्षेत कु. व्योम केळकर व कु. दीपक साळुंके हे इ. ९वी तील विद्यार्थी निवडले गेले.

सातवळेकर प्रतिष्ठानतर्फे आयोजित श्री शंकराचार्य रचित स्तोत्र पाठांतर स्पर्धेत प्रशालेतील विद्यार्थ्यांनी चार बक्षिसे मिळविली.

| | | |
|---|---|---|
| कु. सौरीश ढेकणे | प्रथम क्रमांक | (इ. ७ वी) |
| कु. शिवानंद आपटे | द्वितीय क्रमांक | (इ. ७ वी) |
| कु. प्राजक्ता देवधर | तृतीय क्रमांक | (इ. ८ वी) |
| कु. आर्या बर्वे | चतुर्थ क्रमांक | (इ. ८ वी) |

तसेच चित्रकला स्पर्धेत कु. ईशा पाटणकर हिने प्रथम क्रमांक मिळविला.

आनंदाश्रम संस्था आयोजित संस्कृत पाठांतर स्पर्धेत कु. आलोक साठे (इ. ६ वी) याने प्रथम कु. मुक्ता हळबे (इ. ८ वी) व कु. नुपूर कुलकर्णी (इ. ७ वी) यांनी द्वितीय क्रमांक मिळविला.

दै. प्रभात द्वारा आयोजित 'अभ्यास नाट्य' स्पर्धेत इ.९वी मुलींनी प्रथम क्रमांक मिळविला. अभ्यासक्रमातील आशयावर आधारित असे नाटक लेखन व सादरीकरणअपेक्षित होते. 'व्यर्थ न हो मतदान' या नावाचे नागरिक शास्त्रातील आशयावर आधारित नाटक त्यांनी लिहिले व सादर केले.

कु. व्योम केळकर (इ. ९वी) यास राष्ट्रीय प्रज्ञा शोध परीक्षेची (NTS)शिष्यवृत्ती मिळाली.

राष्ट्रीय बाल विज्ञान परिषदेतर्फे आयोजित प्रकल्प स्पर्धेत प्रशालेच्या गटाची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली. प्रकल्पाचा विषय Effect of acid rain on various components of soil हा होता. कु. ईशा पाटणकर (९ वी), कु. इंद्राणी गाडगीळ (इ. ९ वी), व कु. आरोही वैद्य (इ. ९वी) या विद्यार्थिनींनी या स्पर्धेत भाग घेतला.

पुणे जिल्हा गणित अध्यापक मंडळातर्फे आयोजित 'कापरेकर जलद आकडेमोड' स्पर्धेत कु. अनिकेत गांधी (इ. ७ वी) यास तृतीय क्रमांक मिळाला.

पुणे जिल्हा गणित अध्यापक मंडळ व रोटरी क्लब तर्फे आयोजित Mathematics Olympiad Quiz Competition या स्पर्धेत मोठा व लहान या दोन्ही गटास तृतीय क्रमांक मिळाला.

Indian Institute of Scientific Education and Research यांच्यातर्फे आयोजित प्रश्न मंजूषा स्पर्धेत प्रशालेच्या इ. १०वी च्या विद्यार्थ्यांनी जिल्हास्तरावर प्रथम क्रमांक मिळविला.

बालविकास प्रबोधिनी व Creative Foundation तर्फे आयोजित आंतरशालेय गीत-नृत्य महोत्सवात प्रशालेच्या इ. १०वी तील नऊ विद्यार्थिनींच्या गटाने प्रथम क्रमांक मिळविला.

Institute for Promotion of Mathematics या संस्थेतर्फे आयोजित 'जैन स्कॉलरशीप' प्रशालेच्या सहा विद्यार्थ्यांना मिळाली. १) कु, सामिका समेळ, २) कु. कल्याणी मराठे, ३) कु, पूर्वा गुर्जर, ४) कु. पूर्वा अंतापूरकर, ५) कु. प्रणव माणकीकर, ६) कु. विजय कहाळेकर (इ. १० वी).

प्रशालेचा गुणविकास योजना (इ. ७ वी) व छात्र प्रबोधन दिवाळी अंकाच्या विक्रीचा (इ. ५ वी ते ७ वी) बक्षिस समारंभ दि. १७ डिसेंबर रोजी संपन्न झाला. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून माननीय महेंद्रभाईंनी मार्गदर्शन केले. गुणविकास योजनेची शिष्यवृत्ती मिळालेल्या विद्यार्थी-विद्यार्थिनींची नावे हह्ह इ. ७वी (२००९-१०) आर्या बर्वे, सई भालेराव, अनुपमा जोशी, प्रज्ञा साबळे, अस्मिता देशमुख, सोहम रास्ते, प्रणव कुलकर्णी, संविद कुर्लेकर, तुषार जोशी, सोहम कटारिया

छात्र प्रबोधन मासिकाची सर्वात जास्त नोंदणी करणाऱ्या पुढील विद्यार्थ्यांचे बक्षिस देऊन कौतुक करण्यात आले - ऋत्विक कडू (इ. ५ वी), अलोक साठे (इ. ६ वी), विभा बापट (इ. ६ वी), वरदा रूईकर (इ. ७ वी).

### ➤ नवीन शैक्षणिक प्रयोग

प्रभुत्व अध्ययन या संकल्पनेवर आधारित इंग्रजी तसेच गणित अध्यापनाची स्तरीय पद्धत या वर्षीपासून राबविण्यात येत आहे. यामध्ये इंग्रजी व गणित या विषयांवरील किमान प्रभुत्व प्राप्त करण्यासाठी ज्यांचा प्रभुत्वाचा स्तर एकसमान आहे, अशा इ. ५वी ते ८ वीतील विद्यार्थ्यांना एकत्र करून त्यांना त्यांच्या स्तरापासून सुरुवात करून हळूहळू वरील स्तराकडे नेण्याचा प्रयत्न केलेला आहे. यासाठी श्रेणीबद्ध अभ्यासक्रम राबविण्यात येत आहे. या प्रयोगाचा फायदा विद्यार्थ्यांमधील अभिवृत्ती, अभिरुची व विशेष क्षमता जाणून घेण्याकरिता तसेच मागे पडणाऱ्या विद्यार्थ्यांचे किमान संकल्पनांचे शिक्षण, असा होतो. यातून विद्यार्थ्यांना

एकजिनसी गटात आणून त्यांचा अभ्यासक्रमातील आत्मविश्वास वाढविणे हा मुख्य हेतू आहे. अध्यापकांनाही अशा एकजिनसी गटात शिकविणे सोपे जाते. यामध्ये गटाचा स्तर एकसारख्या प्रमाणात उंचावणे हे अपेक्षित आहे. दर सहा महिन्यांनी त्यांची चाचणी घेतली जाते आणि किमान ७५% गुण मिळालेल्या विद्यार्थ्यांना पुढील स्तरामध्ये घातले जाते.

### ➢ सर्वंकष निरंतर मूल्यमापन

२००९-२०१० या शैक्षणिक वर्षाचा वार्षिक निकाल सर्वंकष निरंतर मूल्यमापन CCE (Continuous Comprehensive Evaluation) ह्या पद्धतीनुसार इ. ५ वी ते १० वी च्या सर्वच विद्यार्थ्यांना देण्यात आला. ह्या निकालाचे वैशिष्ट्य म्हणजे विद्यार्थ्यांचे फक्त परीक्षेतील गुणांवर मूल्यमापन न करता ते विद्यार्थ्यांमधील सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने आवश्यक असलेल्या गुणांच्या आधारावर करण्यात आले. उदाहरणार्थ, वकृत्व, प्रकल्प, गणेशोत्सवातील सहभाग, पालखी, शिबिरे, सहाध्यायदिन, विक्री कौशल्ये इ.

थोडक्यात, वार्षिक परीक्षेनंतर दिलेल्या निकालामुळे विद्यार्थ्यांची कोणत्या कौशल्यात प्रगती झाली, त्यांची बलस्थाने कोणती, इ. गोष्टी पटकन लक्षात आल्या.

### ➢ व्याख्याने

दि. २१ जून रोजी प्रशालेचा माजी विद्यार्थी लेफ्ट. मयुरेश बारभाई याचे इ. ८ वी ते १०वी च्या विद्यार्थ्यांसमोर 'सैन्य दलातील संधी' या विषयावर व्याख्यान झाले.

दि. १० जुलै रोजी महाराष्ट्र बाल विज्ञान परिषद झाली. या परिषदेत 'Land as a source' या विषयावर वा. केतकी घाटे, वा. स्वाती गोळे व प्रा. संजीव नलावडे यांची मार्गदर्शनपर व्याख्याने झाली.

दि. १३ जुलै रोजी अध्यापक बैठकीत मा. यशवंतराव लेले यांनी 'वर्षारंभ' या संस्कारावर व्याख्यान दिले.

दि. १० ऑगस्ट रोजी मा. अनंतराव अभंग यांचे अध्यापक बैठकीत 'स्त्री शक्ती प्रबोधन' या विषयावर व्याख्यान झाले.

दि. १४ डिसेंबर रोजी अध्यापक बैठकीत वा. नलूताई गुजराथी यांनी भगिनी निवेदितांच्या चरित्राची थोडक्यात मांडणी केली. भक्ती, सेवा, क्रांतिकारक विचार व हिंदू धर्मासाठी केलेले योगदान यावर त्यांनी मांडणी केली.

### ➢ कार्यक्रम

**वर्षारंभ समारंभ :** प्रशालेचा वर्षारंभ समारंभ दि. २४ जुलै रोजी झाला. लहान गटाला मा. मिलिंदराव नाईक व मोठ्या गटाला नगरसेविका सौ. मुक्ता टिळक यांनी मार्गदर्शन केले.

### ➢ गणेशोत्सव

दि. ११ ते १९ सप्टेंबर मध्ये प्रशालेत गणेशोत्सव साजरा करण्यात आला. या कालावधीत इ. ५ वी ते ७ वी च्या गटासाठी लेखन, चित्रकला, हस्ताक्षर व पद्यगायन स्पर्धा आणि इ.८ वी ते १० वी च्या विद्यार्थ्यांकरिता देशप्रश्नविषयक व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली होती. त्यासाठी 'प्रश्नस्पर्धा' आयोजित केली होती. चांगल्या प्रश्नांना वैयक्तिक बक्षिसे व जास्त जास्त प्रश्न विचारणाऱ्या वर्गालाही बक्षिस ठेवले होते. या कालावधीत पुढीलप्रमाणे व्याख्याने झाली :

| | | |
|---|---|---|
| १३ सप्टेंबर | नक्षलवाद | श्री. समीर माटेकर<br>कु. निधी शर्मा<br>श्री. अनिरुद्ध ढगे |
| १४ सप्टेंबर | ऊर्जा प्रश्न | श्री. संतोष गोंधळेकर |
| १६ सप्टेंबर | भारत-चीन आर्थिक तुलना | श्री. पराग कुलकर्णी |
| १७ सप्टेंबर | अस्वस्थ पूर्वांचल | श्री. आशिष भावे |
| १८ सप्टेंबर | मराठी बाणा | श्री. श्रीकांत मोघे |

### ➢ विद्याव्रत संस्कार

इ. ८ वी मुले व मुली यांच्यासाठी विद्याव्रत संस्काराबाबत मनोभूमिका तयार करण्यासाठी दि. ६ ते १८ जानवारी दरम्यान झालेल्या व्याख्यानमालेत प्रास्ताविक (मा. भाग्यश्रीताई हर्षे), शारीरिक विकसन (आनंद लुंकड, आरतीताई साठे), मानसिक विकसन (मा. शरदराव सुंकर), बौद्धिक विकसन (मा. मिलिंदराव नाईक), सामाजिक विकसन (वा. अनघाताई लवळेकर) व आत्मिक विकसन (मा. सुभाषराव देशपांडे) या विषयांवर व्याख्याने झाली. विद्याव्रत पूर्वतयारी शिबिर श्री. सद्‌गुरु नारायण महाराज यांच्या बेट-केडगाव येथे घेण्यात आले. मुलींसाठी दि. २९ जानेवारी ते १ फेब्रुवारी तर मुलांसाठी दि. १ ते ५ फेब्रुवारी या काळात हे शिबिर झाले. विद्याव्रतींनी पाळावयाच्या आदर्श दिनक्रमाबरोबरच शिबिरात प्रबोधिनीचे चार आदर्श पुरुष तसेच भगिनी निवेदिता यांच्या चरित्रांची कथने झाली. त्याचबरोबर त्यांनी केलेल्या लेखनाचे, विद्याव्रत व दैनंदिन उपासना पोथीचे स्वयंअध्ययन केले. विविध विषयावर गटचर्चा, नाट्यसादरीकरण, अभंग गायन, खेळ इ. सत्रांचा समावेश होता. मा. प्राचार्य विवेकराव पोंक्षे यांनी दोन्ही गटांना 'राष्ट्र अर्चना' या विषयावर व्याख्यान दिले व विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना उत्तरे दिली. याशिवाय प्रा. मिलिंदराव नाईक, प्रा. भाग्यश्रीताई हर्षे, प्रा. मृदुलाताई पाठक, श्री. नचिकेत नित्सुरे यांनी मार्गदर्शन केले.

दि. १२ फेब्रुवारी रोजी इ. ८ वी मुलींच्या विद्याव्रत संस्कारासाठी श्री. ताराचंद गोरोवाडा व दि. १३ फेब्रुवारी रोजी इ. ८ वी मुलांच्या विद्याव्रत संस्कारासाठी मा. श्री. अनिल सहस्रबुद्धे हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

### ➢ वर्षांत उपासना

दि. २८ एप्रिल रोजी वर्षांत उपासना झाली आणि प्रशालेचा वार्षिक निर्णय लागला.

## ➢ अन्य सहभाग

दि. ९ ऑक्टोबर रोजी नवरात्रीय शारदोत्सवात महालक्ष्मी मंदिर येथील विश्वस्त श्री. अग्रसेन यांच्यातर्फे आयोजित स्तोत्र पठणाचा कार्यक्रम झाला. प्रशालेच्या एकूण ६० विद्यार्थी विद्यार्थिनींनी अथर्वशीर्ष एकदा आणि तीन वेळा श्रीसुक्ताचे पठण केले.

पुणे आकाशवाणीच्या बालोद्यान या कार्यक्रमात प्रशालेच्या इ. ५ वी ते १० वी च्या विद्यार्थिनींनी भाग घेतला. कार्यक्रमाचे ध्वनिमुद्रण दि. १५ सप्टेंबरला व सादरीकरण दि. २५ सप्टेंबरला झाले.

**कार्यक्रमाचे स्वरूप**

**नाटक** - 'मन्याला बाप्पा भेटला' (इ. ९ वी विद्यार्थिनी लिखित नाटक)
**मान्यवरांच्या मुलाखती विद्यार्थिनींनी घेतल्या** : डॉ. धनंजय केळकर, श्री. रवी परांजपे, श्री. चारुहास पंडीत व श्री. आनंद आगाशे
**पद्य** : 'उमेदीत आरंभ हो जीवनाचा' हे पद्य इ. १० वी च्या विद्यार्थिनींनी सादर केले.

'Saturday Club Global Trust, Pune Branch' तर्फे महाराष्ट्रीय उद्योजकांच्या वतीने आयोजित चर्चा सत्रात प्रशालेतील इ. १०वी तील भविष्यवेध प्रकल्प करणाऱ्या पाच मुलांच्या गटाने 'उद्योगांचा भविष्यवेध' या चर्चासत्रात भविष्यशास्त्राच्या संकल्पनांवर आधारित एक सचित्र सादरीकरण करून चर्चा सत्रात भाग घेतला.

## ➢ सहाध्यायदिन

श्रमप्रतिष्ठेचे मूल्य समजावे या उद्देशाने इ. ९ वी विद्यार्थी-विद्यार्थिनींचा सहाध्यायदिन भातलावणीसाठी पाबे येथे गेला होता. प्रत्यक्ष खाचरात उतरून डोक्यावर पाऊस पडत असताना भातलावणीचा अनुभव विद्यार्थ्यांनी घेतला.

दि. २८ फेब्रुवारी रोजी विज्ञान दिनानिमित्त इ. ८वी विद्यार्थी-विद्यार्थिनींनी IITM (Indian Institute of Tropical Meteorology) या संस्थेस भेट दिली. त्यांना तेथील प्रयोगशाळा व अत्याधुनिक यंत्रणा बघण्याची तसेच त्याबद्दल माहिती मिळविण्याची संधी मिळाली.

दि. २ मार्च रोजी इ. ६वी मुलींचा सहाध्यायदिन 'घरटे' (रस्त्यावरील मुलांची / भटके विमक्त मुलांची संस्था) व जीवनज्योत (मतिमंद मुलांसाठी काम करणारी संस्था) या संस्थांना भेट असा झाला.

## ➢ बाह्य परीक्षा

सन २०१०-२०११ या शालेय वर्षात विविध बाह्य स्पर्धा परीक्षांमध्ये विद्यार्थ्यांनी सहभागी होऊन उत्तम यश मिळविले त्यात मुख्यतः पुढील परीक्षांचा समावेश होता.

| | |
|---|---|
| १) राष्ट्रीय प्रज्ञा शोध परीक्षा | - इ. ८ वी |
| २) महाराष्ट्र प्रज्ञा शोध परीक्षा | - इ. ८ वी व ९वी |
| ३) होमी-भाभा बाल विज्ञान स्पर्धा परीक्षा | - इ. ६ वी , ९ वी |
| ४) गणित प्रज्ञा / प्रावीण्य/पारंगत परीक्षा | - इ. ५ वी, ८ वी |
| ५) संस्कृत परीक्षा (टिळक महाराष्ट्र विद्यापीठ) | - इ. ५ वी ते ९ वी |
| ६) चित्रकला - एलिमेंटरी, इंटरमिजिएट परीक्षा | - इ. ७ वी ते १० वी |
| ७) गणित शिष्यवृत्ती परीक्षा (खडकी, जैन) | - इ. ५ वी व ९ वी |
| ८) महाराष्ट्र राज्य-माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा | - इ. ७ वी |

## ➢ गुणविकास योजना उपक्रम

गेली वीस वर्षे इ. ७ वी साठी गुणविकास योजना हा उपक्रम राबविला जातो. या योजनेअंतर्गत अनेक कौशल्ये मुलांना शिकविली जातात. दैनंदिन शिक्षणात जी कौशल्ये आवश्यक असतात नेहमी त्यांचा वापर करावा लागतो अशी कौशल्ये विद्यार्थी स्वतःच्या आवडीनुसार शिकतच असतो, परंतु त्यामध्ये औपचारिकता आणून सर्वच विद्यार्थ्यांना अशा कौशल्यांचे शिक्षण द्यावे या उद्देशाने इ. ७ वी गुणविकास योजना असा औपचारिक उपक्रम प्रबोधिनीत सुरू आहे. वर्षभरात होणाऱ्या सर्व कौशल्यांचे गुण एकत्रित करून सरासरी काढून पहिले पाच विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी निवडले जातात. दरवर्षी कौशल्ये कोणती शिकवायची हे ठरविले जाते. या वर्षीपासून मानसशास्त्रज्ञ - गार्डनरच्या बहुजिनसी बुद्धिमत्तेच्या प्रतिमानावर आधारित कौशल्यांची योजना केली गेली. ही योजना पुढील प्रमाणे :

१) गणिती/तार्किक बुद्धिमत्ता - बौद्धिक क्षमता, ओघतक्ता
२) अवकाश ज्ञान - ओरिगामी, अंतर्गत सजावट
३) भाषिक बुद्धिमत्ता - वाचन कौशल्य, प्रतिभाशाली लेखन
४) कायिक बुद्धिमत्ता - दलावरील उपक्रम
५) व्यक्ती अंतर्गत बुद्धिमत्ता - दैनंदिन लेखन, संकल्प, मनोगत लेखन
६) आंतर व्यक्तीगत बुद्धिमत्ता - कथाकथन, मुलाखत, गटकार्य
७) सांगितिक बुद्धिमत्ता - तबला, स्वर-ताल ज्ञान, राग ओळखता येणे
८) निसर्गविषयक बुद्धिमत्ता - निरीक्षण कौशल्य

गुणविकास योजनेसाठी दर आठवड्याला दोन तासिका याप्रमाणे तास होतात. प्रत्येक कौशल्यासाठी अध्यापक/तज्ज्ञ व्यक्तींची नियुक्ती केली जाते.

## ➢ अभिव्यक्ती विकसन तासिका

शैक्षणिक वर्ष २०१०-२०११ पासून अभिव्यक्ती तासिकांची पुनर्रचना केली आहे. या वर्षीपासून इ. ५ वी व ६ वी च्या वेळापत्रकात या तासिका अंतर्भूत केल्या आहेत. या दोन वर्गात मूलभूत सर्व विषयांची ओळख झाल्यावर इ. ७ वी मध्ये त्यांना आपल्या अभिव्यक्ती आपल्या आवडीनुसार निवडता येतात. हे विषय घेणाऱ्या अध्यापकांची नावे पुढीलप्रमाणे :

| | | |
|---|---|---|
| नाट्य | - | भैरवीताई पुरंदरे |
| नृत्य | - | अबोली धायरकर |
| गायन | - | सिमंतिनी जहागिरदार |
| तबला | - | मंगेश करमरकर |

| | | |
|---|---|---|
| संवादिनी | - | प्रज्ञा कसेरकर, मधुरा डोंगरे |
| चित्रकला | - | श्वेता तांबोळी |
| शिल्पकला | - | राकेश भुजबळ |
| प्रतिभाशाली लेखन | - | प्रा. चारुता पुराणिक |

दरवर्षी प्रमाणे या वर्षीही (२०१०) एप्रिलमध्ये शालान्त परीक्षा संपल्यावर दहा दिवसांचे अभिव्यक्ती शिबिर झाले. प्रतिभाशाली लेखनातील मुलांनी या कार्यक्रमाचे सूत्र संचलन केले. त्यादिवशी गायन, वादन, नाट्य, नृत्य यांचे सादरीकरण व चित्रकला व शिल्पकलेचे प्रदर्शन झाले. या कार्यक्रमासाठी पालकांनाही निमंत्रित करण्यात आले होते.

## ➢ पालक-शिक्षक संघ

पालक-शिक्षक संघाची स्थापना दि. १८ ऑक्टोबर २०१० रोजी करण्यात आली. ह्या बैठकीत संघाच्या कार्यकारिणीची स्थापना सर्वानुमते करण्यात आली.

| | |
|---|---|
| अध्यक्ष | - मा. प्रा. श्री. विवेकराव पोंक्षे |
| उपाध्यक्ष | - श्री. आनंद आगाशे (पालक प्रतिनिधी) |
| सचिव | - मा. भाग्यश्रीताई हर्षे |
| सहसचिव | - नेहाताई अभ्यंकर |
| डॉ. प्राची साठे | - पालक प्रतिनिधी |

दर दोन महिन्यांनी दुसऱ्या गुरुवारी सायं. ५ ते ६.३० ह्या वेळात बैठक असते. आत्तापर्यंत ह्या बैठकांमध्ये प्रशालेतील सोयी-सुविधा, शुल्क वाढ, ठराव मान्यता, निरंतर व सर्वंकष मूल्यमापन योजना, सामायिक समस्या, युवक-युवती दल, अग्रणी योजना, Special purpose groups इ. गोष्टींवर चर्चा झाल्या. ह्या सर्व बैठकांमध्ये प्राचार्य मिलिंद नाईक यांनी मार्गदर्शन केले. प्रशालेच्या अनेक उपक्रमांमध्ये सहभागी होण्याची तयारी अनेक पालकांनी दर्शविली. प्रशालेच्या काही उपक्रमांमध्ये सहाध्यायदिन, परीक्षांचे पर्यवेक्षक, शिबिरे, सहली इ. मध्ये सहभागी होण्यास पालक उत्सुक असतात. ह्या पालक-शिक्षक संघाची बैठक झाली की प्रत्येक वर्गाचे पालक प्रतिनिधी त्या-त्या वर्गाच्या पालकांची बैठक घेतात. अशा रचनेमुळे पालक व शिक्षकांमध्ये चांगला संवाद होत आहे.

## ➢ नेतृत्वगुण विकसन तासिका

बुद्धिमान विद्यार्थ्यांमधील नेतृत्वगुणाचे विकसन हे प्रशालेचे प्रमुख उद्दिष्ट आहे. हे उद्दिष्ट साध्य व्हावे म्हणून अनेक प्रयोग येथे झाले व होत राहतील. गेल्या ४० वर्षांतील या प्रयोगांचे एकत्रीकरण करून त्यांना एका रचनेत गुंफता येईल का असा प्रयोग यंदाचे वर्षी सुरु केला आहे. इयत्तानुसार खालीलप्रमाणे गुणविकसनाची योजना केली आहे.

| इयत्ता | विषय |
|---|---|
| ७ वी | कल्पकता व नाविन्यपूर्ण समस्या परिहार |
| ८ वी | नियोजन कौशल्य : स्वतःचे व कार्यक्रम आणि उपक्रमांचे |
| ९ वी | संवाद कौशल्य |
| १० वी | गट बांधणी व प्रत्यक्ष अग्रणी म्हणून अनुभव |

हे गुण निवडताना कुठल्याही क्षेत्रात लागणाऱ्या समाईक नेतृत्व गुणांची निवड केली आहे.

## ➢ वास्तूचे नूतनीकरण

प्रशालेच्या अखत्यारीतील वास्तूच्या वापरात अनेक बदल करण्यात आले आहेत.

- चौथ्या मजल्यावरील जीवशास्त्र प्रयोगशाळा, पदार्थ विज्ञान प्रयोगशाळा तसेच पाचव्या मजल्यावरील रसायन प्रयोगशाळा या तिन्ही प्रयोगशाळा तिसऱ्या मजल्यावर स्थलांतरीत करण्यात आल्या.
- सर्व वर्गांचे रंगकाम झाले असून इ. ८ वी ते १० वी च्या सहाही वर्गात LCD projector आणि screen बसविण्यात आलेला आहे.
- अध्यापक कक्ष तसेच कार्यालयाचेही नूतनीकरण करण्यात आले आहे. प्रत्येक अध्यापकांना एक संगणक देण्यात आला आहे.
- भाषाकक्ष, भूगोलकक्ष, गणितकक्ष याच्या जागाही ठरल्या आहेत. काळानुसार त्यांची रचना होईल.
- दोन संगणक प्रयोगशाळाही सुसज्ज झाल्या आहेत.

## ➢ प्रशालेचे परीक्षण

दि. २४ ऑक्टोबर रोजी प्रशालेची CBSE तर्फे तपासणी झाली. CBSE ने राबविलेल्या सर्वंकष निरंतर मूल्यमापनाचे दिल्ली पब्लिक स्कूलच्या अध्यापकांनी परीक्षण केले. प्रशालेत सर्वंकष निरंतर मूल्यमापन (CCE) कसे करतो ह्या संबंधी सविस्तर निवेदन प्रा. नेहाताई अभ्यंकर ह्यांनी ppt-show च्या मदतीने केले.

# शैक्षणिक उपक्रम संशोधिका

➢ **वा. ना. दांडेकर शिक्षक प्रशिक्षण केंद्र**

'ज्ञान प्रबोधिनी'चे शिक्षण क्षेत्रातील कार्य राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचते आहे. गेल्या पन्नास वर्षात प्रबोधिनीने शालेय शिक्षणांतील अनेक नाविन्यपूर्ण प्रयोग केले आणि नवनव्या संकल्पना रूढ केल्या. ज्ञान प्रबोधिनीत सिद्ध होत असलेल्या या प्रयोगांचा प्रसार आणि विस्तार ज्ञान प्रबोधिनीच्या शैक्षणिक उपक्रम संशोधिकेच्या शिक्षक-प्रशिक्षण कार्यक्रमातून केला जात होता. समाजाच्या वाढत्या अपेक्षा व ज्ञान प्रबोधिनीच्या कार्यकर्त्यांची विस्ताराकांक्षा ध्यानात घेऊन प्रबोधिनीने एका औपचारिक शिक्षक-प्रशिक्षण केंद्राची रचना करण्याचे ठरविले. ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ वा. ना. दांडेकर यांच्या भरघोस आर्थिक साहाय्याने ज्ञान प्रबोधिनी, विनायक भवन या नवीन वास्तूमध्ये वा. ना. दांडेकर शिक्षक प्रशिक्षण केंद्र स्थापन केले आहे. या केंद्रामार्फत वर्षभरात झालेले प्रशिक्षण वर्ग खालील प्रमाणे :

| क्र. | तारीख सन २०१० | सहभागी प्रशिक्षणार्थी गट | विषय | मार्गदर्शक | शिक्षक संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १. | ७ व ८ ऑगस्ट | माध्यमिक शिक्षक ज्ञा. प्र. व अन्य संस्था | वाचन कौशल्ये | प्रा. विवेक पोंक्षे | १६ |
| २. | ३० ऑगस्ट | शाळा पर्यवेक्षक | शाळा पर्यवेक्षकांची कार्यशाळा | प्रा. शिरीष जोशी | १७ |
| ३. | २७ ते २९ सप्टेंबर | अभ्युदय प्रकल्पांतर्गत विज्ञान शिशु शाळांचे शिक्षक (प्राथ. + माध्य.) | | प्रा. विवेक पोंक्षे, प्रा. मिलिंद नाईक प्रा. उल्हास टुमणे, प्रा. मुकुलिका थत्ते श्री. नचिकेत नित्सुरे, श्री. आदित्य शिंदे | १८ |
| ४. | २ ते ६ ऑक्टोबर | साखरशाळा शिक्षक | प्राथमिक शिक्षण | प्रा. विवेक पोंक्षे, श्री. प्रकाश रणनवरे प्रा. रागिणी नाईक, प्रा. पद्मावती पांडे श्री. संजीवन मुळे, श्री.अनिल गुरव श्री. नचिकेत नित्सुरे, प्रा.राजश्री तिखे | २६ |
| ५. | १० ते ११ डिसेंबर | माध्यमिक शिक्षक भूगोल शिकविणारे शिक्षक | भूगोल | डॉ. सुरेंद्र ठाकुरदेसाई , प्रा. विवेक पोंक्षे प्रा. संजीव नलावडे, प्रा. श्रीकांत कार्लेकर प्रा. भाग्यश्री यारगोप, प्रा. प्रशांत दिवेकर | ८ |
| ६. | **सन २०११** १ ते ३ फेब्रुवारी | अभ्युदय प्रकल्पांतर्गत प्राथमिक, माध्यमिक शाळांचे शिक्षक | विज्ञान अध्यापन | प्रा. विवेक पोंक्षे, प्रा. मुकुलिका थत्ते श्री. प्रकाश रणनवरे, श्री. नचिकेत नित्सुरे | १५ |
| ७. | ७ फेब्रुवारी | जालना सरस्वती भवन विद्यालय | विज्ञान प्रकल्प पद्धती | प्रा. विवेक पोंक्षे | ८० |
| ८. | ६ मार्च | माता-बालक उत्कर्ष प्रतिष्ठान, सांगोला प्राथमिक शिक्षक | गटबांधणी | श्री. प्रकाश रणनवरे, श्री. अनिल गुरव श्री. ओंकार बाणाईत | ४२ |

## ➢ बुद्धिमता संवर्धन केंद्र

शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या तर्कविचार, प्रतिभाशाली विचार, समस्यापरिहार कौशल्य इ. बुद्धिगुणांचा विकास करण्यासाठी विविध प्रकारचे उपक्रम या केंद्रामार्फत आयोजित केले जातात.

दि. २८ जुलै रोजी ज्ञान प्रबोधिनी, पुणे येथे राष्ट्रीय प्रज्ञा शोधच्या विद्यार्थ्यांच्या सराव मुलाखती आयोजित केल्या होत्या. मुलाखत घेण्यासाठी तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून प्राचार्य विवेक पोंक्षे व प्रा. नेहा अभ्यंकर, प्रा. गोंधळेकर उपस्थित होते. मुलाखतींसाठी महाराष्ट्र व गोवा राज्यातून आलेल्या एकूण सात विद्यार्थ्यांनी सराव मुलाखतीचा लाभ घेतला.

दि. २० व २१ ऑगस्ट रोजी विज्ञान प्रकल्प कार्यशाळा आयोजित केली होती. पुणे शहरातील दहा माध्यमिक शाळांतून ३१ विद्यार्थी आले होते.

दि. ४ सप्टेंबर रोजी विज्ञान खेळणी कार्यशाळा आयोजित केली होती. विद्यार्थी, पालक, शिक्षक असे एकूण ३७ प्रशिक्षणार्थी उपस्थित होते. प्रा. उल्हास टुमणे यांनी आलेल्या प्रशिक्षणार्थींकडून विज्ञान खेळणी तयार करून घेतली व प्रत्येक खेळातून काय विज्ञान शिकता येते हे सांगितले.

ज्ञान प्रबोधिनी बुद्धिमत्ता संवर्धन केंद्रामार्फत दि. ४ डिसेंबर रोजी आयोजित केलेल्या विज्ञान खेळणी कार्यशाळेला ३९ विद्यार्थी व ३० पालक अशा एकूण ६९ जणांचा सहभाग होता.

दि. ५ फेब्रुवारी रोजी विज्ञान खेळणी कार्यशाळेत २८ विद्यार्थी सहभागी होते.

## ➢ शैक्षणिक साधन केंद्र

ज्ञान प्रबोधिनीच्या वतीने या शैक्षणिक वर्षात एका नव्या शैक्षणिक साधन केंद्राचा प्रारंभ झाला आहे. या केंद्राच्या वतीने स्वयं अध्ययन कौशल्यावरच्या इंटरॲक्टिव्ह व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते. ही व्याख्यानमाला इंटरनेटच्या माध्यमातून नेट (Live) व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारा महाराष्ट्रातील व अन्य राज्यातील विविध माध्यमांच्या शाळांतील विद्यार्थ्यांसाठी योजली होती. या कार्यक्रमाअंतर्गत खालील विषयांवर विविध व्याख्यात्यांचे मार्गदर्शन झाले.

| तारीख | विषय | व्याख्याते | लाभार्थी शाळा |
|---|---|---|---|
| सन २०१० | | | १) रेणुका स्वरूप विद्यालय, पुणे |
| ३ डिसेंबर | स्वयंअध्ययनाची ओळख | प्रा.विवेकराव पोंक्षे | २) पवार पब्लिक स्कूल, हडपसर, पुणे |
| ८ डिसेंबर | अभ्यासाचे नियोजन भाग-१ | प्रा. मिलिंद नाईक | ३) मॉडर्न हायस्कूल, पुणे |
| १४ डिसेंबर | अभ्यासाचे नियोजन भाग-२ | प्रा. मिलिंद नाईक | ४) ज्ञान प्रबोधिनी प्रशाला, पुणे |
| १७ डिसेंबर | अभ्यास पायऱ्या भाग - १ | प्रा. सविताताई कुलकर्णी | ५) विजय वल्लभ स्कूल, भवानीपेठ, पुणे |
| सन २०११ | | | ६) योगेश्वरी विद्यालय, अंबाजोगाई, बीड |
| ७ जानेवारी | अभ्यास पायऱ्या भाग - २ | प्रा. सविताताई कुलकर्णी | ७) न्यू व्हिजन विद्यालय, अंबाजोगाई, बीड |
| | स्मरण कौशल्ये | प्रा. मुकुलिका थत्ते | ८) ॲडव्हान्स्ड ॲकेडमी इंदौर, मध्यप्रदेश |
| ८ जानेवारी | माहितीची फेरमांडणी | प्रा. विवेकराव पोंक्षे | ९) सत्यसाई विहार विद्यालय इंदौर, मध्यप्रदेश |
| | परीक्षा तंत्र | प्रा. विवेकराव पोंक्षे | १०) केशवराज विद्यालय, लातूर |
| १० जानेवारी | Study Planning | प्रा. रागिणीताई नाईक | ११) लोकमान्य टिळक हायस्कूल, गोवा |
| १२ जानेवारी | Writing Techniques | प्रा. सत्याश्रय हसबनीस | १२) स्पर्धा परीक्षा केंद्र, औरंगाबाद |
| १४ जानेवारी | How to Face Competitive | प्रा. प्रशांत दिवेकर | १३) ल. रा. शिंदे हायस्कूल, पुणे |
| | Exam | | १४) श्रीमती ल. गो. शानबाग विद्यालय, जळगाव |
| १७ जानेवारी | Career and Examinations | प्रा. विवेक वेलणकर | १५) काशीनाथ पलोड हायस्कूल, जळगाव |
| २४ फेब्रुवारी | How to Face | प्रा. प्रशांत दिवेकर | १६) मिलिटरी स्कूल सगरोळी-नांदेड, |
| पुर्नप्रक्षेपण | Competitive Exam | | १७) ज्ञान प्रबोधिनी, निगडी |
| | | | १८) ज्ञान प्रबोधिनी, सोलापूर |

# छात्र प्रबोधन

२०१०-११ या वर्षामध्ये छात्र प्रबोधन मासिकाचे २६०० वार्षिक, १०० त्रैवार्षिक, तर २०० दशवार्षिक सभासद आहेत. छात्र प्रबोधनचे सहा दिवाळी अंक प्रकाशित झाले. प्रकाशनपूर्व नोंदणीद्वारा ३६,००० घरांमध्ये अंक पोहोचले. १०० गावांमधील ४०० कार्यकर्त्यांनी स्वयंसेवीवृत्तीने अंकाच्या नोंदणी व वितरणाचे काम केले. २०१०च्या दिवाळी अंकाला उत्कृष्ट दिवाळी अंकाचा 'रोटरी लोकमान्य पुरस्कार' मिळाला. युवकांसाठी निघालेल्या 'युवोन्मेष'च्या दिवाळी अंकाचे स्वरूप बदलून त्यातील निम्मी पाने सुमारे २२ युवक-युवतींनी घेतलेल्या अनुभवांच्या आधारे (कर्तृत्ववान व्यक्तींच्या सहवासात एक दिवस, हैद्राबाद, बंगलोर येथील संस्था अभ्यासदौरा, महाराष्ट्रातील सामाजिक प्रकल्पांच्या भेटी इ. द्वारा) लेखन केले.

या अंकासोबत सी.डी. भेट दिली होती, त्यात या सर्व अनुभवांच्या ध्वनिचित्रफिती होत्या.

छात्र प्रबोधन तर्फे यावर्षी मैत्री विशेषांक प्रकाशित झाला व भगिनी निवेदितांच्या स्मृतिशताब्दी वर्षाच्या निमित्ताने त्यांच्या चरित्रावर आधारित लेखमाला अंकातून प्रकाशित करण्यात आली.

पुणे, डोंबिवली, कल्याण, बदलापूर, सातारा, इचलकरंजी, रत्नागिरी व निगडी केंद्रांद्वारा ग्रामीण भागातील सुमारे १२०० विद्यार्थ्यांसाठी ग्रामीण दिवाळी अंकाभोवती २० मेळावे झाले. सर्वच सहभागी विद्यार्थ्यांचा उत्साहवर्धक प्रतिसाद होता.

दिवाळी नंतर लेखक-हितचिंतकांसाठी स्नेहमेळावा झाला. त्याला १५० मान्यवर येऊन गेले. छात्र प्रबोधनच्या १० वर्षांमधील १२० अंकांची, सुमारे ६५०० पृष्ठांची, २२०० लेखांची पी.डी.एफ्. स्वरूपातील दशवार्षिक डी. व्ही. डी. व ४० प्रबोधन गीतांची श्राव्य सी. डी. यावेळी प्रकाशित करण्यात आली. चार महिन्यात १००० दशवार्षिक डी.व्ही.डीं‍ची विक्री झाली.

वर्षभरात पाच पुस्तकांचे पुनर्मुद्रण व दोन पुस्तकांच्या पुढील आवृत्त्या प्रकाशित झाल्या. ठाणे येथील साहित्य संमेलनात छात्र प्रबोधनचे पुस्तक विक्री केंद्र होते. डोंबिवली व कल्याण येथील कार्यकर्त्यांनी त्यात विशेष सहभाग घेतला. छात्र प्रबोधन आणि रवि परांजपे अमृत महोत्सव समिती यांनी संयुक्तपणे नवोदित चित्रकारांसाठी मुखपृष्ठ स्पर्धा घेतली, त्याला चांगला प्रतिसाद मिळाला. त्याशिवाय विद्यार्थ्यांसाठी घेतलेल्या 'सृजनाला पंख नवे' सादरीकरण स्पर्धा व 'तुम्हीच संपादक व्हा' हस्तलिखित स्पर्धा या दोन्ही स्पर्धांमध्ये एकूण ३५ गटांनी भाग घेतला.

विभागातील सदस्यांसाठी वर्षारंभ उपासना, सरस्वती-लक्ष्मीपूजनाची उपासना, अभंग गायन, संचालक भेट, निगडी-साळुंब्रे येथील प्रबोधिनी परिचय सहल, दिवाळी श्रमपरिहार इ. कार्यक्रम झाले. वर्षभर विभागातील सहविचार समितीच्या बैठकी नियमितपणे होऊन विभागातील पुष्कळसे निर्णय या समितीने घेतले. विभागातील सदस्यांचा प्रत्येकी १ लक्ष रुपयांचा आरोग्य विमा काढण्यात आला असून त्याच्या हप्त्यापैकी ८०% रक्कम विभागाद्वारा देण्यात आली. तसेच तीन सदस्यांना त्यांच्या पदव्युत्तर शिक्षणासाठी शिष्यवृत्तीही देण्यात आली.

▲▲▲


## ज्ञान प्रबोधिनीची कुमारांसाठी उपयुक्त पुस्तके

**समृद्ध आशय, तज्ज्ञ लेखक, आकर्षक छपाई, माफक किंमत!**

**▶ कथासंग्रह**
- दरवळ ४०/-
- मृद्गंध ६०/-
- बहर ५०/-
- मोहोर ६०/-
- कहाणी दोन भावांची ३०/-
- मृदुभाव जागे होता... ३०/-
- प्रेरक कथा ३०/-

**▶ ललित लेखसंग्रह**
- अलगुज ५०/-
- केवड्याचं पान ५०/-

**▶ नामवंत कवींच्या काव्याविषयी रसग्रहणात्मक लेखांचा संग्रह**
- गंध मोहवी काव्याचा – भाग १ व भाग २ प्रत्येकी ७०/-

**▶ कवितासंग्रह**
- अक्षरबोली ३०/-
- कवितेच्या गावा ३०/-

**▶ विचार व कृतिप्रवर्तक लेखसंग्रह**
- स्वीकारशील स्वदेशी ५०/-
- हट्टी व्हा, हट्टी ! ५०/-
- हरित संदेश १५/-

**▶ भावभावनांशी निगडित लेखसंग्रह**
- तरंग मनाचे ५०/-
- जिद्दीची लोभस रूपं ६०/-

**▶ व्यक्तिविकासाशी निगडित पुस्तके**
- प्रतिभेच्या प्रांतातील प्रवास ५०/-
- व्यक्तिविकासासाठी विद्याव्रत ७०/-
- कल्पक बनू या ८०/-
- गीता–गीताई १०/-

**▶ अनुभवपर, प्रेरणादायी पुस्तके**
- आयुष्यातील वादळलाटा ६०/-
- कथा इस्रोची ६०/-

**▶ कृतिपर पुस्तक**
- त्रिमितीची किमया ७५/-
- असे घटते सुंदर अक्षर १५/-

**▶ माहितीपर पुस्तके**
- गिर्यारोहणगाथा ४०/-
- छंद आकाशदर्शनाचा ८०/-
- आपला पाऊस ३०/-

**OUR ENGLISH EDITIONS**
- Enhancement of Intelligence through play Rs. 150/-
- Glory of Intelligence Rs. 30/-
- 3D Magic Rs. 80/-
- Be Creative Rs. 100/-

**पालक–शिक्षकांसाठी उपयुक्त पुस्तके**
- आश्वासक पालकत्व ८०/-
- सामाजिक जाणीव संवर्धन ८०/-
- रूप पालटू शिक्षणाचे ३०/-
- बुद्धिवैभव २०/-
- प्रबोधन गीते २०/-
- हसत खेळत बुद्धिविकास भाग– १ १३०/-
- हसत खेळत बुद्धिविकास भाग –२ १५०/-

# स्पर्धा परीक्षा केंद्र

प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या निवडीसाठी होणाऱ्या केंद्र स्तरावरील (UPSC) व राज्य स्तरावरील (MPSC) परीक्षांसाठी ज्ञान प्रबोधिनी स्पर्धा परीक्षा केंद्रामध्ये मार्गदर्शन केले जाते. अधिकाधिक संख्येने प्रशासकीय अधिकाऱ्यांची निवड व्हावी आणि त्यांनी स्वच्छ व कार्यक्षमरित्या काम करावे यासाठी ज्ञान, कौशल्य व वृत्तीघडण यांचे प्रशिक्षण देण्याची रचना तयार करून Know your Self, Know your System, Know your Society या सूत्राच्या आधारे संपूर्ण प्रशिक्षणाचे नियोजन केले जाते.

➢ **केंद्र लोकसेवा आयोग परीक्षा (UPSC) :**

UPSC चे विविध स्तरांचे मार्गदर्शन वर्ग यावर्षी झाले.

**१) UPSC Mission 1200 वर्ग :** UPSC पूर्वपरीक्षा २०१० मे महिन्यामध्ये पार पडली. ही परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांसाठी मुख्य परीक्षा मार्गदर्शन वर्ग झाले. एकूण सात प्रकारचे वर्ग घेण्यात आले व त्यासाठी ४३२ प्रवेश होते. यामध्ये सामान्य अध्ययन व सहा वैकल्पिक विषयांचे मार्गदर्शन झाले. हे वर्ग जून ते ऑगस्ट असे तीन महिने चालले. या विद्यार्थ्यांचा ऑगस्टमधे पूर्वपरीक्षा निकाल लागल्यानंतर मुख्य परीक्षा सराव चाचण्या झाल्या.

UPSC २००९ च्या परीक्षेत यशस्वी होऊन विविध पदांवर निवड झालेले विद्यार्थी अधिकारी मैत्रेय कुलकर्णी, विशाल देसाई, राजीव पांडे, परीस देशमुख, चिन्मया औरंगाबादकर, सोनल सोनकवडे व काही ज्येष्ठ विद्यार्थी भूषण पाटील, इंद्रपाल सिंग, अनिकेत बावठणकर, सागर डोईफोडे, हृषिकेश सोनावणे यांनी Mission १२०० च्या वर्गांना मार्गदर्शन केले.

**२) UPSC मुख्य व पूर्वपरीक्षा २०११ सामान्य अध्ययन मार्गदर्शन वर्ग (संकल्प) :** UPSC २०११ पूर्वपरीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी सामान्य अध्ययन वर्गाच्या प्रवेशासाठी मुलाखती झाल्या. प्रथम सत्रात सामान्य अध्ययनाचे मुख्य परीक्षेचे मार्गदर्शन झाले. तसेच मुख्य परीक्षेच्या वैकल्पिक विषयांचे मार्गदर्शन वर्ग झाले. या वर्गांना १९७ विद्यार्थ्यांचे एकूण ४४२ प्रवेश होते.

**३) UPSC पूर्वपरीक्षा २०११ वर्ग (संकल्प) :** २०११ ची UPSC ची पूर्वपरीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना डिसेंबर ते एप्रिल या कालावधीत सामान्य अध्ययन व CSAT विषयांसाठी उपयुक्त असे मार्गदर्शन वर्ग झाले. यामधे दोन सामान्य अध्ययन +CSAT व दोन फक्त CSAT अशा चार तुकड्यांचा समावेश होता. या वर्गांना ३३० प्रवेश होते.

UPSC पूर्वपरीक्षेच्या अभ्यासक्रमात बदल झाला असून वैकल्पिक विषयांऐवजी CSAT (Civil Services Aptitude Test) म्हणजेच नागरी सेवा कलचाचणी हा नवीन विषय सुरू झाला आहे. यामधे असणाऱ्या GMAT, Maths, English Comprehension, General Comprehension या भागांचे सविस्तर नियोजन करून मार्गदर्शन वर्ग झाले. संपर्क कौशल्य, निर्णयक्षमता, विश्लेषण, नेतृत्वगुण या भागांवर श्री. शरदराव सुंकर, श्री. शिरीष जोशी व श्री. शिरीष शितोळे यांनी कार्यशाळा पद्धतीने मार्गदर्शन केले.

ज्येष्ठ अध्यापकांच्या नियमित अध्यापनाबरोबरच ज्येष्ठ विद्यार्थ्यांनी tutorials व मागे पडणाऱ्या विद्यार्थ्यांची विशेष सत्रे घेऊन सराव करून घेतला. यामध्ये UPSC ज्येष्ठ विद्यार्थी हृषिकेश सोनवणे व समीर माढेकर यांनी महत्त्वपूर्ण काम केले.

**४) मुलाखत प्रशिक्षण वर्ग : UPSC मुलाखत प्रशिक्षण वर्ग (प्रेरणा) :** UPSC २०१० ची मुख्य परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांसाठी मुलाखत प्रशिक्षण वर्गाची योजना डिसेंबर २०१० ते मार्च २०११ या कालावधीमध्ये केली होती. या वर्गाला ८० विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला होता.

**अ) व्यक्तिमत्त्व चाचण्या व मार्गदर्शन :** डिसेंबर महिन्यात विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व चाचण्या झाल्या. तसेच'मुलाखतीची तयारी कशी करावी?' या विषयावर ज्येष्ठ अधिकारी तसेच गेल्या काही वर्षांमधे निवड झालेल्या विद्यार्थी अधिकाऱ्यांनी मार्गदर्शन केले. डॉ. विवेक कुलकर्णी, डॉ. राजीव रानडे व श्री. रवि पाटील यांची व्याख्याने झाली.

मुलाखतीसाठी 'स्वत:ला ओळखा' या स्वरूपाची काही सत्रे आयोजित करण्यात आली होती. यामधे व्यक्तिमत्त्व चाचण्या व कार्यशाळा झाल्या.

मुलाखतीसाठी देहबोली फार महत्त्वाची असते. भरत नाट्य मंदिराचे विश्वस्त, नाट्यलेखक व दिग्दर्शक श्री. रविंद्र खरे यांनी 'बोली, देहबोली' या विषयावर कार्यशाळा घेतली.

श्रीमती रविबाला काकतकर यांचे 'आत्मविश्वासाची जोपासना व तणाव व्यवस्थापन' याविषयी व्याख्यान झाले.

सौ. सुवर्णाताई गोखले यांचे 'महिलांमधील बचतगटाचे कार्य व त्यायोगे महिला सक्षमीकरण' या विषयावर व्याख्यान झाले.

**ब) गटश: उपक्रम :** जानेवारी महिन्यात गटश: उपक्रमांना सुरुवात झाली. गटचर्चा, गटमुलाखती व सेमिनार यांच्या प्रक्रियेविषयी प्रा.सविता कुलकर्णी यांनी मार्गदर्शन केले. ✻ गटचर्चेसाठी एकूण २० सद्य घटनांवर आधारित महत्त्वाचे विषय निवडले होते. ✻ सेमिनारसाठी दोन विद्यार्थ्यांनी एका विषयाची निवड केली व प्रत्येक शनिवार/ रविवारी पाच विषयांवर सेमिनार झाले. अशाप्रकारे सेमिनारसाठी ३५ विषय विद्यार्थ्यांना देण्यात आले होते. ✻ गटमुलाखतीसाठी ५ जणांचा एक असे गट करण्यात आले. गटातील एकाची उरलेल्या चार जणांनी मुलाखत घ्यायची व लेखी feedback द्यायचा अशी पद्धत वापरली. Bio-data, Current

Events, Optional subjects अशा तीन विषयांना केंद्रस्थानी ठेऊन गटमुलाखतींच्या तीन फेऱ्या झाल्या. या गटउपक्रमांमध्ये मार्गदर्शक म्हणून ज्येष्ठ विद्यार्थी सागर डोईफोडे, हृषिकेश सोनवणे, समीर माढेकर व रवि पट्टणशेट्टी यांनी काम पाहिले.

**क) राळेगण सिद्धी, हिवरे बाजार व पाबळ भेट –** दि. १५ व १६ फेब्रुवारी या दोन दिवशी वरील तीन ठिकाणी अभ्याससहल झाली. प्रथम दि.१५ रोजी पाबळ येथे भेट देऊन तेथील उपक्रमांची माहिती घेतली. त्यानंतर हिवरेबाजार येथे श्री. पोपटराव पवार यांचे मार्गदर्शन होऊन प्रश्नोत्तरे झाली. त्यानंतर पाणलोट क्षेत्र विकासाचे उपक्रम पाहून विद्यार्थ्यांनी गावात घराघरात जाऊन गप्पा मारल्या. रात्री पारनेर येथे पारनेरकर महाराजांच्या आश्रमात भोजन घेऊन तेथेच निवास केला.

दि.१६ रोजी राळेगण सिद्धी येथे जाऊन तेथील पाणलोट क्षेत्र विकासाचे काम पाहिले व मिडिया सेंटरमधील प्रदर्शन पाहिले. मा. आण्णा हजारे यांनी विद्यार्थ्यांना सुमारे दीड तास मार्गदर्शन केले. प्रशासकीय यंत्रणेकडून काही अपेक्षा व्यक्त केल्या. शासकीय यंत्रणेमध्ये का जायचे याची उत्तरेच विद्यार्थ्यांना या दौऱ्यात मिळत होती. अभ्याससहलीत ६३ विद्यार्थी सहभागी झाले.

**ड) जिल्हा अभ्यासदौरे –**'प्रशासन व विकासातील असमतोल' हे सूत्र घेऊन विविध जिल्ह्यांचा अभ्यास करण्यासाठी दि. १७ फेब्रुवारी रोजी सुमारे ६२ विद्यार्थी-विद्यार्थिनी १० ते १५ दिवसांच्या दौऱ्यांवर रवाना झाले.

यामध्ये मणिपूर - नागालँड (५), आसाम-त्रिपुरा (१०), ओरिसा (८), गडचिरोली-नागपूर (१८), नांदेड (७), अमरावती (८), रायगड (६) याठिकाणी हे सर्वजण गेले होते.

### ***पूर्वांचल :***

**प्रबोधिनी परिवार अधिकारी**

१) श्री. विशाल सोळंकी (IAS), Joint officer to Chief Secretary, Assam.
२) श्री. किरण गीते (IAS), DM, Dhalai District, Tripura
३) श्री. अभिजीत सप्तर्षी (IPS), SDPO, Telaimura, Tripura
४) श्री. चिन्मय गोतमारे (IAS, नागाव) आणि वैभव निंबाळकर (IPS, नागाव)
५) श्री.अय्याज तांबोळी (IAS)

**अन्य मार्गदर्शक**

६) श्री. ग्यानेंद्रदेव त्रिपाठी (गृह सचिव, आसाम)
७) श्रीमती मौसमी गोगाई आणि सहकारी (करुणा ट्रस्ट, शिलाँग)
८) श्रीमती सुजाता दिदी (कार्यकर्त्या, VKIC, गुवाहाटी)
९) श्री. तिर्थोजीत देब्बरमा (किरण गीते सरांचे सहकारी)
१०) श्री.विवेक पोंक्षे आणि श्री.विजय स्वामी

### ***नांदेड :***

**प्रबोधिनी परिवार अधिकारी**

१) श्री. श्रीकर परदेशी, District Collector, Nanded
२) श्री. श्रावण हर्डीकर, CEO, ZP Nanded
३) श्री. संदीप कर्णिक, SP, Nanded
४) श्री. विवेक घोडके, SDO, Kinwat

**अन्य मार्गदर्शक**

५) श्री. विनायक निपुण, Commissioner, NWMC, Nanded
६) श्री. गोवर्धन मुंडे, Kinwat
७) श्री. सोनटक्के, CCF, Aurangabad Division
८) डॉ. किरण मोघे, DIO, Nanded
९) श्री. राजेश भुसारी, DIC, Nanded
१०) श्री. बी. बी. ठोंबरे, Chairman N-SAI, Ranjni.

### ***नागपूर – गडचिरोली :***

**प्रबोधिनी परिवार अधिकारी**

१) श्री. प्रवीण दराडे, (Collector, Nagpur)
२) श्री. अतुल पाटणे (Collector, Gadchiroli)
३) श्री. सतीश खंदारे (DIG, CRPF Nagpur Div.) व सौ.पूर्णिमा गायकवाड (ACP)
४) श्री. गणेश बरे, (Dy.Commissioner, Income Tax)
५) श्री. सुशांत बनसोडे (Tahsildar, Wardha)
६) श्री. राहुल सारंग (Nayab Tahsildar, Wardha)

**अन्य मार्गदर्शक**

७) श्री. देवेंद्र फडणवीस (MLA, Nagpur)
८) एस.आर.सखांनत (IPS), कोहिमा
९) श्री. सुबोध कुलकर्णी (Activist)
सौ. किरण कुलकर्णी (District Election Officer, Gadchiroli)
१०) श्री. केशव गुरनुले, Wadsa
११) श्री. देवाजी तोफा (Sarpanch, Lekha Mendha)
१२) श्री. प्रकाश आमटे आणि सौ. मंदाताई आमटे
१३) श्री. अनिकेत आमटे (Lokbiradari, Hemalkasa)
१४) श्री.अमृत बंग आणि डॉ.अभय बंग (SEARCH, Gadchiroli)
१५) श्रीमती भारतीताई आमटे (Anandwan, Warora)
१६) श्री. सोहम पांड्ये (CSV, Wardha)
१७) श्रीमती सुषमा शर्मा (Sevagram, Wardha) (Lokbiradari, Hemalkasa)
१८) श्री. सुरेश दाभोले (Activist, ROLE NGO)

### *ओरिसा :*

**प्रबोधिनी परिवार अधिकारी**

१) श्री. नितीन जावळे - जिल्हाधिकारी, रायगडा
२) श्री. राजेश पाटील - जिल्हाधिकारी, कोरापूट
३) सौ. पूनम गुहा - उप जिल्हा दंडाधिकारी, कोरापूट

**अन्य मार्गदर्शक**

४) श्री. अनुप कृष्णा - पोलीस अधीक्षक, रायगडा
५) श्री. मुथ्थुकुमार - उप जिल्हा दंडाधिकारी, रायगडा
६) स्वामी महेश्वरानंद - रामकृष्ण मठ - रायगडा
७) श्री. सुबोध कुलकर्णी - सामाजिक कार्यकर्ते, गडचिरोली

### हैद्राबाद :

**प्रबोधिनी परिवार अधिकारी**

१) श्री.महेश भागवत – Joint Comm. of Police, Hyderabad
२) श्री.बालाजी मंजुळे – IAS (Andhra Pradesh)

**अन्य मार्गदर्शक**

३) श्री. रघुनंदन राव – CEO - SERP
४) श्री. प्रविणकुमार राव – Joint Comm. of Police, Hyderabad

### नागालँड, मणिपूर :

**प्रबोधिनी परिवार अधिकारी** :

१) श्री. अय्याज तांबोळी (IAS) २) श्री. ऋषीकेश मोडक (IAS), मणिपूर ३) श्री. विक्रम खलाटे (IPS), नागालँड

**अन्य मार्गदर्शक**

१) श्री. नोकसाई कानो (न्यायाधीश, दिमापूर)
२) श्री. अतुल जोग (सामाजिक कार्यकर्ते, नागालँड)
३) श्री. जीवन सिंग (इंफाळ)
४) श्री. अतुल देशपांडे (सामाजिक कार्यकर्ते, दिमापूर)
५) सरोज जोशी (पोशिमा, नागालँड)
६) आदिम (दिमापूर)
८) एम.रूपा (IPS), कोहिमा
९) निधी केसरवानी (IPS), सेनापती
१०) रूपचंद गुमनाम (ISTV), संपादक
११) देवयानी मॅडम (खटखटी, नागालँड)
१२) डॉ. दिहे (माओ नेता, मणिपूर)
१३) कर्नल चौधरी (आसाम रायफल)
१४) एन. हुराई (डेप्युटी स्पीकर नागा होहो)
१५) सी. लोशर (माओ नेता, ताडुबी)

### अमरावती :

**प्रबोधिनी परिवार अधिकारी** : १) डॉ. नितीन व्यवहारे (तहसीलदार), धारणी

**अन्य मार्गदर्शक** :

१) श्री. जयकुमार (IPS), एस. पी., अमरावती ग्रामीण
२) श्री. सचीन कलंबी (निवासी जिल्हाधिकारी), अमरावती
३) डॉ. दलबीर भारती (IPS), आय. जी. अमरावती विभाग
४) डॉ. आशिष सातव, महान एन. जी. ओ., कर्मग्राम (उतावली)
५) डॉ. सुनील देशपांडे, संपूर्ण बांबु केंद्र, लवादा
६) डॉ. सुनील देशमुख (माजी राज्य–अर्थमंत्री), अमरावती
७) श्री. वानखेडे (वरीष्ठ संपादक), दैनिक केसरी
८) श्री. ऋषीकेश खिलारे, उमंग प्रकल्प, कर्मग्राम
९) डॉ. रवी कोल्हे, धारणी
१०) श्री. ओमप्रकाश उर्फ बच्चु कडु, आमदार, अचलपूर
११) श्री. मनोहर थके, कृषी तज्ञ, उतावली

### *रायगड :*

**प्रबोधिनी परिवार अधिकारी**

१) श्री. अभिजीत बांगर, (IAS), जिल्हा परिषद, अलिबाग
२) श्री. मंगेश गावडे, CAFO, ZP, अलिबाग
३) श्री. संजय शिंदे, मुख्याधिकारी (CO), नगरपरिषद , महाड

**अन्य मार्गदर्शक**

१) श्री. फड , उपजिल्हाधिकारी,
२) श्री. बाळ कोळेकर, श्रमजीवी संस्था, महाड
३) श्री. सांगले, तहसीलदार, पोलादपूर
४) श्री. भामकर, नायब तहसीलदार, पोलादपूर
५) श्री. वसकारे, मच्छिमार सोसायटी अध्यक्ष, अलीबाग

विद्यार्थ्यांनी आपल्या दौऱ्याचे वृत्तांत powerpoint presentation तयार करून सर्व विद्यार्थ्यांसमोर सादर केले. या निवेदनांच्या वेळी मा. यशवंतराव लेले, मा. सुभाषराव देशपांडे, मा. विवेक पोंक्षे व श्री. विवेक गिरीधारी हे निमंत्रित उपस्थित होते.

## इ) UPSC मुख्य परीक्षा निकाल व सराव मुलाखती :

UPSC मुख्य परीक्षा २०१० चा निकाल मार्च महिन्यात लागला. स्पर्धा परीक्षा केंद्रामध्ये पूर्व-मुख्य-मुलाखत यापैकी एक किंवा त्यापेक्षा अधिक टप्प्यांना मार्गदर्शन घेतलेले ७० विद्यार्थी मुलाखतीसाठी पात्र ठरले. या सर्वांच्या मुलाखती दिल्ली येथे २२ मार्च पासून झाल्या. मुलाखतीनंतर अनेकांचे फोन, इ-मेल आले.

तत्पूर्वी तयारीसाठी आपण सराव मुलाखती आयोजित केल्या होत्या. मुलाखत-त्याचे चित्रीकरण व feedback अशी योजना केली होती. मुलाखती दरम्यान ती इतर विद्यार्थ्यांना पाहता येण्याची सोयही केली होती. विद्यार्थी अन्य ठिकाणी झालेल्या मुलाखतींची CD घेऊन येत होते व त्यावर वैयक्तिक चर्चा व मार्गदर्शन झाले. श्री. महेश भागवत (DIG, हैद्राबाद), श्री. अतुल कुलकर्णी (IPS, IB), श्री. संकेत भोंडवे (IAS, मध्यप्रदेश), श्रीमती किशोरी गद्रे (उपजिल्हाधिकारी), श्री सुजीत बांगर (आयकर उपायुक्त), श्री. संदीप साळुंके (आयकर सहा. आयुक्त), श्री. आनंद आगाशे (ज्येष्ठ पत्रकार), श्री. अभय टिळक (अर्थतज्ज्ञ), श्री. शिरीष जोशी (मानवी संसाधन विकास **तज्ज्ञ), श्रीमती भूषणा करंदीकर (विक्रीकर अधिकारी), श्रीमती नीलाक्षी जठार (ज्येष्ठ अध्यापक), डॉ. विवेकानंद फडके (प्राध्यापक), श्री. सुभाष देशपांडे, डॉ. विवेक कुलकर्णी, सौ. सविता कुलकर्णी यांनी पॅनेल सदस्य म्हणून काम पाहिले. विद्यार्थ्यांना मुलाखतीनंतर अतिशय उत्तम मार्गदर्शन मिळाले व त्याचा उपयोग अंतिम मुलाखतींसाठी झाला.**

### ➢ MPSC (राज्यसेवा) मुख्य परीक्षा

MPSC **च्या मुख्य परीक्षेसाठी अनिवार्य तसेच वैकल्पिक विषयांचे मार्गदर्शन वर्ग झाले. यामधे एकूण ४३७ प्रवेश होते. हे मार्गदर्शन वर्ग जुलै ते ऑक्टोबर या कालावधीत संपन्न झाले. सामान्य अध्ययन, लोकप्रशासन, भूगोल व राज्यशास्त्र या विषयांचे हे मार्गदर्शन** वर्ग होते.

### ➢ अन्य उपक्रम

**१) नियमित सरावपरीक्षा व मार्गदर्शन :** UPSC मुख्य परीक्षा, पूर्वपरीक्षा तसेच MPSC मुख्य परीक्षेसाठी सामान्य अध्ययन तसेच वैकल्पिक विषयांच्या साप्ताहिक तसेच सत्रांत परीक्षा झाल्या. नियमितपणे परीक्षांमध्ये विद्यार्थ्यांच्या गुणांचे अवलोकन करून त्यांना पुढील तयारीविषयी मार्गदर्शन करण्यात आले.

**२) वैयक्तिक अभ्यास समुपदेशन :** MPSC व UPSC च्या सामान्य अध्ययन व वैकल्पिक विषयांच्या वर्गांच्या विद्यार्थ्यांना अनुक्रमानुसार अभ्यासासाठी मार्गदर्शन - समुपदेशन झाले. सर्व विद्यार्थ्यांशी किमान एकदा तर काही जणांशी तीन वेळा सविस्तर भेट व चर्चा झाली. यामध्ये प्रा. सविता कुलकर्णी, विषयशिक्षक व समन्वयक हे तिघेही मार्गदर्शक म्हणून काम पहात होते.

**३) UPSC मुख्य व पूर्व परीक्षा प्रवेश पद्धत :** UPSC मुख्य व पूर्व परीक्षा वर्गाला प्रवेश देण्यासाठी अर्ज आलेल्या विद्यार्थ्यांचे अर्ज तपासून त्यानंतर वैयक्तिक मुलाखती झाल्या. आवश्यकतेनुसार काही जणांना लेखी परीक्षाही देण्यास सांगण्यात आले. त्यानुसारच प्रवेशाची प्रक्रिया करण्यात आली.

**४) कौशल्य प्रशिक्षण :** UPSC व MPSC या दोन्ही वर्गांसाठी अभ्यासपद्धती, नियोजन, सेमिनार, गटचर्चा, निबंधलेखन इत्यादि कौशल्यांचे प्रशिक्षण वर्ग झाले. तसेच या कौशल्यांचा वापर विद्यार्थ्यांनी करावा म्हणून प्रत्येकाची सराव सत्रे झाली आणि त्याचा पाठपुरावा करण्यात आला.

**५) वृत्तीघडण उपक्रम :** नियमित विद्यार्थी संपर्क, वैयक्तिक समुपदेशन, ज्येष्ठ कार्यकर्त्यांचा सहवास अशा अनेक गोष्टींमधून विद्यार्थ्यांची सकारात्मक वृत्ती तयार होण्यास मदत होते.

विविध अधिकाऱ्यांशी भेटी, जिल्हा अभ्यासदौरे, क्षेत्रभेटी यातून कामाविषयीची प्रेरणा वाढते.

नियमित प्रार्थना, साप्ताहिक उपासना व त्यावेळचे चिंतन-मार्गदर्शन यातून एकाग्रचित्ताने ध्येयाचा विचार होतो.

## *Jnana Prabodhini Competitive Examinations Centre 2010-11*

| | General Studies | Pub.Ad. | Geog. | Psycho | Pol.Sci. | Sociology | History | Total |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1) Mission 1200 (UPSC Seniors) | 102 | 136 | 90 | 52 | 23 | 20 | 09 | 432 |
| 2) UPSC Regular | 115 + 82 (WE) | 281 | 165 | 46 | - | - | - | 639 |
| 3) UPSC Prelims | 215 | - | - | - | - | - | - | 215 |
| 4) MPSC Mains | 122 | 189 | 80 | - | 46 | - | - | 437 |
| 5) UPSC Personality Test (Interview) | 80 | - | - | - | - | - | - | 80 |
| 6) MPSC Interview | - | - | - | - | - | - | - | - |
| **Total Students** | **716** | **556** | **335** | **98** | **69** | **20** | **09** | **1803** |

केंद्राचे अनेक जुने विद्यार्थी जे आज विविध ठिकाणी अधिकारी म्हणून काम करत आहेत त्यांच्या भेटी, विद्यार्थ्यांसमोर कामातील अनुभवांचे केलेले कथन यामुळे उत्तमता व ध्येय प्रवणता यांची उदाहरणे पहायला मिळतात. प्रशासकीय यंत्रणेतील चांगल्या उदाहरणांचा वस्तुपाठ मिळतो.

➢ **साधन-सुविधा**

**अ) वर्ग खोल्या - जिज्ञासा व संकल्प या अनुक्रमे १२० व ८० विद्यार्थीक्षमतेच्या वर्ग खोल्या** LCD, ध्वनिवर्धक यंत्रणा या साधनांनी सुसज्ज केल्या आहेत.

**ब) ग्रंथालय -** स्पर्धा परीक्षांना उपयुक्त पाठ्यपुस्तके, संदर्भग्रंथ इत्यादिंचा उत्तम संग्रह. आठ इंग्रजी व आठ मराठी नियतकालिके, चार इंग्रजी व पाच मराठी वर्तमानपत्रे असे अभ्यास साहित्य विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध आहे.

**क) अभ्यासिका -** एकूण २७५ विद्यार्थीक्षमतेच्या संकल्प, जिज्ञासा, विश्वास, प्रेरणा, साधना व आकांक्षा या सहा अभ्यासिका विद्यार्थ्यांसाठी सकाळी ७ ते रात्री ११ या वेळात उपलब्ध आहेत.

**संपर्क -** केंद्रातून निवड झालेल्या सर्व अधिकाऱ्यांचे संपर्क क्रमांक, पत्ते, कामाची ठिकाणे इत्यादि गोष्टी संगणकावर अद्ययावत ठेवण्याचे काम नियमित चालू आहे. सर्वांना इ-मेल द्वारा 'संवाद' हे केंद्राचे अनियतकालिक पाठविण्यात येते.

अनेकजण पुण्यात प्रबोधिनीत आवर्जून भेटायला येतात. मागील वर्षात अशाप्रकारे झालेल्या भेटी -

१) अभिजीत सप्तर्षी UPSC २००८ च्या तुकडीमधे IPS म्हणून निवड होऊन त्रिपुरा येथे कार्यरत आहे. नुकताच पुण्यामध्ये येऊन अभिजीत सपत्नीक भेटून गेला. ईशान्य भारतातील सर्व राज्यांचा या अधिकाऱ्यांचा अनुभव अतिशय चांगला आहे.

२) संजय मेंढे, त्याची पत्नी व छोटा युगांकही भेटून गेले. संजय MPSC चा विद्यार्थी. संजयने स्पर्धा परीक्षा केंद्रात समन्वयक म्हणून तसेच कार्यालयातही काम केले आहे. सध्या तो नागपूर येथे PSI म्हणून काम करत आहे. स्वत:च्या मनाला समाधान वाटेल आणि शांतता लाभेल असे काम केले की बरे वाटते असे तो म्हणतो.

३) कार्यालयीन सहलीच्या निमित्ताने कोकणात गेलो असता परतीच्या प्रवासात माणगाव येथे त्यावेळी उपविभागीय अधिकारी (SDO) म्हणून काम करणारा अभिजीत बांगर (IAS) त्याठिकाणी भेटला. छोट्या धावत्या भेटीत त्याने माणगाव येथील व्यस्त कामाचे अनुभव सांगितले.

४) २००९ च्या UPSC च्या तुकडीचा वैभव निंबाळकर (IPS) हा हैद्राबाद येथील राष्ट्रीय पोलीस ॲकॅडमीमधील प्रशिक्षण संपवून आसाम येथे प्रत्यक्ष कामाचा अनुभव घेण्यासाठी रुजू होण्यास जाण्यापूर्वी प्रबोधिनीत येऊन भेटून गेला.

५) संदीप कदम (IAS) हा सध्या हिमाचल प्रदेशात कार्यरत आहे. दोन दिवस पुण्यामधे आला असताना UPSC विद्यार्थ्यांच्या गटासमोर त्याची सविस्तर मुलाखत सौ. सविताताईंनी घेतली. IPS म्हणून झारखंडमध्ये काम करत असताना त्याला राष्ट्रपतींचे शौर्यपदक जाहीर झाले. त्याच्या झारखंडमधील चित्तथरारक व खूप शिकवणाऱ्या अनुभवांची मांडणी त्याने मुलांसमोर केली.

६) बिपीन अहिरे (IPS) गुजरातमधे कार्यरत आहे. पुण्यामधे आला असता बिपीन भेटून गेला. गुजरातमधील राजकीय स्थितीविषयी तसेच राजकीय व प्रशासकीय यंत्रणांच्या संबंधांविषयी त्याने उत्तम चर्चा केली.

७) निनाद देशपांडे (IFS) हा चीनमध्ये शांघाय येथे सेकंड सेक्रेटरी म्हणून काम करतो. पुण्यात आला असता निनाद, तृप्ती व छोटा अरहन घरी भेटून गेले. चीनमधील बदलती सामाजिक, राजकीय स्थिती, खुल्या अर्थव्यवस्थेचे परिणाम, चीनमधे आढळणारे भारतीय संदर्भ याविषयी खूप गप्पा झाल्या. तृप्तीही तेथील महिला अधिकारी व अधिकाऱ्यांच्या पत्नींचे असलेले गट यामधे भारताचे प्रतिनिधीत्व करते व सांस्कृतिक आदानप्रदान करते.

८) ओंकार मराठे (DANICS Civil Service) हा सध्या लक्षद्वीपमध्ये कवरत्ती येथे काम करतो. ओंकारच्या भेटीत त्याच्या कामाविषयी गप्पा झाल्या.

९) राहुल नांगरे (ICES), स्वाती नांगरे (वित्त व लेखाधिकारी), छोटा राघव व इंदिरा तसेच विद्युत वरखेडकर यांनीही केंद्राला भेट दिली.

१०) ज्ञान प्रबोधिनी स्पर्धा परीक्षा केंद्र परिवारातील ज्येष्ठ पोलीस अधिकारी श्री. सदानंद दाते (प्रमुख, Force I, मुंबई) यांनी केंद्राला कुटुंबासह अनौपचारिक भेट दिली व सर्व अभ्यासिका, विद्यार्थी, त्यांचा अभ्यास तसेच वातावरण पाहून समाधान व्यक्त केले.

११) ज्ञान प्रबोधिनी प्रशालेचे माजी विद्यार्थी ज्येष्ठ पोलीस अधिकारी श्री.अतुल कुलकर्णी (Joint Director, IB, Arunachal Pradesh) यांनीही केंद्राला भेट दिली. त्यांनी मुलाखतीच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व UPSC च्या सर्व विद्यार्थ्यांसमोर अतिशय प्रेरणादायी अनुभवकथन केले.

**अध्यापक बैठका व प्रशिक्षण :** वर्ष सुरू होण्यापूर्वी सर्व अध्यापकांचे पाठनिरीक्षण झाले व त्यावर चर्चा होऊन आवश्यक ते बदल अध्यापकांनी **केले. सर्व अध्यापकांच्या अध्यापनाच्या** feedback विषयी चर्चा तसेच विद्यार्थ्यांच्या **प्रगतीविषयी चर्चा होतात. विद्यार्थी अध्यापकांना अध्यापनपद्धतीच्या कौशल्यांविषयीचे प्रशिक्षण दिले जाते. नियमित बैठकांमधून याविषयीचा पाठपुरावा केला जातो.**

**मानवी संसाधन -** कार्यालयातील सदस्यांची रोज दु. ४ वाजता प्रबोधिनीची प्रार्थना होते. तसेच प्रत्येक सोमवारी बैठक व उपासना होते. प्रशासकीय कामांसाठी १० स्थिर व्यक्ती उपलब्ध आहेत.

तसेच विविध वर्गांच्या व्यवस्थापनासाठी प्रत्येक सत्रामध्ये चार समन्वयक होते. सहा ज्येष्ठ अध्यापक व २० विद्यार्थी अध्यापक, त्याचप्रमाणे २० ज्येष्ठ अधिकारी प्रशिक्षक तसेच तज्ज्ञ पॅनेल सदस्यांनी विविध विषय तसेच मुलाखतींना मार्गदर्शन केले. कार्यालय सदस्यांच्या नियमित साप्ताहिक बैठका झाल्या.

**कार्यालय सहल** - कार्यालय सदस्य, वर्गांचे समन्वयक व शिक्षक अशा गटाची दोन दिवसांची हरिहरेश्वर, श्रीवर्धन, दिवे आगर, जंजिरा अशी सहल दि. ५ व ६ जानेवारी रोजी गेली होती. हरेश्वराचे दर्शन, श्रीवर्धनच्या समुद्रकिनाऱ्यावर सूर्यास्त, समुद्रस्नान, दिवे आगरचे गणपतीदर्शन व बोटीतून जंजिरा किल्ल्याची भेट असा हा कार्यक्रम सर्वांना अतिशय आनंद देणारा ठरला.

**शिष्यवृत्ती** - आर्थिकदृष्ट्या गरजू विद्यार्थी व विद्यार्थिनींसाठी श्री. सदानंद दाते, श्री. वामन पारखी व श्री. व सौ. कुलकर्णी यांनी काही रक्कम स्पर्धा परीक्षा केंद्राकडे सुपूर्त केली होती. त्यातून अनेक गरजू विद्यार्थी-विद्यार्थिनींना शिष्यवृत्ती देऊ केली.

**व्याख्याने** - १) 'स्पर्धा परीक्षांची ओळख व तयारीची पद्धत' याविषयी फर्गसन महाविद्यालयात प्रा. सविता कुलकर्णी यांनी मार्गदर्शन केले. तसेच तेथील स्पर्धा परीक्षा केंद्राचे उद्घाटनही त्यांच्या हस्ते झाले.

२) बृहन्‌ महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालयामध्ये प्रा. सविता कुलकर्णी व रायसोनी व्यवस्थापन महाविद्यालयामध्ये कु.निधी शर्मा यांनी 'स्पर्धा परीक्षांची तयारी' या विषयावर मार्गदर्शन केले.

## ➢ विशेष व्याख्याने

१) UPSC २००९ च्या अंतिम परीक्षेमध्ये यश मिळवून विविध सेवांसाठी अधिकारी म्हणून निवड झालेल्या दहाजणांच्या खुल्या मुलाखती दि. २६ मे व ५ जून रोजी सर्व विद्यार्थ्यांसमोर झाल्या.

२) श्री.प्रशांत वडनेरे (होसूर, तामिळनाडू, IAS) यांचे सर्व गटांसमोर साप्ताहिक उपासनेच्या वेळी प्रेरणादायी व्याख्यान झाले. तसेच UPSC मुख्य परीक्षेचा फॉर्म भरताना राज्यांचे प्राधान्यक्रम देण्याविषयीचे व्याख्यान झाले.

UPSC नियमित वर्गाच्या विद्यार्थ्यांसमोर निर्णयक्षमता व प्रभावी संवाद या विषयावर मार्गदर्शनपर व्याख्यान झाले.

३) प्रशालेतील गणपती उत्सव व्याख्यानमालेत ओरिसा येथे अभ्यास दौरा करून आलेले स्पर्धा परीक्षा केंद्रातील समीर माढेकर, अनिरुद्ध ढगे, निधी शर्मा यांचे 'नक्षलवाद' या विषयावर प्रशालेतील विद्यार्थ्यांना प्रेरणादायी ठरेल असे व्याख्यान झाले.

४) दि. १८ सप्टेंबर २०१० रोजी प्रा. शिरीष शितोळे यांचे 'शिक्षण पद्धती - सद्यस्थिती आणि समस्या' या विषयावर व्याख्यान झाले.

५) दि. २५ सप्टेंबर २०१० रोजी मा. किशोरी गद्रे (उपजिल्हाधिकारी) यांचे 'Good Governance' या विषयावर व्याख्यान झाले.

६) दि. २ ऑक्टोबर २०१० रोजी. सौ. अनुराधा राव जोशी यांचे 'Urban Planning & Pune Metro' यावर व्याख्यान झाले.

७) गडचिरोली येथील मेंढा-लेखा येथील सरपंच **श्री.देवाजी तोफा** यांचे 'स्वत:चा प्रवास' विषयक आत्मकथन मंत्रमुग्ध करणारे ठरले. आदिवासी समाजातील देवाजी यांनी त्यांच्या गावात 'आमच्या गावात आम्हीच सरकार'ही संकल्पना प्रत्यक्षात आणली आहे. त्यांच्या गावात नियमित गावसभा होऊन चर्चेतूनच एकमताने सर्व निर्णय होतात. या गावाने भारतामध्ये सर्वप्रथम गावाला वनहक्क मिळविण्याचा मान मिळवला आहे.

८) चंद्रपूर जिल्ह्यातील राजुरा तालुक्यात मजूरांबरोबर संघटन करून आणि माहितीचा अधिकार व राष्ट्रीय ग्रामीण रोहयो या दोन कायद्यांच्या अभ्यासातून प्रशासनाला कार्यक्षम बनविणारे तरुण कार्यकर्ते **श्री. विजय देठे** यांचे अनुभव विद्यार्थ्यांना खूपच भावले.

**निकाल** : १) UPSC २०१० च्या परीक्षेत केंद्रातील ४५ विद्यार्थी यशस्वी झाले. IAS, IPS, IFS, ICES, IRS व ५ अन्य सेवांमध्ये विद्यार्थ्यांची निवड झाली.

अशाप्रकारे आत्तापर्यत UPSC परीक्षेतून निवड झालेले केंद्राचे २२५ विद्यार्थी-विद्यार्थिनी IAS, IFS, IPS, IRS यासारख्या पदांवर काम करत आहेत. महाराष्ट्रासह २६ राज्यांमध्ये हे सर्वजण कार्यरत आहेत. तसेच तीन देशांमध्ये IFS पदांवर आहेत.

आत्तापर्यंत MPSC परीक्षेतून निवड झालेले केंद्राचे ५८० विद्यार्थी-विद्यार्थिनी महाराष्ट्राच्या विविध जिल्हा, तालुक्यांमध्ये उपजिल्हाधिकारी, पोलीस उपअधीक्षक, गटविकास अधिकारी, तहसीलदार, विक्रीकर अधिकारी यासारख्या पदांवर काम करत आहेत.

२०१०-११ हे वर्ष सर्वाधिक वर्ग व विद्यार्थी संख्या असणारे होते. संपूर्ण वर्षामध्ये कार्यालयीन, आर्थिक, साहित्यविषयक, विद्यार्थी मार्गदर्शन या सर्वांचा भरपूर ताण होता. परंतु नियमित कार्यालय-अध्यापक बैठका तसेच प्रशिक्षण व अनौपचारिक संपर्क यामुळे सर्व गटाने अतिशय मन:पूर्वक ताण पेलला व आपापली कामे चोख केली.

या आर्थिक वर्षामधे स्पर्धा परीक्षा केंद्रामध्ये सुमारे १ कोटी ५० लक्ष रुपयांची उलाढाल झाली.

# नवनगर विद्यालय, निगडी

## ➢ विद्यालयाचा गौरव

महाराष्ट्र प्रज्ञा शोध परीक्षेत अक्षय होनराव यास राज्य शिष्यवृत्ती व कु. स्नेहल ढाकणे हिला जिल्हा शिष्यवृत्ती मिळाली. इ. ७ वी इंग्रजी माध्यमाच्या चि. सुमीत चव्हाण व आदित्य कारखानीस यांस शिष्यवृत्ती परीक्षेत शिष्यवृत्ती मिळाली.

दि. ८ ऑगस्ट रोजी 'स्वामी विवेकानंद केंद्र', चिंचवड तर्फे झालेल्या आंतरशालेय देशभक्तीपर गीत गायन स्पर्धेत आपल्या प्राथमिक विभागाने प्रथम क्रमांक मिळवला.

कै. दिवाकर स्मृती नाट्यछटा स्पर्धेत कु. राधा येळगावकर (इ. २ री) हिने प्रथम क्रमांक मिळविला.

लायन्स क्लब ऑफ पुणे तर्फे घेण्यात आलेल्या वक्तृत्व स्पर्धेत 'आधुनिक दिवाळी' हा विषय घेऊन कु. रूचिका भोंडवे (इ. ५ वी) हिने प्रथम क्रमांक मिळविला.

मातृमंदिर विश्वस्त संस्थेमार्फत घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय निबंध स्पर्धेत चि. विश्वजीत काळे (गुरुकुल) याला तृतीय क्रमांक मिळाला, तर जिल्हास्तरावर चि. सुबोध भांडेकर व चि. सागर वारे यांना तृतीय क्रमांक मिळाला.

स्वामी विवेकानंद जयंतीनिमत्त गुरुकुलाच्या इ. ५ वी ते ८ वी च्या १९९ विद्यार्थ्यांनी एकूण १,५३, ९३१ इतके सूर्यनमस्कार घातले. सर्वाधिक २१२१ सूर्यनमस्कार कु. यश कोलते व कु. योगिनी ढबाले यांनी घातले.

'सोनफूल' या संस्थेतर्फे इ. ९ वी व इ. १० वी च्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित केलेल्या संस्कृत निबंध स्पर्धेत कु. तन्मयी देसाई हिने 'आंतरनालस्य प्रयोजनम्' या विषयावर निबंध सादर करून प्रथम क्रमांक मिळविला.

भगिनी निवेदिता स्मृती शताब्दी संयोजन समिती आयोजित आंतरशालेय वक्तृत्व स्पर्धेत कु. वैष्णवी कुलकर्णी हिने प्रथम क्रमांक मिळवला.

भोपाळ येथे झालेल्या पश्चिम विभागीय मैदानी स्पर्धेत कु. वैष्णवी जरे हिने थाळीफेक या क्रीडाप्रकारात सुवर्णपदक संपादन केले. तसेच कु. सत्यव्वा हळदेकरी हिने ६०० मी. धावणे स्पर्धेत रजत पदक संपादन केले.

इ. ९ वी मध्ये इंग्रजी माध्यमात शिकत असलेला चि. सौरभ भावे याला बेल्जियम येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय रोलर स्केटिंग स्पर्धेत चौथा क्रमांक मिळाला.

दि. २३ ऑगस्ट रोजी दिल्ली येथे झालेल्या 'रिदमिक जिम्नॅस्टिक फेडरेशन कप' स्पर्धेत राष्ट्रीय पातळीवर कु. नेहा गायकवाड या विद्यार्थिनीने सुवर्ण पदक मिळविले.

या वर्षी क्रीडाकुल या विभागातील राष्ट्रीय स्तरावर ॲथलेटिक्स् या खेळप्रकारात एक विद्यार्थिनी प्रथम, एक द्वितीय व दोन विद्यार्थी सहभागी झाले. आंतरविभागीय मल्लखांब स्पर्धा, पतियाळा येथे झाली. या स्पर्धेत चि. संतोष घाडगे प्रथम आला. शालेय कबड्डी स्पर्धा (हिमाचल प्रदेश) येथे तीन विद्यार्थी द्वितीय तर दावणगिरी येथे चार विद्यार्थिनी सहभागी झाल्या. संघटनेच्या योगासन स्पर्धेत (गोवा) दोन विद्यार्थी सहभागी झाले.

## ➢ विद्यार्थी, सहली व शिबिरे

इ. ५ वी, ६ वी, ७ वी च्या विद्यार्थ्यांसाठी माहे एप्रिलमध्ये व्यक्तिमत्त्व विकास शिबिराचे आयोजन करण्यात आले होते, २२० विद्यार्थी सहभागी होते. या शिबिरात नाट्यप्रशिक्षण कथाकथन, हस्तकला, स्थळभेटी या उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

माहे जून-जुलैमध्ये विद्यालयातील सर्व विभागातील विद्यार्थ्यांच्या पावसाळी सहली जाऊन आल्या. पावसात भिजण्याचा आनंद लुटणे, बहरलेल्या निसर्गाचे निरीक्षण करणे, दुधासारख्या पांढऱ्या स्वच्छ धबधब्यामध्ये भिजणे आणि त्या परिसरातील ऐतिहासिक, भौगोलिक माहिती मिळवणे इ. उद्देशांना अनुसरून या सहलींचे आयोजन केले जाते.

गुरुकुलातील ५१ विद्यार्थ्यांची पुणे ते सातारा अशा ३२६ कि. मी. ची सायकल सहल आयोजित करण्यात आली होती. दि. १०, ११ व १२ फेब्रुवारी दरम्यान ही सहल होती. निश्चयपर्वूक पराक्रम करणे, तहान-भूक बाजूला ठेवून ध्येयासाठी झटणे, आपण म्हणू ते करू शकतो असा आत्मविश्वास निर्माण होणे यासाठी ही सहल अत्यंत उपयोगी झाली. तळेगाव येथील स्वातंत्र्यवीर सावरकर प्रबोधिनीच्या गुरुकुलाचे ४४ विद्यार्थी व दोन अध्यापिका या सहलीत सहभागी झाले होते.

दि. २८, २९ व ३० डिसेंबर रोजी माध्यमिक विभागात बालकुमार साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. या साहित्य संमेलनाचे उद्घाटन पिंपरी-चिंचवडमधील प्रसिद्ध कवयित्री सौ. स्वाती ठकार यांच्या हस्ते झाले. कविता कशा कराव्यात याविषयी त्यांनी मार्गदर्शन केले. या साहित्य संमेलनात ग्रंथदिंडी, हस्तलिखिते, तक्त्यांचे प्रदर्शन, कथाकथन, वक्तृत्व, नाट्यछटा, काव्यवाचन आदि सत्रांचे आयोजन करण्यात आले होते. या संमेलनाचा समारोप विद्यावाचस्पती सौ. अश्विनीताई धोंगडे यांच्या उपस्थितीत पार पडला. मनुष्यजीवनात छंदाच्या साहाय्याने आनंद मिळविता येतो. साहित्य वाचन व साहित्य निर्मिती हा छंद प्रकारही उत्तम आहे. या दृष्टीने साहित्याची जिज्ञासा वाढविणारे हे साहित्य संमेलन विद्यार्थ्यांसाठी अतिशय उपयुक्त असे झाले.

यावर्षी इ. ५ वी ते १० वी च्या गुरुकुलातील विद्यार्थ्यांची १०-१० दिवसांची इयत्तेनुसार मातृभूमी परिचय शिबिरे झाली. आई-वडिलांपासून दूर राहणे, त्या परिसरातील लोकजीवनाचा अभ्यास करणे, त्याठिकाणची ऐतिहासिक, भौगोलिक माहिती मिळवणे हे प्रमुख उद्देश या शिबिराचे होते. इ. ५ वी चे दौंड तालुक्यातील वरवंड येथे, इ. ६ वी चे शिबिर मुरूड

तालुक्यातील दापोली येथे, इ ७ वी चे शिबिर वर्धा येथे, इ. ९ वी चे शिबिर कर्नाटकात गुलबर्गा येथे, इ. १० वी चे शिबिर हरिद्वार येथे संपन्न झाले. इ. ८ वी चे विद्यार्थी तीन गटात विभागले होते. इ. ५वी, ६वी, ७वी सोबत हे विद्यार्थी सहभागी झाले होते.

इ. ८ वीच्या विद्यार्थ्यांचे एकूण सात गट सेवा शिबिरासाठी जाऊन आले. सिल्लोड (जि. औरंगाबाद), त्रिमली (जि. सातारा), उरळी कांचन (जि. पुणे), वरवंड (जि. पुणे), माळेवाडी (जि. उस्मानाबाद), नातेपुते (जि. सोलापूर), राजगुरुनगर (पुणे) या ठिकाणी ही शिबिरे संपन्न झाली. अध्यापकांच्या मदतीशिवाय विद्यार्थ्यांनी ही शिबिरे घेतली. तेथे त्यांनी शाळांमधील मुलांचे सूर्यनमस्कार व खेळ घेतले. काही पोवाडे व पद्येही शिकवली. हस्तकला, नाट्याभिनय, श्रमदान, व्यक्तिपरिचय, स्थळभेटी इ. उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

इ. ९वी व १०वी च्या माध्यमिक विभागातील विद्यार्थ्यांची दोन दिवसांची 'विदर्भ सहल' आयोजित केली होती. या सहलीत १४४ विद्यार्थी व १० अध्यापक सहभागी झाले. सेवाग्राम, पवनार, आनंदवन, ताडोबा इ. स्थळांना अभ्यासपूर्ण भेटी झाल्या.

## ➢ विद्यार्थी प्रबोधन व सादरीकरण

गणेशोत्सवानिमित्त इ. ९ वी व १० वी च्या विद्यार्थ्यांसाठी 'संघटना' हे मूळ सूत्र धरून व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली होती. व्याख्यानमालेचे विषय व वक्ते खालीलप्रमाणे

| | | |
|---|---|---|
| ग्राहक चळवळ व संघटना | : | श्री. बिंदुमाधव जोशी |
| वंचित विकास संघटना | : | श्रीमती सुनिताताई जोगळेकर |
| सामाजिक संघटना व कार्य | : | श्रीमती नीलम गोऱ्हे |
| रामदासांचे संघटना सूत्र | : | श्री. मिलिंद टिळक |

स्पिक मॅके व मुक्ती सोपान संगीत विद्यालय आयोजित 'शास्त्रीय संगीत' कार्यशाळेत विद्यालयातील साठ विद्यार्थी-विद्यार्थिनी सहभागी झाले. पंडित रघुनंदन पणशीकर यांनी ही कार्यशाळा घेतली. या कार्यशाळेत शास्त्रीय संगीताविषयी प्राथमिक माहिती देण्यात आली व संगीताची काही प्रात्यक्षिकेही घेण्यात आली. अन्य शाळेतील विद्यार्थ्यांनी व पालकांनीसुद्धा या कार्यशाळेचा लाभ घेतला.

धनत्रयोदशीला मुक्ती सोपान संगीत विद्यालयातर्फे पंडित रघुनंदन पणशीकर यांचा 'दिवाळी पहाट' हा शास्त्रीय संगीतावर आधारित कार्यक्रम झाला. सुमारे ६० विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमाचा आस्वाद घेतला.

दि. २१ जानेवारी संध्याकाळी ४ ते ६ या वेळेत पूर्व प्राथमिक विभागातील विद्यार्थ्यांच्या क्रीडाप्रात्यक्षिकांचा कार्यक्रम घेण्यात आला. नेत्र-हस्त समन्वय, सांघिक कृती, मनोरंजन आदि उद्दिष्टांना अनुसरून ही प्रात्यक्षिके घेण्यात आली. मा. संचालक या कार्यक्रमाचे प्रमुख अभ्यागत होते. त्यांनी 'स्पर्धा'या विषयावर पालकांशी संवाद साधला.

दि. २४ फेब्रुवारी रोजी सकाळी ८.३० ते १० या वेळेत आंतरशालेय संस्कृत श्लोक पाठांतर स्पर्धा घेण्यात आली. एकूण ३८० विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग घेतला. एकूण दहा शाळांमधून हे विद्यार्थी आले होते. विद्यार्थ्यांमध्ये संस्कृतची आवड निर्माण व्हावी हा या स्पर्धेचा उद्देश होता.

गुरुकुल विभागात 'विज्ञान महोत्सवाचे' आयोजन करण्यात आले होते. इ. ५ वी ते १० वी च्या विद्यार्थ्यांसाठी प्रश्नमंजूषा व विज्ञानकथालेखन या स्पर्धा घेण्यात आल्या. तसेच विविध विषयांवरील उपकरणेही बनविण्यात आली. एकूण दीडशे उपकरणे विद्यार्थ्यांनी प्रदर्शनात मांडली व आलेल्या पालकांना या उपकरणांविषयी माहिती दिली.

दि. ७ ते १२ मार्च दरम्यान प्राथमिक विभागात वर्गप्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. विज्ञान, भूगोल व इतिहास या विषयांना अनुसरून विविध उपकरणे विद्यार्थ्यांनी प्रदर्शनात मांडलेली होती. अतिशय उत्साहाने विद्यार्थी बघणाऱ्यांना माहिती देत होते.

दि. ९ एप्रिल रोजी पूर्वप्राथमिक विभागातील विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन आयोजित करण्यात आले होते. देशभक्तीपर गीते, बडबड गीते, पर्यावरणावर आधारित छोट्या नाटिका विद्यार्थ्यांनी सादर केल्या. पालकांनी व उपस्थितांनी या कार्यक्रमाला भरघोस प्रतिसाद दिला.

## ➢ अध्यापक प्रशिक्षण, सहली व शिबिरे

दि. १० व १२ जून रोजी निगडी केंद्रातील सर्व सदस्यांसाठी अध्यापक प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सर्व विभागातील १२५ सदस्य या शिबिरात सहभागी झाले होते. या शिबिरात शैक्षणिक संघटनेतील व्यवस्था व गटांचे व्यवस्थापन, मूल्यमापन व शिक्षणातील नवीन प्रवाह (ज्ञानरचनावाद) या विषयांवर व्याख्याने झाली.

दि.८ व ९ जून रोजी सोलापूर येथे शिशुवर्गाच्या अध्यापिकांचे प्रशिक्षण शिबिर झाले. या शिबिरात पूर्वप्राथमिक विभागातील पाच अध्यापिका सहभागी झाल्या होत्या. मा.उषाताई खिरे यांनी बाल शिक्षणाची ध्येय-धोरणे आणि त्यासाठीचे उपक्रम याविषयी मार्गदर्शन केले.

मा. श्री. विवेकराव पोंक्षे यांची 'उपक्रमांची उद्दिष्टे निश्चिती' या विषयांवर माध्यमिक विभागातील अध्यापकांसाठी प्रबोधनपर दोन कृतीसत्रे झाली. या कृतीसत्रांमध्ये हेतू व उद्दिष्टे यातील भेद समजला. उद्दिष्टे ही स्पष्ट, मोजता येतील अशी असावीत तसेच ती साध्य करता यावीत याविषयी उदाहरणांच्या साह्याने पोंक्षेसरांनी समर्पक मार्गदर्शन केले.

दि. २,३ व ४ जानेवारी रोजी बारामती येथे गुरुकुल अध्यापक प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रशिक्षण वर्गात दहा गुरुकुलांचे मिळून ५० अध्यापक सहभागी होते. पंचकोश विकसन म्हणजे काय, अध्यापक म्हणून माझी भूमिका, स्वयंअध्ययन विकास,आम्हांला याचा अभिमान वाटतो, पालकसंपर्क व सहभाग इ. सत्रांचे आयोजन करण्यात आले. मा. श्री. वा. ना. अभ्यंकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा वर्ग संपन्न झाला.

## ➢ कार्यक्रम, स्पर्धा व समारंभ

दि. ५ जुलै रोजी प्राथमिक विभागातील विद्यार्थ्यांसाठी 'कौतुक समारंभ' आयोजित करण्यात आला होता. श्री. वाघोलीकर प्रमुख पाहुणे

होते. त्यांनी दान कसे करावे ? या विषयावर गोष्ट सांगून मार्गदर्शन केले. इ. १ली ते ४ थीच्या अष्टपैलू विद्यार्थ्यांना बक्षिसे देण्यात आली.

दि. १४ जून रोजी सकाळी ८.३० ते १०.३० या वेळात गुरुकुलाच्या इ. ८ वी च्या विद्यार्थ्यांसाठी 'विद्याव्रत संस्काराचे' आयोजन करण्यात आले होते. यावेळी आचार्य म्हणून श्री. रविंद्रजी मुळे (संस्कृत वि. प्रा. पुणे विद्यापीठ) व आचार्या म्हणून श्रीमती वसुंधराताई श्रीरसागर (व्यवस्थापिका बारामती, गुरुकुल) हे होते.

दि. २२ जून हा दिवस निगडी केंद्राचा वर्धापन दिन वर्षारंभ समारंभाने साजरा करण्यात आला. मा. भाऊंनी 'संघटना' या विषयाचे नेमकेपण लक्षात आणून देणारे मार्गदर्शन केले. सर्व विभागातील सदस्यांनी प्रातिनिधिक स्वरूपात संकल्प वाचन केले. विभाग प्रमुखांनी विभागाचे संकल्प मांडले. त्यानंतर श्री. विवेक कुलकर्णी यांचे विद्यार्थ्यांचे अधिमित्र (Mentor) या विषयावर मार्गदर्शनपर व्याख्यान झाले.

दि. १२ ऑगस्ट रोजी इ. ५ वी व ६ वी च्या सर्व विद्यार्थ्यांसाठी 'विद्यारंभ संस्काराचे' आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या प्रमुख अभ्यागत सौ. सुनंदाताई पुणतांबेकर ह्या होत्या. त्यांनी विद्यार्थ्यांनी आपले चित्त एकाग्र करायला शिकावे, स्वयंशिस्त अंगी बाणवावी व स्वावलंबी जीवन जगावे असा संदेश दिला.

दि. ३१ जुलै रोजी मुक्ती सोपान संगीत विद्यालयाचा पाचवा वर्धापन दिन व गुरुपूजन असा दुहेरी कार्यक्रम झाला. संगीत अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांचे शास्त्रीय गायन, पेटी व तबला वादन झाले. पिंपरी-चिंचवडमधील संगीताचे ज्येष्ठ उपासक पं. विद्याधर कुलकर्णी हे अध्यक्ष होते. गुरूंवर श्रद्धा ठेवून संगीताची साधना केल्यास संगीत अवगत करता येते असा मोलाचा सल्ला त्यांनी दिला.

दि. २६ जुलै रोजी मातृमंदिर विश्वस्त संस्था आयोजित 'गुरुपौर्णिमे'चा कार्यक्रम साजरा करण्यात आला. या वेळी विविध पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. त्यातील काही महत्त्वाचे पुरस्कार असे : १) अध्यापकोत्तम पुरस्कार - श्री. राजेश आहिरे, २) गुरुगौरव पुरस्कार - श्री. शिरीष पटवर्धन ३) राधामाता पुरस्कार - श्रीमती मंगला चिक्षे, ४) विद्वत तपस्वी पुरस्कार - डॉ. प्र. ल. गावडे यांना प्रदान करण्यात आला.

दि. ११ ऑक्टोबर रोजी ग्रंथालयामध्ये ग्रंथप्रदर्शन व सरस्वती पूजनाचा कार्यक्रम साजरा करण्यात आला. चार वेळा नर्मदा परिक्रमा करणारे श्री. जगन्नाथ कुंटे हे प्रमुख अभ्यागत होते. यावेळी त्यांनी नर्मदा परिक्रमेविषयी माहिती सांगितली.

दि. २२ जानेवारी रोजी क्रीडाकुल विभागाचा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ संपन्न झाला. या वेळी प्रमुख अभ्यागत म्हणून मा. श्री. विजय नायर उपस्थित होते. यावेळी राज्यस्तरावर विजयी झालेल्या १७ खेळाडूंना पारितोषिके देऊन गौरविण्यात आले.

दि. २६, २७ आणि २८ जानेवारी दरम्यान मनोहर सभागृहाचे उद्घाटन झाले. कै. मनोहर वाढोकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ श्री. दत्तात्रय वाढोकर यांनी या सभागृहास भरीव देणगी दिली. केंद्रातील सर्व सदस्यांनी एकूण दीड कोटी रूपये देणगीतून गोळा केले.

या सोहळ्याची सुरुवात ज्ञान प्रबोधिनीच्या माजी विद्यार्थी मेळाव्याने झाली. या मेळाव्याचे सूत्रसंचालन डॉ. विश्वास मेहेंदळे यांनी आपल्या खास शैलीत केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. विवेक कुलकर्णी यांनी जेथे गरज आहे तेथे प्रबोधिनीच्या माजी विद्यार्थ्यांनी कार्य करावे असे आवाहन केले. या मेळाव्यात सुमारे ३०० माजी विद्यार्थी सहभागी होते. प्रतिभा दलाल, नचिकेत देव, सीमा शेख आदिंनी आपल्या विद्यालयाविषयीच्या आठवणी आपल्या बोलण्यातून व्यक्त केल्या. दुसऱ्या दिवशी वास्तुशांतीचा कार्यक्रम श्री. व सौ. वाढोकर यांच्या उपस्थितीत श्री. वा. ना. अभ्यंकर यांनी केलेल्या वास्तूपूजनाने संपन्न झाला. दु. ४ ते ६ या वेळेत उद्घाटनाचा मुख्य कार्यक्रम झाला. या वेळी सभागृहाच्या बांधकामासाठी भरीव अर्थसहाय्य करणाऱ्या दात्यांचा सत्कार करण्यात आला. विद्यालयाच्या पायाभरणीपासून ते आजपर्यंत विद्यालयास विविध प्रकारची मदत करणाऱ्या देणगीदारांबद्दल कृतज्ञता व्यक्त करणाऱ्या 'दातृत्व' या स्मरणिकेचे प्रकाशन कार्यक्रमाचे प्रमुख अभ्यागत श्री. प्रमोद चौधरी (संचालक, प्राज उद्योग समूह) यांच्या हस्ते झाले. या वेळी आपल्या भाषणात श्री. चौधरी म्हणाले की, 'पुण्याच्याच नव्हे तर महाराष्ट्राच्या दृष्टीने ज्ञान प्रबोधिनीचे काम भूषणावह आहे.' सायंकाळी श्री. समीर दुबळे व त्यांच्या साथीदारांनी संगीताच्या रंगलेल्या मैफलीने या दिवसाची सांगता केली.

तिसऱ्या दिवशी स्पिक मॅके संस्थेतर्फे कर्नाटकी लोकसंगीतावर आधारित 'यक्षगान' हा शालेय विद्यार्थ्यांसाठी रामायण कथेवर आधारित कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. नृत्य, नाट्य, गायन, वादन, नेपथ्य, वेशभूषा या सर्वांचा एकत्रित आविष्कार या कार्यक्रमातून प्रकट झाला. कलेला भाषेचा अडसर नाही याचा प्रत्यय वेळोवेळी येत होता. टाळ्यांच्या कडकडाटांनी विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. सायंकाळी देशभक्तीपर गीतांच्या 'जागो हिंदुस्थानी' या कार्यक्रमाने सोहळ्याची सांगता झाली. अपेक्षेपेक्षा जास्त अशी प्रेक्षकांची उत्स्फूर्त दाद या कार्यक्रमाला मिळाली. पिंपरी-चिंचवडच्या परिसरात कलेच्या साधनेसाठी 'भव्य व्यासपीठ' या सभागृहाच्या रूपाने ज्ञान प्रबोधिनी निगडी केंद्रात उभारले आहे.

## ➢ सत्कार, पुरस्कार व नवनिर्मिती

दि. ५ सप्टेंबर रोजी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेतर्फे मा. सौ. सुनंदाताई पुणतांबेकर यांना गुणवंत शिक्षक पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

कार्यालयात काम करणारे श्री. महादेव दत्तू पांचाळ यांचा पुणे जिल्हा माध्य व उच्च माध्य. शाळा मुख्याध्यापक संघातर्फे कार्यालयातील उत्कृष्ट कामाबद्दल 'जिल्हास्तरीय गुणवंत पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले.

दि. १७ मार्च ते २४ मार्च दरम्यान मातृमंदिर विश्वस्त संस्थेने भागवत सप्ताहाचे आयोजन केले होते. प्रवचनकार श्री. वा. ना. अभ्यंकर यांच्या सुमधूर वाणीने सर्व श्रोते तृप्त झाले. त्यांचा हा २७ वा भागवत सप्ताह 'मनोहर' सभागृहात संपन्न झाला.

मातृमंदिर विश्वस्त संस्था आयोजित राज्यस्तरीय निबंध स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ दि. २० सप्टेंबर रोजी संपन्न झाला. निगडी केंद्रातील सदस्यांना पुढील प्रमाणे यश मिळाले. निबंध लेखन द्वितीय (संस्कृत) सौ. वैदेहीताई देशमुख, तृतीय क्रमांक (मराठी) - सौ. भारती नायडू, नाट्यउतारा सादरीकरण द्वितीय - सौ. अश्विनीताई इनामदार, तृतीय - श्री. समाधान सुसर, स्तोत्र लेखन - प्रथम क्रमांक सौ. छायाताई पाखरे, द्वितीय श्री. समाधान सुसर.

याच कार्यक्रमाचे प्रमुख अभ्यागत श्री. नंदकुमार मराठे यांचे हस्ते सौ. छायाताई पाखरे लिखित 'त्रिदल' या पुस्तिकेचे प्रकाशन झाले. कविता, भारुड आणि नाट्यप्रवेश या तीन दलांचा संगम या पुस्तिकेत आहे.

यावर्षी पूर्व प्राथमिक विभागात अध्यापिकांनी तयार केलेल्या 'गाण्याच्या चांदण्या' व 'Play with Action' या दोन पुस्तिकांचे प्रकाशन मा. श्री. प्रितम नागणे व मा. श्री. अमोल चित्ते यांच्या हस्ते झाले.

### ➢ समाजसंपर्क

संघटन वर्षानिमित्त यावर्षी निगडी केंद्राने असा संकल्प केला होता की 'अन्य शाळांतील १,००० विद्यार्थ्यांसाठी दीक्षाग्रहण संस्काराचे आयोजन करणे'. संकल्पपूर्तीसाठी सर्व सदस्यांचे एकूण दहा गट करण्यात आले होते. शाळांशी संपर्क करून अध्यापिकांची पूर्वतयारी करून घेण्यात आली. सर्व गटांसाठी 'व्यक्तिविकासासाठी विद्याव्रत', विद्याव्रत संस्कार (पंचकोश विकसनाचा संकल्प), 'व्यक्तिमत्त्वाचे पैलू'ही पुस्तके अभ्यासासाठी उपलब्ध करून देण्यात आली. विषयांची निश्चिती, पुस्तकांचे वाचन व स्वतःच्या विषयाची टिपणे काढून झाल्यानंतर सर्व गटातील समान विषयावर व्याख्यान देणाऱ्या अध्यापकांसाठी ३-३ तासांची प्रदीर्घ बैठक घेण्यात आली. काही सदस्यांनी नव्यानेच हे विषय हाताळले होते. व्याख्यान कसे द्यावे, विद्याव्रत संस्कार कसा घ्यावा, याची व उपासनेची तयारी मुक्ती सोपान संगीत विद्यालयाच्या मदतीने करून घेण्यात आली. प्रत्येक शाळेमधील इ. ८वी चे वर्गाध्यापक, पालक, विद्यार्थी यांच्याशी विद्याव्रत संस्काराबद्दल चर्चा करण्यात आली व विद्याव्रत संस्काराचे महत्त्व पटवून देण्यात आले. व्याख्यानांनंतर पूर्ण तयारीने त्या त्या शाळांमधून हा संस्कार घेण्यात आला. एकूण नऊ शाळांमधील ८१० विद्यार्थ्यांसाठी या संस्काराचे आयोजन करण्यात आले होते. या संस्काराच्या आयोजनामुळे सर्व विभागातील सदस्यांमध्ये आंतरक्रिया वाढली, सर्व सदस्यांना या संस्काराचे महत्त्व पटले. शाळांमधील अध्यापक, पालक व मुख्याध्यापकांनी दरवर्षी या संस्काराचे आयोजन केले जावे अशी विनंती केली.

दि. ४ जुलै रोजी संत तुकाराम महाराजांच्या पालखीचे स्वागत इ. ५ वी व ६ वी च्या विद्यार्थ्यांनी केले. यावेळी वारकऱ्यांच्या मुलाखती घेणे, पावल्या खेळणे व अभंग म्हणण्याचा अनुभव सर्वांनी घेतला. तसेच आषाढी एकादशीला हे विद्यार्थी व गुरुकुलाचे इ. ८ वी चे विद्यार्थी पायी चालत वारीचा अनुभव घेत देहूला श्री विठ्ठलाच्या व संत तुकाराम महाराजांच्या दर्शनासाठी गेले होते.

### ➢ युवक-युवती विभाग

माहे वैशाख मध्ये युवक विभागाची प्रदीर्घ बैठक झाली. पहिल्या दिवशी निवडक गटासाठी ज्ञान प्रबोधिनीची उद्दिष्टे तसेच युवक विभागाची उद्दिष्टे व कार्यपद्धती ही दोन सत्रे मा. संचालकांनी घेतली. तसेच 'हिंदू जीवनदृष्टी' या विषयावर प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून मा. भाऊंनी मार्गदर्शन केले. प्रा. मनोज देवळेकरांनी पथक पद्धतीमधील कामाची दिशा काय आहे, हे एका सत्रात मांडले. 'मी पाहिलेले समाजसेवक' या विषयावर प्रा. बागेश्री पोंक्षे यांनी अनुभव कथन केले.

दुसऱ्या दिवशी मा. सुभाषरावांनी 'व्यक्तिगत नियोजन' या विषयावरचे सत्र घेतले. प्रा. संगीताताईंनी दोन सत्रांमध्ये मिळून 'मागील वर्षीचा शोध-बोध तसेच पुढील वर्षीच्या शालेय गटाच्या कामाचे नियोजन या विषयावर सत्र घेतले. श्री. मनोजराव देवळेकरांनी समारोपात्मक मार्गदर्शन केले.

**पंजाब सहल** : दि. ८ ते ११ मे या दरम्यान युवकांचा बारा जणांचा गट पंजाब येथे सहलीसाठी जाऊन आला. अमृतसर, चंदीगढ, सिमला या ठिकाणी प्रामुख्याने भेटी झाल्या. 'वाघा' सीमारेषा, भाक्रानांगल धरण, सुवर्ण मंदिर, संत नामदेव समाधी, जालीयनवाला बाग येथेही भेटी झाल्या.

दि. १९ ते २७ मे या कालावधीत युवती विभागाचा गुजरात अभ्यास दौरा झाला. या दौऱ्यात बारा युवती सहभागी झाल्या होत्या. आणंद येथील अमूल व अहमदाबाद येथील SEWA (Self Employed Women Association) या दोन संस्थांना भेटी देऊन त्यांचा अभ्यास करण्यात आला.

### ➢ पालक प्रबोधन व संघटन

या वर्षी पूर्व प्राथमिक विभागात पालकांसाठी एकूण दहा कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेतील विषय आणि वक्ते खालीलप्रमाणे :

| | |
|---|---|
| संस्कार | : प्रा. शारदाताई चोरडिया |
| संगीतावरील मुक्त हालचाली | : प्रा. कल्पनाताई संचेती |
| मुलांच्या भावी आयुष्याचा पाया | : मा. शरदराव संचेती |
| मुलांचा भावनिक विकास | : वा. सुजलाताई वाटवे |
| मुलांच्या संगोपनात पालकांचा सहभाग | : प्रा. सुमनताई शेणॉय |
| मुलांचे आरोग्य | : डॉ. सुनील गोडबोले |
| मनाचे आरोग्य | : ॲड. सौ. अंजलीताई भाडळे |
| बालसंगीत | : प्रा. अनुराधाताई पंडित |
| आजच्या काळातील आईची भूमिका | : श्री. वा. ना. अभ्यंकर |
| संभाषण कौशल्ये | : श्री. व. ह. भूमकर |

दि. ३ जुलै रोजी माध्यमिक विभागात 'पालक दलाची' योजना कार्यान्वित करण्यात आली. उपासना, वाचन आणि दल अशी दर शनिवारी स. ७ ते ८.३० या वेळेत योजना होती. वर्षभर सुमारे २० ते २५ पुरुष

पालक व ४ ते ५ महिला पालक या दलात सहभागी असायचे.

दि. ८ जुलै रोजी पूर्व प्राथमिक विभागात पालक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. मा. मनोजराव देवळेकर यांनी 'संघटना हे सूत्र बनावे' या विषयांवर पालकांशी संवाद साधला. नंतर गटागटाने कृती सत्र घेण्यात आले.

दि. २८ एप्रिल रोजी स. १०.३० ते दु. ४.३० या कालावधीत क्रीडाकुल विभागात 'पालक कार्यशाळे'चे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत एकूण चार सत्रे झाली. पहिल्या सत्रात डॉ. संज्योत देशपांडे यांनी 'मुलांशी मैत्री' करूयात या विषयावर पालकांना अतिशय मार्मिक शब्दात मार्गदर्शन केले. मुलांचे भावविश्व, पालकांकडून त्यांच्या अपेक्षा या मुद्यांवर चर्चा झाली. दुसऱ्या सत्रात प्रसिद्ध कुस्ती प्रशिक्षक श्री. रामचंद्र सारंग यांनी यशस्वी खेळाडू घडविण्याच्या प्रक्रियेत पालकांची नेमकी भूमिका काय, याबद्दल मार्गदर्शन केले. त्यानंतर कुस्तीगीर श्री. नंदू आबदार व महेश वरूडे यांची मुलाखत श्री. विश्वास मेहेंदळे यांनी खास रंजक शैलीत घेतली. पुढील सत्रात सौ. गीता मुथ्था यांनी विशेष योग्यता प्राप्त खेळाडूंचे 'मानसिक आरोग्य' मानस विभागात कशा पद्धतीने राखले जाते, याविषयी माहिती दिली. चवथ्या सत्रात वैद्य सौ. दिप्ती धर्माधिकारी यांनी खेळाडूंचा आहार-विहार कसा असावा याबद्दल मार्गदर्शन केले.

कै. मनोहर दत्तात्रय वाढोकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ मिळालेल्या देणगीतून व अन्य सुहृदांच्या देणग्यांच्या पाठिंब्यातून निगडी येथे नवनगर विद्यालयाच्या आवारात उभारलेले मनोहर सभागृह.

# संघटन प्रभाग

## युवक विभाग

या कालावधीमध्ये युवक विभागात पुढील प्रमाणे दले चालू होती

| ठिकाण / वयोगट | किशोर | कुमार | युवक |
|---|---|---|---|
| मध्यवर्ती | स्वातंत्र्यवीर सावरकर दल | डॉ. बाबासाहेब आंबेडकर दल + साहा दले | नेताजी सुभाषचंद्र दल + शहीद भगतसिंह दल |
| कर्वेनगर | क्रांतीवीर चाफेकर दल | | डॉ. विक्रम साराभाई दल |
| कोथरूड | महाराणा प्रताप दल | | चंद्रशेखर आझाद दल |
| गोखलेनगर | आर्य चाणक्य दल | | -- |
| शुक्रवार पेठ | धर्मवीर संभाजी दल | | -- |
| सहकारनगर | छत्रपती शिवाजी दल | | लोकमान्य टिळक दल |

* वरील सर्व दलांवर कबड्डी, खो-खो, व्हॉलीबॉल, फुटबॉल, छोटे खेळ इ. खेळ होतात. विज्ञान दलात प्रकल्प, प्रयोग इ. अनौपचारिकशिक्षण प्रकारांचा उपयोग केला जातो. सर्व दलांवर पद्य व अनेक विषयांवर प्रासंगिके नियमितपणे झाली. काही दलांवर अभ्यासिकाही नियमितपणे चालू झाल्या.

**पालखी सोहळा :** मागील वर्षीच्या आषाढी एकादशीच्या वातावरणाचा अनुभव अधिक समृद्ध करण्यासाठी दुसऱ्या वर्षीही युवक विभागाने कर्वेनगर भागात दिंडीचे आयोजन केले होते. क्रां. चाफेकर दल जेथे भरते तेथील मनमोहन सोसायटीच्या मैदानापासून भागातील विठ्ठल मंदिरापर्यंत दिंडी गेली. पालकांचे पथक हे या वर्षीचे एक नवीन आकर्षण होते. अनेक पालकांनी पारंपरिक खेळ करून दाखवले व उत्साहाने सहभाग घेतला.

**गणेशोत्सव :** एक वर्षाच्या विरामानंतर आलेल्या गणेशोत्सवात सर्वच दलांवरील सर्वच प्रबोधकांनी अतिशय उत्साहाने सहभाग घेतला. अथर्वशीर्षाचे घरोघर प्रात्यक्षिक ही योजना मंडळांसमोरील अथर्वशीर्षाच्या प्रात्यक्षिकांसह राबवली गेली. सर्व दलांनी ३-४ स्थिर प्रात्यक्षिके व एक-दोन मिरवणूका या पद्धतीने अनेक मंडळांसमोर बर्चीनृत्याचे सादरीकरण केले. यावर्षी मुंबईच्या रुईया नाका मंडळाची मोठी मिरवणूकही एका पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली व तसेच प्रथमच वेल्ह्यातही प्रबोधिनीचे युवकांचे बर्चीपथक गावच्या मिरवणुकीत सहभागी झाले होते.

विज्ञान दलाने ''छोट्या प्रयोगातून विज्ञान'' असे प्रदर्शन भरविले होते. त्यास सुमारे ५,००० लोकांनी भेट दिली. ''दल'' या विषयावर छोटी पुस्तिका तयार करून विक्रीस उपलब्ध केली होती. तिच्या ७०० प्रती विकल्या गेल्या.

➢ **शिबिरे**

**अभ्यास शिबिरे :** साराभाई दलाचे अभ्यास शिबिर (इ. १०वी व १२ वी) वास्तूत झाले. दादोजी कोंडदेवांचा पुतळा हलविणे या कृतीचा निषेध म्हणून अभ्यास शिबिरातील सर्व सदस्य व युवक विभागातील अनेक सदस्य पुण्यातील मोर्च्यात सहभागी झाले होते.

**फटाके विक्री :** दरवर्षी प्रमाणे याही वर्षी उत्साहाने फटाके विक्री झाली. सुमारे ४०० प्रबोधक व ४० मार्गदर्शक या विक्रीमध्ये सहभागी झाले होते.

**प्रात्यक्षिके :** प्रत्येक भागातील प्रत्येक दलाच्या गटाचे खेळांचे प्रात्यक्षिक अशा स्वरुपापासून युवक विभागाची सामूहिक ताकद दाखविणारी क्रीडा प्रात्यक्षिके असा मोठा बदल या वर्षीच्या क्रीडा प्रात्यक्षिकांमध्ये घडून आला. विविध भागातील दोन दलांनी मिळून प्रात्यक्षिकांमध्ये एकत्र गट म्हणून सहभागी होणे हा सामूहिकतेचा एक प्रमुख आविष्कार होता. सर्व गटांचे एकत्र संचलन, उत्तरोत्तर संख्येने वाढत जाणाऱ्या गटांचे एका पाठोपाठ सादरीकरण, सर्व प्रबोधकांचे मैदानात एकत्र येऊन जोर मारणे व नंतर सर्वांनीच एकत्र पद्य म्हणणे असे सामूहिकतेचे दर्शन या प्रात्यक्षिकांच्या निमित्ताने बालशिक्षण मंदिर येथे जमलेल्या सुमारे १७०० प्रेक्षकांना दि२३जानेवारी रोजी घडविण्यात आले.

जागी झाल्यावर एखादी ताकद रचनात्मक कामही करु शकते व विध्वंसात्मक कामही सामूहिकतेच्या ताकदीने जागृत झाल्यावर कालबाह्य गोष्टी मोडणे व कालेचित गोष्टी घडविणे हे युवक शक्तीचे काम आहे असे मा. संचालकांनी या निमित्ताने प्रतिपादन केले.

**विस्तार शिबिरे :** कोल्हापूर शहरात व पुणे जिल्ह्यातील शिवगंगा खोऱ्यातील करंदी, मांगदरी व वेल्हे या तीन गावांमध्ये विस्तार शिबिरे आयोजित केली होती. सुमारे १२०-१३० मुले सर्व शिबिरांमध्ये मिळून सहभागी झालेली होती. वेगवेगळे खेळ, गोष्टी (कथाकथन), हस्तकला, विज्ञान प्रयोग इ. नाविन्यपूर्ण व वैविध्यपूर्ण उपक्रमांचा या शिबिरांच्या योजनेत मुलांना परिचय करून देण्यात आला.

# युवती विभाग

★ **यंदा युवती विभागातर्फे एकंदरीत सहा गटांमध्ये काम करायचे ठरवले होते. वर्षारंभावेळीच त्यानुसार सहविचारान्ती जबाबदारीचे वाटप होऊन त्याप्रमाणे वर्षभर विविध कार्यक्रम-उपक्रम पार पडले.**

## ➢ प्रशालेय गट

ज्ञान प्रबोधिनी प्रशालेतील इ. ५ वी ते १० वी तील विद्यार्थिनींसाठी दैनंदिन दल व प्रासंगिक उपक्रमांची योजना करण्यात आली. यावर्षी दैनंदिन क्रीडादलाच्या समन्वयाची जबाबदारी प्रशालेबरोबर युवती विभागाने पार पाडली. यामध्ये आठवड्यातून चार दिवस मुलींना विविध क्रीडाप्रकारांचे प्रशिक्षण देण्यात आले. जिल्हा परिषदेतर्फे आयोजित तसेच अन्य विविध स्पर्धांत खो-खो, व्हॉलीबॉल, तायक्वोंदो अशा खेळांत मुलींनी नैपुण्य प्राप्त केले.

याशिवाय युवती विभागातर्फे विविध उपक्रम घेतले. यामध्ये पथकरचनेवर मुख्य भर होता. गटकार्ये व क्रीडाकौशल्य (बांबूचे घोडे, घोष, बोथाटी इ.) यांचे प्रशिक्षण अशा स्वरूपात साप्ताहिक क्रीडादल झाले. दलान्तर्गत जुन्या व नवीन पद्यांच्या सादरीकरणाच्या स्पर्धा पार पडल्या.

इ. ८ वी ते १० वी च्या विद्यार्थिनी ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीबरोबर विविध मार्गांवर वारीबरोबर सहभागी झाल्या.

इ. ७ वी ते १० वी ची गणेशोत्सवाच्या निमित्ताने लेझीम व बर्चीनृत्याची पथके बसवण्यात आली व पुण्याच्या विविध भागांत जाऊन प्रात्यक्षिके सादर केली. मिरवणुकांत सहभाग घेतला.

विविध दुर्ग व पर्वती, मुरुड अशा ठिकाणी वेगवेगळ्या वर्गांच्या वर्गशः सहली झाल्या.

अभ्यासक्रमावरील अभ्यासासाठी इ. ९ वी व १०वी तील विद्यार्थिनींसाठी शिबिरे आयोजित करण्यात आली.

दिवाळीच्या निमित्ताने इ. ५ वी ते ७ वी च्या गटासाठी अनौपचारिकरित्या किल्ले बनविण्याची स्पर्धा आयोजित करण्यात आली.

डिसेंबरमध्ये इ. ५ वी ते ७ वी साठी क्रीडाशिबिर व इ. ८ वी व ९ वी साठी तंबूतील शिबिर आयोजित करण्यात आले होते.

याशिवाय प्रशालेतर्फे आयोजित विविध उपक्रमांच्या संयोजनात सहभाग घेण्यात आला. अनौपचारिक संवादासाठी वर्गबैठकी, पालकभेटी घेण्यात आल्या.

जानेवारीमध्ये केलेल्या तिळगूळ विक्री उपक्रमात मुलींनी पथकशः जोरात विक्री केली. कडक व मऊ वडी, लाडू, हलवा अशा विविध स्वरूपात विभागातर्फे एकंदरीत ११२६ किलोची विक्री केली.

## ➢ अन्य प्रशालेय गट

### व्यक्तिमत्त्व विकसन तासिका

कर्वे स्त्री शिक्षण संस्थेच्या महिलाश्रम हायस्कूल येथील इ. ८ वी तील विद्यार्थिनींसाठी पाक्षिक वारंवारितेने तासिका पार पडल्या. यामध्ये मुख्यतः स्वयं अध्ययन कौशल्य प्रशिक्षणावर भर दिला होता. अभ्यासाला पूरक असे खेळ घेण्यात आले.

### विज्ञान दल तासिका

शालेय वयोगटातील विज्ञान प्रयोग व रोजच्या आयुष्यातील विविध गोष्टी, खेळ इ. च्या माध्यमातून विज्ञानाभिमुखता जागृत करणे हा या तासिकांमागील उद्देश होता.

महिलाश्रम हायस्कूल (इ. ८ वी तील ६० मुली व भारत इंग्लिश स्कूलच्या विज्ञान मंडळातील इ. ६ वी ते ९ वी तील ८० मुलींसाठी या तासिका घेण्यात आल्या.

सुट्टीमध्ये किशोरी विकास शिबिरांच्या अंतर्गत चार गावांमध्ये व भारत इंग्लिश स्कूल मध्ये विज्ञान शिबिरे घेण्यात आली.

### गणेशोत्सव - बर्चीनृत्य प्रशिक्षण

सरस्वती मंदिर व रामचंद्र राठी प्रशाला येथील इ. ८ वी-९ वी तील विद्यार्थिनींचे बर्चीनृत्याचे गट बसवले. गणेशोत्सवात ज्ञान प्रबोधिनीच्या गणपती विसर्जन मिरवणुकीत या गटांचा सहभाग होता. दोन्ही ठिकाणी प्रजासत्ताक दिनानिमित्त प्रात्यक्षिके झाली.

## ➢ महाविद्यालयीन गट

**विस्तार शिबिरे :** युवती विभागात नियमित कामात असलेल्या गटाची विस्ताराकांक्षा वाढावी, विस्तार-कार्याच्या अनुभवाचा उपयोग दैनंदिन कामात करता यावा आणि विभागअंतर्गत गटबांधणी वाढावी म्हणून विविध गावांमध्ये इ. ७ वी ते ९ वी तील मुलींसाठी व्यक्तिमत्त्व विकसन शिबिरांचे आयोजन केले होते. लातूर, जालना, रत्नागिरी, सांगली, नारायणगाव, शेवगाव, सातारा या ठिकाणी या शिबिरांच्या माध्यमातून एकंदरीत १८२ मुली येऊन गेल्या.

ज्ञान प्रबोधिनी प्रशालेतील २००४ च्या तुकडीच्या युवतींचे विद्याव्रत पाठपुरावा शिबिर पार पडले.

पाबळ येथील विज्ञानाश्रमास महाविद्यालयीन गटाची भेट आयोजित करण्यात आली होती.

गणेशोत्सवात डोंबिवली येथे वाद्यवृंद व बर्चीनृत्याचे प्रशिक्षण तेथील युवतींना देण्यात आले.

शारदोत्सवानिमित्त विभागात दैनंदिन उपासना करण्यात आली.

दिवाळीत ज्ञान प्रबोधिनी भवन येथे पणत्या लावून व पद्य गायनाने दीपोत्सव साजरा केला.

यापूर्वी २-३ अभ्यासशिबिरे झालेल्या पदव्युत्तर गटासाठी गीतारहस्य

सार अभ्यासशिबिर आयोजित करण्यात आले होते. त्यानंतर द्वैमासिक पाठपुरावा सत्रे झाली.

**प्रतिज्ञाग्रहण समारंभ** - यंदा आठ युवतींनी प्रथम, तीन युवतींनी द्वितीय व मा. उषाताई खिरे यांनी आजन्म तृतीय प्रतिज्ञा घेतली. यानिमित्त प्रतिज्ञाग्रहणाच्या उपासनेची पुनर्रचना करण्यात आली.

### ➢ नागरी वस्ती अभ्यास व कृती गट

पुणे परिसरात विविध वस्त्यांमध्ये सुरू असलेल्या कामात सहभाग व त्यानिमित्त युवतींची गटबांधणी केली.

दांडेकर वस्ती येथे वर्षारंभ समारंभ, गृहभेटी व साप्ताहिक अभ्यासिका चालवण्यात आली. यामध्ये प्रशालेतील इ. ९ वी तील विद्यार्थिनी व महाविद्यालयीन युवतींचा सहभाग होता.

याशिवाय अभ्यासगटाच्या साप्ताहिक बैठकी, कार्यकर्ते मेळावा, बालविकास शिबिर, प्रशिक्षक प्रशिक्षणात युवतींचा सहभाग होता.

### ➢ ग्रामीण गट

किशोरी विकास योजनेच्या तासिका, शिबिरे, आरोग्य तपासणी शिबिर, ग्रामीण परिचय सहली यांमध्ये काही युवतींचा सहभाग होता.

### ➢ मध्यवर्ती उपक्रम व अन्य

**बैठक रचना :** दैनंदिन कामाबरोबरच अभ्यास-वाचन-चर्चा व्हावी म्हणून विविध गटांत ज्येष्ठांबरोबर साप्ताहिक बैठकींचे आयोजन केले होते. यामध्ये पदव्युत्तर गट (प्रा.संगीताताई कुलकर्णी, युवती संघटन सचिव), पदवीपूर्व नियमित जबाबदार गट (मा. संचालकांबरोबर), पदवीपूर्व प्रासंगिक जबाबदारी असलेला गट (प्रा. हर्षाताई किर्वे यांच्याबरोबर) व इ. ११ वी ची वर्ग बैठक यांचा समावेश होता.

याशिवाय कामासाठी आवश्यक विविध प्रदीर्घ बैठकी, सत्रान्त आढावा बैठकी, मार्गदर्शिका प्रशिक्षण शिबिर पार पडले.

ग्राम विकसन विभाग (शिवाली वायचळ - एक वर्ष पूर्णवेळ काम), ज्ञान प्रबोधिनी प्रशाला, छात्र प्रबोधन अशा विविध विभागांत युवती कार्यरत होत्या.

प्रबोधिनी पातळीवरील मध्यवर्ती कार्यक्रमांत युवतींनी सहभाग घेतला व जबाबदारी पार पाडली. उदा. संघटन प्रभाग प्रशिक्षण शिबिर, मध्यवर्ती प्रबोधक प्रशिक्षण वर्ग, सेतुबंधन मेळावा इ.

विविध केंद्रे, उपकेंद्रे, विस्तार केंद्रे यांद्वारे आयोजित कार्यक्रमांत युवतींचा सहभाग होता. उदा. भगिनी निवेदिता स्मृतिशताब्दी अभिवादन कार्यक्रम, सोलापुरातील विद्यार्थिनींचे विद्याव्रत पूर्वतयारी शिबिर, अंबा येथील एक दिवसीय मेळावे, रत्नागिरी, पावस तसेच पुण्यातील आर्. सी. एम्. गुजराथी या शाळेतील विद्याव्रत समारंभास उपासनेची अध्वर्यू म्हणून युवतींनी सहभाग घेतला.

### ➢ आर्थिक उलाढाल

साधारणतः रु. २,५०,०००/- इतकी वार्षिक उलाढाल झाली. विभागाच्या आर्थिक स्वयंपूर्णतेसाठी तिळगूळ विक्री उपक्रम केला. यामध्ये तिळगूळ बनवण्यात ग्रामीण महिलांचा सहभाग होता. प्रशालेय व महाविद्यालयीन युवतींनी पुण्यातील विविध भागांमध्ये स्टॉल्सद्वारे विक्री केली.

एकंदरीत वर्षभरात सहा गटांत मिळून विविध उपक्रमांत नियमित/प्रासंगिकरित्या सहभागी, जबाबदारी घेऊन साधारण १५० युवतींनी विभागात काम केले.

## मा. संचालकांच्या प्रकाशित झालेल्या प्रकट चिंतन पुस्तिका

- प्रकट चिंतन १ : मासिक वृत्तातील निवडक १६ लेख (१९९४ ते १९९७)
- प्रकट चिंतन २ : मासिक वृत्तातील निवडक १६ लेख (१९९७ ते २०००) (आवृत्ती संपली)
- प्रकट चिंतन ३ : राष्ट्रीयत्वाचे पैलू
- प्रकट चिंतन ४ : समाजाभिमुख उपासना
- प्रकट चिंतन ५ : सर्वसाधारण प्रबोधिनीपण
- प्रकट चिंतन ६ : संस्थेच्या घटनेतील उद्देश
- प्रकट चिंतन ७ : प्रबोधकाची प्रेरणा
- प्रकट चिंतन ८ : प्रबोधिनीची वैशिष्ट्ये

# स्त्री शक्ती प्रबोधन

**संवादिनी :** संवादिनी हा मध्यमवयीन पदवीधर महिलांचा गट आहे. या अंतर्गत गप्पाकट्टा/ मासिक बैठक/ उमलत्या वयाशी जुळवून घेताना/बहर जोपासताना/पालवी/समतोल द्वैमासिक असे अनेक उपक्रम चालतात.

➢ **मासिक बैठका**

दि. १६ एप्रिल २०१० रोजी झालेल्या मासिक बैठकीमध्ये 'सुलोचना नातू पुरस्कार' प्राप्त झालेल्या बागेश्री पोंक्षे, आर्या जोशी आणि अभया टोळ यांनी त्यांच्या कार्याचा परिचय करुन दिला.

दि.२६ जून २०१० रोजी शैक्षणिक वर्षातील पहिली बैठक झाली. साहित्य,कला,चित्रपट, सामान्यज्ञान यावर आधारित प्रश्नमंजूषा स्पर्धा घेतली. ६० सदस्यांची उपस्थिती होती. अत्यंत चुरशीची स्पर्धा झाली.

जुलै महिन्यातली मासिक बैठक १६ जुलैला झाली. पालवी गटातर्फे वंचित विद्यार्थ्यांसाठी जे शिक्षणपूरक उपक्रम केले जातात त्याच्यासाठी साहित्य तयार करण्याचे काम या बैठकीत केले गेले. 'आपलाही खारीचा वाटा ' असा या बैठकीचा विषय होता.

२० ऑगस्ट २०१० रोजी झालेल्या मासिक बैठकीमध्ये साळुंब्रे येथील ग्रामप्रबोधिनीचे मुख्याध्यापक श्री.व्यंकटराव भताने यांनी 'जडण-घडण ग्रामप्रबोधिनीची' या विषयावर भाष्य केले.

दि. २५ सप्टेंबर रोजी झालेल्या मासिक बैठकीचा विषय 'ताळमेळ-उर्जेचा' असा होता. श्री. माणिक पवार(सरकारमान्य ऊर्जा ऑडिटर) यांनी हा विषय मांडला.

२६ नोव्हेंबर २०१० रोजी झालेल्या मासिक बैठकीसाठी मा. वैदेही देशपांडे (लेखिका-मुक्कामपोस्ट आर्मी ऑफिस) यांना आमंत्रित केले होते. सैनिकी कुटुंबात येणारे अनुभव असा या बैठकीचा विषय होता.

डिसेंबर महिन्यातली मासिक बैठक १७ तारखेला झाली. मा. विवेक पोंक्षे यांनी या वेळी प्रबोधिनीच्या प्रार्थनेचा अर्थ उलगडून सांगितला. नंतर सर्वांनी सामूहिक प्रार्थना म्हणली.

जानेवारीच्या २१ तारखेला 'संवादिनी संक्रांत स्नेहमेळावा' झाला. या वेळी अवीट गोडीचा 'परिचय' हा हिंदी चित्रपट सर्वांनी मिळून पाहिला.

१८ फेब्रुवारी २०१० रोजी झालेल्या मासिक बैठकीमध्ये 'बदलत्या जगातले बदलते कुटुंब' ह्या विषयावर गटचर्चा झाली.यासाठी १)नातेसंबंध २) सणवार-व्रतवैकल्ये ३) आधुनिक साधनांचा कुटुंबात होणारा वापर ४) विभक्त कुटुंबात येणारे विविध प्रश्न असे विषय दिले होते.

मार्च महिन्यात मासिक बैठक १८ तारखेला झाली. श्री.सुहास लिमये यांनी नर्मदा परिक्रमेतील रसरसते अनुभव कथन केले. सदस्यांनीही त्यांना अनेक प्रश्न विचारले.

➢ **'उमलत्या वयाशी जुळवून घेताना....' कार्यशाळा**

हा संवादिनीचा गट किशोरवयीन मुला/मुलींसाठी शास्त्रीय पद्धतीने लैंगिकता प्रशिक्षणाचे काम करतो. त्यासाठी पुणे व पुण्याबाहेरच्या शाळांमध्ये जाऊन कार्यशाळा घेतल्या जातात. २७ व २८ एप्रिल २०१० मध्ये डी.ई.एस.(न्यू इंग्लिश स्कूल-इंग्रजी माध्यम) येथे इयत्ता १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी कार्यशाळा घेतली. तळेगांव येथील जैन इंग्लिश स्कूल, पार्श्वप्रज्ञा विद्यालय तसेच चांदखेड येथील महात्मा गांधी विद्यालय येथे दीर्घ काळ चालणारा 'उमलत्या वयाशी..... 'चा उपक्रम जुलै महिन्यात सुरू झाला. यातील पहिले सत्र एक जुलैला तळेगांव येथे तर पंधरा जुलैला चांदखेड येथे घेतले. इयत्ता ९ वी व १० वीच्या मुला/मुलींसाठी हा उपक्रम घेतला गेला.

दिनांक १४ जुलै २०१० रोजी अक्षरनंदन येथे इ. ९ वीच्या विद्यार्थ्यांसाठी एक दिवसीय कार्यशाळा घेण्यात आली.

ऑगस्ट २०१० मध्ये १२ व १९ तारखांना तळेगांव तसेच चांदखेड येथे अनुक्रमे ९ वी आणि १० वीच्या विद्यार्थांसाठी एका दिवसाची कार्यशाळा घेतली. यात तेथील शिक्षकांचे सहकार्यही मोलाचे होते.

दि. २५ आणि २६ ऑगस्ट रोजी शामराव कलमाडी हायस्कूल येथे ९ वी, १० वी च्या विद्यार्थांसाठी कार्यशाळा घेतली.

सप्टेंबर २०१० मध्ये २,१६, आणि २३ तारखांना तळेगांव येथील जैन इंग्लिश स्कूल व पार्श्वप्रज्ञा विद्यालयातील इ.१० वीच्या मुला/मुलींसाठी कार्यशाळा घेतली. ७ सप्टेंबर २०१० रोजी जुन्नर येथील शाळेत एक दिवसाची कार्यशाळा घेतली.

ऑक्टोबर मध्ये १४ तारखेला चांदखेड येथे कार्यशाळा झाली. २४ व २५ ऑक्टोबरला जालना येथील गोल्डन ज्युबिली स्कूल येथे मुला/मुलींसाठी कार्यशाळा आयोजित केली होती. हिंदी भाषेचा जास्त वापर करावा लागला.

डिसेंबरच्या २९ व ३० तारखांना विद्या-विकास विद्यालय येथील इयत्ता १०वीच्या विद्यार्थांसाठी कार्यशाळा घेतली गेली. यात 'उमलत्या वयाशी....'चा नवीन गट सहभागी झाला होता.

१७ व १८ जानेवारी २०११ रोजी 'सिंहगड कॉलेज ऑफ आर्टस ॲण्ड कॉमर्स येथे महाविद्यालयीन गटासाठी 'उमलत्या वयाशी...'कार्यशाळा घेण्यात आली. तसेच २० जानेवारी रोजी मंचर डी. एड. कॉलेज - मंचर येथील महाविद्यालयातील प्रथम वर्षातील विद्यार्थी/विद्यार्थिनींसाठी एक दिवसाची कार्यशाळा घेतली गेली.

फेब्रुवारी महिन्यात १९ तारखेला बालशिक्षण मंदिर येथील इयत्ता६वी/ ७ वीच्या मुलांसाठी कार्यशाळा घेण्यात आली. वयाने तुलनेने लहान असलेल्या ह्या विद्यार्थांसाठी विचारपूर्वक अभ्यासक्रम तयार केला.

➢ **प्रशिक्षक प्रशिक्षण**

'उमलत्या वयाशी जुळवून घेताना' गटासाठी प्रशिक्षक प्रशिक्षण (स्त्री-पुरुषांसाठी) २७ व २८ ऑगस्ट २०१० रोजी ज्ञान प्रबोधिनीमध्ये घेतले.

नोव्हेंबरच्या ३० तारखेला बोरिवली येथे १२ संवादिनी सदस्यांसाठी हे

घेतले. तसेच पुण्याला २५ व २६ नोव्हेंबर २०१० रोजी झालेल्या वर्गामध्ये २० सदस्यांचा सहभाग होता.

## ➢ बहर जोपासताना

'बहर जोपासताना' ही किशोरवयीन मुला/मुलींच्या पालकांसाठी घेण्यात येणारी कार्यशाळा आहे.

प्रिझम फाउंडेशनचे फिनिक्स स्कूल ही विशेष गरजा असणाऱ्या मुलांची शाळा. येथील पालकांसाठी २८ ऑगस्ट २०१० रोजी संपूर्ण दिवसाची कार्यशाळा घेण्यात आली. ह्याला फारच उत्तम प्रतिसाद मिळाला. २६ सप्टेंबर २०१० रोजी औरंगाबाद येथे पालकांसाठी एक दिवसाची कार्यशाळा घेतली. याला पालकांची उपस्थिती लक्षणीय होती. १३ फेब्रुवारी २०११ रोजी बालशिक्षण मंदिर येथील ९ वी १० वीच्या पालकांसाठी एक दिवसाची कार्यशाळा घेण्यात आली.

## ➢ सहजीवनाच्या उंबरठ्यावर

ही 'उमलत्या वयाशी ...' गटातर्फे विवाहपूर्व समुपदेशनाची कार्यशाळा घेतली जाते. दि. ४ ऑक्टोबर २०१० रोजी 'लेखाफार्म' येथे बारा नवपरिणित जोडप्यांसाठी या कार्यशाळेचे आयोजन केले होते. त्याचा विषय 'सुसंवाद .. घडण्यासाठी' असा होता. ८ / ९ जानेवारी २०११ रोजी स्वरुपवर्धिनी येथील अंगणवाडी सदस्यांसाठी 'सहजीवनाच्या उंबरठ्यावर' ह्या कार्यशाळा प्रशिक्षणाचे आयोजन केले होते. तसेच १० फेब्रुवारी २०११ रोजी 'वंचित विकास' तर्फे झालेल्या अशा कार्यशाळेत सुमारे १२ सदस्य सहभागी झाले.

## ➢ गप्पाकट्टा

दि. २ एप्रिल २०१० रोजी झालेल्या गप्पाकट्टाचा विषय 'आदि-अंत' असा होता. अगदी छोट्याश्या कणापासून ते विश्वापर्यंत सर्वच गोष्टींचा प्रारंभ आणि अंत यांची चर्चा झाली. जुलै महिन्याच्या गप्पाकट्टाचा विषय 'स्मरणरंजन.... माझी शाळा' असा होता. ६ ऑगस्ट रोजी 'नाती किंवा आठवणीतील नाती' असा विषय होता. सप्टेंबर महिन्यात ३ तारखेला गप्पाकट्टा झाला. 'कल्पना मनोरंजनाच्या' असा याचा विषय होता.मनोरंजनाची संकल्पना व्यक्तिनुसार, वयानुसार, आर्थिक स्तरानुसार बदलत जाते असा आशय याच्यामधून निघाला. नोव्हेंबर महिन्यातला विषय 'खर्च', डिसेंबरच्या ३ तारखेचा विषय छंद असा होता. ७ जानेवारी २०११ रोजी 'आजारपण निभावताना' असा विषय होता. फेब्रुवारीत 'संवाद' असा, तर ४ मार्च २०११ रोजी झालेल्या गप्पाकट्टाचा विषय 'आठवणीतल्या जाहिराती' असा होता.

## ➢ पालवी

संवादिनीचा 'पालवी' गट हा वंचित मुलांसाठी शिक्षणपूरक उपक्रम राबवतो. वर्षाच्या सुरुवातीला म्हणजे १६, १७ व १८ जून रोजी पालवी गटासाठी 'कार्यशाळा ओळख' शिबिराचे आयोजन केले. या वेळी भूगोल प्रशिक्षणासाठी अभिजीत घोरपडे, कृतिखेळांसाठी प्रकाश रणनवरे तर विज्ञानासाठी अरुंधती जोशी यांना बोलावले होते. दि. ३ जुलै, १ ऑगस्ट व ५ सप्टेंबर रोजी ज्ञानदा गुरुकुल येथे इयत्ता ५ वी व ७ वी च्या विद्यार्थ्यांसाठी भूगोल व विज्ञान विषय घेतले. तसेच ८,११ व १२ जुलै २०१० रोजी दांडेकर पूल नागरवस्ती येथे जाऊन तेथील मुलांसाठी गम्मतखेळ शिबिर घेतले. फेब्रुवारी २०११ मध्ये शिशूनिकेतन शाळेमध्ये इयत्ता ३ रीच्या मुलांसाठी भूगोल शिबिर तर ४ थीच्या मुलांसाठी विज्ञान शिबिर घेतले. नागरवस्ती येथे जाऊन तेथील मुलांसाठी गम्मतखेळ शिबिर घेतले.

## ➢ समतोल द्वैमासिक

एप्रिल २०१० मध्ये प्रसिद्ध झालेल्या समतोल द्वैमासिकाचा सूत्रविषय 'जागतिकीकरण' असा होता. जून २०१० चा विषयही 'जागतिकीकरण' असा होता. त्यानंतरचा समतोलचा अंक हा दिवाळी विशेषांक होता. त्याचा सूत्रविषय 'अग्रणी भारत' असा होता. त्याचे प्रकाशन मा. आनंद आगाशे यांच्या हस्ते दि. २३ ऑक्टोबर रोजी झाले. 'अग्रणी भारतासाठी माध्यमांची भूमिका आणि जबाबदारी' या विषयावर त्यांनी सुंदर विवेचन केले. डिसेंबर २०१० म्हणजेच समतोल वर्ष २ अंक २ चा सूत्रविषय 'अनुभवाची शिदोरी' असा होता. अंक ३ चा सूत्र विषय 'लढाई-जिंकलेली' असा होता. तर त्यानंतर 'बदलत्या जगातले कुटुंब' असा विषय होता.

## ➢ प्रदीर्घ बैठक

संवादिनीच्या वार्षिक नियोजनासाठी प्रदीर्घ बैठक योजली जाते. वर्ष २०१०-११ च्या नियोजनाची बैठक साळुंब्रे येथे दि. ३ व ४ जून २०१० रोजी झाली. यावेळी वा. विवेकराव कुलकर्णी, मा. सुभाषराव देशपांडे यांची विशेष सत्रे झाली.

## ➢ अभ्यास शिबिर

दि. २६ व २७ मार्च २०११ या दोन दिवशी 'मनाचे श्लोक अभ्यास शिबिर' झाले. यामध्ये पंधरा संवादिनी सदस्या सहभागी झाल्या होत्या. श्रीमती निलीमाताई रास्ते यांनी एक सत्र घेतले. मा. संचालकांचे मार्गदर्शन या शिबिरासाठी झाले. वैयक्तिक वाचन, लेखन, चिंतन यासाठी पुरेसा वेळ दिला गेला होता.

## ➢ अन्य

स्व. मंगलाताई चितळे स्मृती कार्यक्रम दि. ९ व १० मार्च २०११ रोजी झाला. ९ तारखेला ह. भ. प. गार्गी देशपांडे यांचे तर दि. १० मार्च रोजी सौ. संगीता कानडे यांचे कीर्तन झाले. या कार्यक्रमाच्या संयोजनात संवादिनीचा सहभाग होता.

# विस्तार केंद्रे

## अंबाजोगाई विस्तार केंद्र

फेब्रुवारी १९९९ मध्ये गीता अभ्यास मंडळाने अंबाजोगाईत ज्ञान प्रबोधिनीची सुरूवात झाली. आजही हा गीता संथा वर्ग नियमितपणे गोविंद केंद्रात सुरू आहे.

### ➢ विवेकानंद जयंती

दि. १९ जानेवारीला विवेकानंद अभ्यास शिबिर मा.संचालकांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आले. या शिबिरास ४० जणांची उपस्थिती होती. या शिबिरात कै. आप्पा पेंडसे यांच्या 'राष्ट्रद्रष्टे विवेकानंद' या पुस्तकातील निवडक वेचे वाचण्यात आले. तसेच मा. संचालकांचे मार्गदर्शन झाले.

अंबाजोगाईत ज्ञान प्रबोधिनीचे काम गटनिहाय रचनेत होत आहे.

### ➢ उपासना केंद्र

सर्व वयोगटातील व सर्व स्तरातील बाल, युवक व ज्येष्ठांचा सहभाग या उपासना केंद्रात असतो. दैनंदिन उपासनेसाठी विविध भागात उपासना केंद्रे आहेत. प्रबोधिनीची उपासना, विवेकानंदांचे विचार, पद्य, खेळ व शेवटी प्रबोधिनीची प्रार्थना या उपासना केंद्रात दररोज होते.

**उपासना केंद्रातील उपक्रम :**

१. दैनंदिन उपासना
२. उपासना पुस्तिकेतील उपक्रम
३. गणेश उत्सव
४. जयंती
५. प्रबोधक प्रशिक्षण शिबिरे
६. उपासना केंद्र शिबिर
७. छात्र प्रबोधन शिबिर
८. सामूहिक उपक्रमात सहभाग

**विविध भागातील उपासना केंद्रे**

१. रामकृष्ण उपासना केंद्र
२. दत्त उपासना केंद्र
३. माँ शारदा उपासना केंद्र
४. गोविंद उपासना केंद्र
५. रामदास उपासना केंद्र
६. दीनदयाळ उपासना केंद्र
७. विवेकानंद उपासना केंद्र

### ➢ युवक गट

युवक गटाचे सहा कार्यकर्ते तिसऱ्या श्रावणी सोमवार निमित्त अंबाजोगाई ते परळी २४ कि.मी. अंतर पायी चालत गेले.

### ➢ शिशुविहार

सावित्रीबाई फुले जयंती, पालकांसाठी निबंध स्पर्धा, विवेकानंद जयंती, हळदी-कुंकवाचा कार्यक्रम, तिळगुळाचा कार्यक्रम, सुभाषचंद्र बोस जयंती, विज्ञान दिन इ. कार्यक्रम मुक्ताई केंद्र, रामकृष्ण केंद्र व गोविंद केंद्र या केंद्रांवर झाले.

जीवन व्यवहार कार्यक्रमात मुलांना कापसाचे उपयोग व त्यापासून वस्तु तयार करून दाखवण्यात आल्या. हा कार्यक्रम तिन्ही केंद्रांवर घेण्यात आला. दि. ३० जानेवारीला गांधीजींच्या पुण्यतिथीनिमित्त माहिती सांगण्यात आली.

दि. २८ फेब्रुवारी रोजी विज्ञान दिनानिमित्त शालेय वयोगटासाठी विज्ञान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यात दत्तप्रसाद दादाने माजी राष्ट्रपती अब्दुल कलामांचे चरित्र सांगितले. श्री नामदेव दादांनी 'फाय' विषयी माहिती देताना निसर्गाचे गणित समजावून सांगितले. धनंजय देशपांडे यांनी विज्ञानातील गंमती करून दाखवल्या. शिबिराचा समारोप मातृभूमी पूजनाने झाला. या कार्यक्रमात श्री. राऊतमारे यांनी विज्ञानाच्या आधारे मातृभूमीची सेवा कशी करू शकतो, हे सांगितले.

दि. ८ मार्च रोजी जागतिक महिला दिनानिमित्त महान स्त्रियांविषयी तिन्ही केंद्रांवर माहिती सांगण्यात आली.

दि. ३१ मार्च रोजी पालक ताईंच्या विविध गुणदर्शनाचा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमासाठी सौ. अनुपमाताई मोटेगावकर प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे संचालन सौ. चोथवे ताईंनी केले. या कार्यक्रमात एकूण ८० पालकांचा सहभाग होता.

दि. २ ऑगस्ट रोजी शिशुविहारच्या तीनही केंद्रांमध्ये लो. टिळकांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. दि. १० ऑगस्ट रोजी 'वर्षारंभ उपासना' झाली. दि. २१ ऑगस्ट रोजी रामकृष्ण केंद्रावर मुलांना राख्या करून दाखवल्या. दि. २८ ऑगस्ट रोजी मुक्ताई केंद्रातर्फे वृक्षदिंडीचे आयोजन करण्यात आले होते.

दि. २५ ऑक्टोबर रोजी गोविंद केंद्रावर दिपाली व प्रिया बलसवस्कर यांनी मुलांना पतंग करून दाखवला.

रामकृष्ण केंद्रावर माजी विद्यार्थी आदित्य पवार याने गटातील मुलांना आकाश कंदिल करून दाखविला.

### ➢ स्फूर्तिगट

दि. २६ जानेवारी रोजी स्फूर्तीगटातर्फे 'हात मदतीचा' या उपक्रमाचे उद्घाटन डॉ. ए. व्ही. देशपांडे यांनी केले. 'हात मदतीचा' या उपक्रमात गरजू रुग्णांसाठी आवश्यक वैद्यकीय साहित्य उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या कार्यक्रमास १५ जणांची उपस्थिती होती.

दि. ६ मार्च रोजी स्फूर्तिगटाच्या नऊ सदस्यांनी नगर येथील 'स्नेहालय' या सामाजिक संस्थेला भेट दिली. या ठिकाणी जाऊन मा. श्री. गिरीश कुलकर्णी यांच्याकडून तेथील सामाजिक कार्याविषयी माहिती घेतली. तसेच स्नेहालय या सामाजिक संस्थेचे नगरमधील सर्व प्रकल्प पाहिले.

### ➢ मातृभूमी पूजन

स्वामी समर्थ बालक मंदिर येथे दि. २२ डिसेंबर रोजी मातृभूमी

पूजनाचा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाची भूमिका व पोथी वाचन सौ. जोशीताई आणि कऱ्हाडे ताई यांनी केले. या कार्यक्रमाला ३५ पालकांची उपस्थिती होती.

दि. २५ डिसेंबर रोजी स्व. प्रमोदजी महाजन न्यू इंग्लिश स्कूल मध्ये मातृभूमी पूजनाचा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाची भूमिका व पोथी वाचन कऱ्हाडेताई, प्राचीताई, गीताताई यांनी केले. या कार्यक्रमाला १५ जणांची उपस्थिती होती.

अंबाजोगाई येथे जानेवारी महिन्यामध्ये विविध १२ ठिकाणी मातृभूमी पूजन घेण्यात आले.

दि. १२ फेब्रुवारी रोजी शंतनु हिरळकर यांच्या घरी मातृभूमी पूजनाचा कार्यक्रम घेण्यात आला. यासाठी १७ जणांची उपस्थिती होती. विज्ञान शिबिरामध्ये मातृभूमी पूजन घेण्यात आले.

### ➢ विस्तार कार्य

श्री. प्रसाद चिक्षे यांचा मुठेगाव व मुंबई येथे दौरा झाला. यामध्ये कार्यकर्त्यांचा मेळावा झाला. श्री. अभिजीत जोंधळे यांचा औरंगाबाद येथे विज्ञान शिबिरासाठी दौरा झाला.

मार्च महिन्यात श्री. प्रसाददादांचा उस्मानाबाद, तुळजापूर, पुणे, नगर, लातूर, बीड, उद्‌गीर, माजलगाव, डोंबिवली, कल्याण, बदलापूर येथे दौरा झाला. भाषण, कार्यकर्त्यांसमवेत बैठकी, शिक्षकांसमोरील व्याख्याने, युवकांसमोर मार्गदर्शन असे या दौऱ्याचे स्वरूप होते.

दि. १६ ऑगस्ट रोजी सांगली येथील चिंतामण महाविद्यालय व आर. डब्लू. सी. महाविद्यालय येथे प्रसाद चिक्षे यांचे 'नवभारताच्या क्षमता' या विषयावर व्याख्यान झाले. दि. २५ ऑगस्ट रोजी माजलगांव येथे त्यांनी 'व्यक्तिमत्त्व विकास' या विषयावर इ. ८ वी ते १० वी च्या मुलांना मार्गदर्शन केले. यानंतर रोटरी क्लब सदस्यांसाठी 'भारत महासत्ता बनवण्यात प्रत्येकाची भूमिका' या विषयावर त्यांचे व्याख्यान झाले.

दि. २६ ऑगस्ट रोजी अंबाजोगाई येथील इंजिनिअरिंग महाविद्यालयात 'नेतृत्व विकसन' या विषयावर कार्यशाळा घेण्यात आली. दि. २९ ऑगस्ट रोजी धाराशिव येथे 'भारताच्या वर्तमान क्षमता' या विषयावर प्रसाद चिक्षे यांचे व्याख्यान झाले. दि. २९ ऑगस्ट रोजी लातूर येथे दौरा झाला. तेथे त्यांनी कार्यकर्त्यांशी संवाद साधला.

### ➢ गणेशोत्सव

दि. २२ सप्टेंबर रोजी गणपतीची विसर्जन मिरवणूक उत्साहात निघाली. शिशुविहार च्या मुलांनी शिवाजी महाराजांच्या जीवनातील विविध प्रसंग सादर केले. युवक गटाचे ढोल पथक, उपासना केंद्रातील मुलांचे बर्ची पथक व विद्याव्रत गटातील मुलींचे ढोल पथक या मिरवणुकीत सहभागी होते.

⅄ ⅄ ⅄

## बोरीवली विस्तार केंद्र

**एप्रिल २०१० :** बोरीवलीमध्ये दि. २ एप्रिलला कलचाचणी घेण्यात आली व दि. १८ एप्रिलला समुपदेशन झाले. एकूण ५२ विद्यार्थ्यांनी याचा लाभ घेतला.

दि. १४ एप्रिल ते १८ एप्रिल या पाच दिवसात बोरीवलीत इ. ३री ते ७ वी या इयत्तेतील ५१ मुलांचे बाल-विकास शिबिर झाले. यासाठी पुण्याहून कार्यकर्त्या आल्या होत्या. दि. १९ ते २४ एप्रिल या दिवसात बोरीवली केंद्राचे दहावे विद्याव्रत शिबिर झाले.

दि. २५ एप्रिलला विद्याव्रत सोहळा संपन्न झाला. मा. संचालक दहाव्या व्रतार्थींना दीक्षा देण्यासाठी 'आचार्य' म्हणून उपस्थित राहिले. सोहळ्याच्या दिवशी ३७ व्रतार्थी, त्यांचे पालक तसेच बोरीवलीतील कार्यकर्त्या गटाला मा. संचालकांनी मार्गदर्शन केले.

दि. २६ एप्रिलला केंद्राचा वर्षान्त सोहळा झाला.

**मे :** दहाव्या विद्याव्रत शिबिराचा पहिला पाठपुरावा 'पेठ' किल्ल्यावर विद्यार्थ्यांना ट्रेकिंगला नेऊन घेण्यात आला.

**जून :** दि. १२ जून वर्षारंभा नंतर बोरीवलीत नियमित उपक्रम साप्ताहिक विकासिका, शिबिरे, संवादिनी या बरोबर 'उमलू सर्वांगाने' हा उपक्रम सुरू झाला. बोरीवलीतील अध्यापिका गटाने कॉसमॉस शाळेतील इ. ५ वी तील विद्यार्थ्यांसाठीचा हा साप्ताहिक उपक्रम सुरू केला असून तो नियमित याच विद्यार्थ्यांसाठी होणार आहे. यात एकूण ३३ विद्यार्थी येत असून सौ. अर्चना साठे व श्री. आदित्य शिंदे यांचे मार्गदर्शन या गटाला मिळते.

**जुलै :** दि. १६ जुलैला संवादिनी उपक्रमात सौ. बागेश्रीताई पोंक्षे यांचे अनुभवकथन झाले. कार्यक्रमानंतरही बागेश्रीताईंबरोबर पुण्यातील संवादिनीचे काम व किशोरी विकास प्रकल्पाबद्दल भरपूर गप्पा झाल्या. गेल्या वर्षीच्या अभ्यास शिबिरानंतर संवादिनीत नियमित दासबोध वाचन सुरू झाले.

दि. २१ जुलै या दिवशी केंद्राचा अभंग-भजनाचा कार्यक्रम पुष्टिपत्ती गणपती मंदिर, बोरीवली (पूर्व) येथे झाला. १००-१५० प्रेक्षक या कार्यक्रमास उपस्थित होते. श्री. प्रसाद चिक्षेही या कार्यक्रमाला उपस्थित होते. दि. २२ जुलै रोजी प्रसाददादांबरोबर समितीप्रमुखांची बैठक झाली व बोरीवलीच्या रचनेत काही बदल केला गेला.

**ऑगस्ट :** दि. ७ ऑगस्ट रोजी विद्याव्रत शिबिराचा दुसरा पाठपुरावा एक रात्र शिबिर घेऊन करण्यात आला.

दि. १५ ऑगस्ट यादिवशी सर्व कार्यकर्त्यांची एकत्र उपासना झाली.

या दिवशी पुण्यातील संघटन प्रशिक्षण आणि मध्यवर्ती प्रशिक्षण शिबिरांची माहिती सर्व कार्यकर्त्यांना दिली. एकूण ३५ कार्यकर्त्या हजर होत्या. दि. १९ ऑगस्टला मा. आप्पांच्या स्मृतिदिना निमित्त त्यांचे चरित्र वाचन व त्यावर चिंतन झाले.

दि. २९ ऑगस्ट रोजी विद्याव्रत तिसरा पाठपुरावा याच्या निमित्ताने केंद्राचे मातृभूमी पूजन झाले. या दिवशी नवीन ११ कार्यकर्त्यांनी प्रथम प्रतिज्ञा व ४ जणांनी द्वितीय प्रतिज्ञा घेतली. आता १८ प्रथम प्रतिज्ञित व चार द्वितीय प्रतिज्ञित आहेत. मा. संचालकांनी या सगळ्यांना प्रतिज्ञा दिली. मातृभूमी पूजनानंतर त्यांचे मार्गदर्शन झाले. १०० ते १२५ सदस्य या कार्यक्रमास उपस्थित होते.

**सप्टेंबर :** साप्ताहिक विकासिकेच्या पहिल्या सत्राचा समारोप दि. ५ सप्टेंबर रोजी नवीन युवक गटानी केला. विकसिकेतील ५० जणांच्या गटाचे सकाळी ९ ते संध्या. ५ पर्यंत शिबिर त्यांनी घेतले. संध्याकाळी पालकसभा झाली.

**ऑक्टोबर :** दि. ७ ऑक्टोबर बीमानगर (एज्युकेशन सोसायटी) शाळेतील इ. १० वी च्या विद्यार्थ्यांसाठी गांधी जयंती निमित्त 'मातृभूमी पूजन' करण्यात आले. त्यांना समर्पक असे काही जास्तीचे पाच संकल्प सांगण्यात आले.

दि. २८ ऑक्टोबर रोजी मुंबई विभागाचा 'छात्र प्रबोधन' प्रकाशन सोहळा मालाड (पूर्व) येथील उत्कर्ष मंदिर येथे पार पडला. ६० विद्यार्थी, पालक व शिक्षक असे सर्व या सोहळ्यास उपस्थित होते. या शाळेतून १५० अंकांची नोंदणी झाली होती.

**नोव्हेंबर :** दि. १३ नोव्हेंबर या दिवशी श्रीकृष्ण उपासना कार्यक्रम केंद्र, गोराई, बोरीवली येथे मातृभूमी पूजनाचा कार्यक्रम झाला.

दि. २४ ते २८ नोव्हेंबर या दिवसांत इ. ४ थीतील विद्यार्थ्यांसाठी (आंनदराव पवार सरस्वती विद्यामंदिर) 'इंद्रधनू' शिबिर घेण्यात आले. या शिबिराला ४२ विद्यार्थी उपस्थित होते. शेवटच्या दिवशी पालकांशी संवाद झाला. दि. २९ नोव्हेंबरला आदिवासी सेवा मंडळ, बोरीवली (पूर्व) येथील वसतीगृहात विद्यार्थिनींसाठी मातृभूमी पूजन सोहळा संपन्न झाला.

**डिसेंबर :** दि. ३० नोव्हेंबर व १ डिसेंबर या दोन दिवसात बीमानगर मधील इ. ९वी च्या ८० विद्यार्थ्यांसाठी 'उमलत्या वयाशी जुळवून घेताना' कार्यशाळा घेण्यात आली. यासाठी पुणे संवादिनीच्या कार्यकर्त्या आल्या होत्या. दि. ५ डिसेंबर रोजी बोरीवली प्रचीती गटाच्या २७ मुलांसाठी एक दिवसाचा मेळावा प्रसाददादाच्या उपस्थितीत पार पडला.

**जानेवारी :** दि. १ ते २६ जानेवारी २०११ या दिवसात बोरीवली कार्यकर्त्यांची शैक्षणिक सहल 'आनंदवन' ला जाऊन आली. प्रत्यक्ष तेथील कार्याचा परिचय तसेच मा. साधनाताई, डॉ. प्रकाशदादा, डॉ. विकासदादा व सौ. मंदाताईंशी प्रत्यक्ष गप्पाही झाल्या. दि. २९ जानेवारी रोजी 'सेतुबंधन' मेळाव्यासाठी बोरीवलीहून ३ प्रौढ व २ युवा कार्यकर्त्या जाऊन आल्या.

**फेब्रुवारी :** दि. ३ फेब्रुवारी रोजी नागरी वस्ती अभ्यास व कृतिगटाच्या मेळाव्यासाठी सौ. भाग्यश्रीताई महाले व सौ. पद्माताई कासार्ले आल्या होत्या. केवळ दोन तासात गटाची विस्तृत ओळख व माहिती झाली. बोरीवलीतसुद्धा कमी वेळात योग्य माहितीपर कार्यक्रम कसे देता येईल याची कल्पना आली.

दि. २७ फेब्रुवारी रोजी बोरीवली मुंबईतील सर्व कार्यकर्त्यांचा एक स्नेहमेळावा घेण्यात आला. बदलापूर ते पालघर अशा सर्व केंद्रावरील प्रत्यक्ष काम करणारे ९० व अशा प्रकारचे काम करण्याची इच्छा असलेले ३५ नवीन सदस्य असे एकूण १२५ कार्यकर्ते या कार्यक्रमास उपस्थित होते. ज्ञान प्रबोधिनीची माहिती, बोरीवली केंद्राची विस्तृत माहिती, नियमित उपक्रमांबद्दल गटचर्चा, स्थानिक उपक्रमांची माहिती व त्यानंतर मा. संचालकांचे मार्गदर्शन मिळाले. या कार्यक्रमाचा समारोप मातृभूमी पूजनाने झाला.

**मार्च :** दि. १३ मार्च रोजी सा. विकासिकेचा समारोप झाला. दि. २६ मार्चला 'उमलू सर्वांगाने' या वर्षभर चालू असलेल्या नवीन उपक्रमाचा समारोप झाला. श्री. आदित्य शिंदे या कार्यक्रमास उपस्थित होते. त्यांनी मुलांशी गप्पा मारल्या व अनुभव सांगितले.

बोरीवलीत आता १) साप्ताहिक विकसिका २) शिबिरे ३) संवादिनी, ४) उमलू सर्वांगाने ५) पर्यावरण गट ६) युवागट (युवक/युवती गट) ७) कृतीशील निर्मिती गट अशा प्रकारचे नियमित उपक्रम सुरू आहेत.

याशिवाय संपर्क, अर्थ, जाहिरात, पुस्तकविक्री अशा स्वतंत्र जबाबदाऱ्या आहेतच. गेल्या वर्षभरात सुमारे १२ हजार रुपयांची पुस्तक विक्री झाली.

## डोंबिवली विस्तार केंद्र

डोंबिवली केंद्र ज्ञान प्रबोधिनीचे विस्तार केंद्र म्हणून २००९-१० मध्ये घोषित झाल्यावर बिरुदाला जागत केंद्राने उपक्रमांचा विस्तार केलाच पण प्रबोधिनीचा विस्तार जवळच्या उपनगरात व्हावा यासाठी जोरदार प्रयत्न केले. समविचारी कार्यकर्त्यांचे स्थानिक गट जमवून कल्याण, बदलापूर व ठाणे येथे जानेवारी, मार्च व एप्रिल महिन्यांमध्ये शालेय विद्यार्थ्यांची एक दिवसीय व्यक्तिमत्त्व विकसन शिबिरे आयोजित करण्यात आली. स्थानिक कार्यकर्त्यांनी डोंबिवली केंद्राच्या मदतीने कामाला प्रत्यक्ष सुरुवात केली. कल्याण-४५, बदलापूर-३३ तर ठाणे येथे ५५ विद्यार्थी सहभागी झाले होते. प्रत्येक ठिकाणी पालक सभा झाल्या. यामध्ये ज्ञान प्रबोधिनीच्या कार्याची ओळख करून देण्यात आली. या शिबिरांच्या आयोजनामुळे

स्थानिक कार्यकर्त्यांचा आत्मविश्वास वाढला व प्रसाददादांच्या भेटीमुळे प्रेरणा घेऊन कल्याण व बदलापूर येथे नियमित उप्रमांना सुरुवात झाली. कल्याण येथे प्रबोधक मंडळ व मासिक विकसिका सुरू झाल्या. तर बदलापूर केंद्राने कलचाचणी, ग्रामीण मेळावे या उपक्रमात विशेष रस दाखवला. तिन्ही केंद्रातील इच्छुक कार्यकर्ते व डोंबिवलीतील काही नवोदित कार्यकर्ते (एकूण १३ जण) यांची प्रबोधिनी परिचय सहल सौर दि. २३ व २४ जानेवारी रोजी आयोजित करण्यात आली.

२०१०-११ वर्षाचे सिंहावलोकन करताना लक्षात येते की केंद्राच्या दृष्टीने जमेची बाजू म्हणजे युवक-युवतींचा कामामधील वाढता सहभाग आणि पाच संवादिनी सदस्यांचे कार्यकर्त्यांमध्ये झालेले रूपांतर ! या वर्षी झालेली दोन्ही निवासी शिबिरे आणि रात्र शिबिर यांचे संपूर्ण नियोजन आणि आयोजन स्वतंत्रपणे युवक-युवती गटाने केले. मे महिन्यात नवीन गटासाठी तर जून महिन्यात विद्याव्रती पाठपुरावा म्हणून निवासी शिबिरे झाली. अनुक्रमे ४७ व २७ प्रबोधक सहभागी झालेल्या या शिबिरांची सांगता मातृभूमि पूजनाने झाली. जानेवारी महिन्यात झालेल्या रात्र शिबिरात ५३ प्रबोधक सहभागी झाले होते. युवक-युवती गटाच्या अभ्यास मंडळाच्या बैठका नियमितपणे सुरु होत्या, ज्यामध्ये शास्त्रीय संगीतापासून ते जपानी भाषा या पुस्तकावर चर्चा, रेकी, आयुर्वेद, भगवद्गीता, अनंत तत्त्व तर आय. एन. एस. अरिहंत व सेल्स आणि मार्केटिंग इ.विषयांवर सदस्यांनी आपले अभ्यासपूर्ण विचार मांडले. गणेश विसर्जनाच्या वेळी या गटाने डोंबिवलीत चार ठिकाणी निर्माल्य गोळा करण्याची व्यवस्था केली होती. या सगळ्या निर्माल्यातून ८४ किलो प्लास्टिक वेगळे करून ते पुनर्वापरासाठी दिले.

सौर दि. २५ एप्रिल रोजी ४१ तर दि. १७ नोव्हेंबर रोजी बारा विद्यार्थ्यांचे विद्याव्रत झाले. आचार्य म्हणून अनुक्रम आ. रामभाऊ डिंबळे व आ. ललिताताई नामजोशी यांनी विद्याव्रतींना दीक्षा दिली. त्याआधी दोन्ही वेळा मैत्री शिबिरे, सहली व पाच दिवसांची (१२ तासांची) विद्याव्रत शिबिरे आयोजित करण्यात आली. या उपक्रमातही युवक-युवतींचा सहभाग उल्लेखनीय होता.

प्रबोधक मंडळ, फणसे विद्यालयातील विकसिका हे साप्ताहिक तर संवादिनी (मासिक) उपक्रम नियमितपणे व उत्साहात पार पडले. याचबरोबर या वर्षी पालक मंडळ या वैशिष्ट्यपूर्ण उपक्रमाची सुरुवात झाली. विद्याव्रतींचे पालक आणि इतर पालक यांच्यासाठी 'पालकत्व' या विषयाला अनुसरून व्याख्याने, चर्चासत्रे, मुलाखती, कार्यशाळा व याच विषयाच्या पुस्तकांचे वाचनालय इ. माध्यमातून पालकांना मार्गदर्शन हा या मासिक उपक्रमाचा मुख्य हेतू. आ. गिरीशरावांनी विकासकेंद्री, साहसी पालकत्व व मुलांचा भावनिक विकास यावर तर प्रा. महेंद्रभाईंनी सुट्टीचे नियोजन या विषयावर मार्गदर्शन केले.

एक नवीन प्रयोग म्हणून ह्या वर्षी किशोरी विकास प्रकल्पाला सुरुवात झाली. डोंबिवली जवळील निळजे गावात श्री. इनामदार सरांच्या मैत्री शाळेत गावातील शिक्षण अर्धवट राहिलेल्या १० युवती मासिक बैठकीसाठी जमू लागल्या. संवादिनीच्या माध्यमातून पुढे आलेल्या कार्यकर्त्यांनी या उपक्रमाची जबाबदारी घेतली व नियमितपणे त्या निळजे गावात जाऊ लागल्या. ज्येष्ठ कार्यकर्त्या सौ. वृंदाताई गोडसे यांच्या मार्गदर्शनामुळे संवादिनी सदस्यांचा आत्मविश्वास वाढला. या वर्षीचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे आम्हां कार्यकर्त्यांचे अनेक वर्षांचे बरची नृत्याचे स्वप्न प्रत्यक्षात आले. यंदाच्या गणेशोत्सवात पंधरा विद्यार्थिनी (विद्याव्रती) व पाच युवतींनी दत्तनगरच्या मंडळात बरची नृत्याची प्रात्यक्षिके सादर केली.

कार्यकर्त्यांची प्रेरणा वाढवणारा आणखी एक महत्त्वाचा उपक्रम याही वर्षी तितक्याच उत्साहाने पार पडला, तो म्हणजे छात्र-प्रबोधन ग्रामीण दिवाळी अंकाच्या वाचकांचे मेळावे. डोंबिवली, कल्याण, बदलापूर येथील कार्यकर्त्यांनी एकूण पाच मेळावे चिंधीची वाडी, बाळे वाकळण, सायले व पिंपळोली या वनवासी/ग्रामीण भागात जाऊन घेतले. एकूण २४८ विद्यार्थ्यांनी याचा लाभ घेतला. विद्यार्थ्यांचा उत्साहवर्धक सहभाग, त्यांनी केलेले स्वागत, अशा उपक्रमांची या भागातील गरज, विद्यार्थ्यांची सद्य:स्थिती यासंबंधीचे विचार सहभागी कार्यकर्त्यांनी शोध-बोध बैठकीच्या वेळी संपादकांशी दूरभाषवरून संवाद साधताना प्रकर्षाने मांडले. याशिवाय यंदा ९१ विद्यार्थ्यांची कलचाचणी व समुपदेशन झाले. याबाबतीतील पुढचे पाऊल म्हणजे त्यातील इच्छुक २५ विद्यार्थ्यांचे श्रीमती शुभा कुलकर्णी यांनी व्यक्तिगत समपुदेशन केले.

पौरोहित्य विभागातील सात सदस्या साप्ताहिक सराव नियमितपणे करतात. सौ. आर्याताई जोशी, पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांची वाटचाल सुरू आहे. सौर दि. १५ फेब्रुवारी रोजी या गटाने पुणे येथील संत्रिका विभागाला भेट दिली. 'आदर्श पुरोहित कसा असावा' या संदर्भात आ. यशवंतराव लेले व आ. विश्वनाथ गुर्जर यांचे त्यांना मार्गदर्शन लाभले. वर्षभरात एकूण दहा ठिकाणी मातृभूमि पूजनाचा सोहळा संपन्न झाला. पाच कार्यकर्त्यांना पोथी वाचनाचा नवीन अनुभव मिळाला. आषाढी एकादशीच्या दिवशी केंद्राचा सार्थ भजनाचा कार्यक्रम युवक-युवतींच्या सहभागामुळे विशेष रंगला. ठाणे येथे झालेल्या मराठी साहित्य संमेलनात ज्ञान प्रबोधिनीच्या प्रकाशन विक्रीचा अनुभव ठाणे, कल्याण, बदलापूर व डोंबिवलीच्या वीस कार्यकर्त्यांनी घेतला.

कार्यकर्ता प्रशिक्षणांतर्गत प्रा. महेंद्रभाई, सौ. स्वप्नीलाताई व स्थानिक अनुभवी कार्यकर्त्यांनी नवोदितांसाठी तीन कार्यशाळा घेतल्या. संयोजक प्रशिक्षण वर्गाचे दोन टप्पे तर प्रबोधक मंडळ प्रशिक्षण हा या कार्यशाळांचा हेतू होता. अनुक्रमे ३९, ११ व २० अशी कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

वरील कालावधीत आ. संचालकांच्या तीन तर श्री. प्रसाददादांच्या दोन भेटी झाल्या.

छात्र-प्रबोधनच्या दिवाळी अंकांची नोंदणी यंदा १८०५ इतकी झाली तर एकूण ८२ नवीन सभासद झाले. वर्षभरात वेळोवेळी ज्ञान प्रबोधिनीच्या प्रकाशनांची विक्री रु. ४०,२७६/- इतकी झाली. या वर्षी विस्तार केंद्राची रु. ३५,७७५/- इतकी उलाढाल झाली.

➢ **विद्याव्रत संस्कार**

रत्नागिरी येथे पालकांच्या उत्स्फूर्तपणे जमलेल्या गटाने अभ्यास आणि पुरेशी पूर्वतयारी करून ६१ मुला-मुलींचे शिबिर घेतले होते. एप्रिल महिन्यात या विद्यार्थ्यांचा विद्याव्रत संस्कार झाला. या विद्याव्रतींच्या दरमहा विकसिका रत्नागिरीमध्ये होतात. पावस या ठिकाणी अध्यापकांच्या जमलेल्या गटाने ५५ मुला-मुलींचे शिबिर आणि समारंभ असा कार्यक्रम योजला होता. पावसमधील अनेक व्रतार्थी छात्र प्रबोधनच्या जोडीकार्य आणि प्रकल्प स्पर्धा या उपक्रमांमधून सहभागी आहेत.

➢ **युवक संघटन**

रत्नागिरी येथे एक व्यक्तिमत्त्व विकसन शिबिर, एक विद्याव्रत शिबिर, दोन मातृभूमी पूजन कार्यक्रम असे उपक्रम युवकांच्या मदतीने झाले. दरमहा या युवकांची बैठक आणि उपासना असा नियमित उपक्रम येत्या जूनपासून सुरू झाला आहे. विकासिकेत येणाऱ्या मुलांच्या संपर्काची आणि अन्य काही प्रासंगिक उपक्रमांच्या खात्यांची जबाबदारी या युवक गटाकडे देण्यात आली आहे.

➢ **मातृभूमी पूजन**

रत्नागिरी येथे वर्षभरात दोन वेळा मातृभूमी पूजनाचे कार्यक्रम झाले. पहिल्या कार्यक्रमास प्रबोधिनीच्या रत्नागिरी संपर्कातील २५ जण उपस्थित होते. दि. १५ ऑगस्ट रोजी झालेल्या कार्यक्रमास ६० युवक उपस्थित होते. या कार्यक्रमांमधून अनेक संकल्प मांडले गेले.

➢ **मा. संचालक भेट**

विद्याव्रत समारंभाच्या निमित्ताने मा. संचालकांची भेट रत्नागिरी आणि पावस अशा दोन ठिकाणी झाली. पावस येथील अध्यापकांना मार्गदर्शन, रत्नागिरी येथे युवक गट, संपर्कातील सदस्य गट आणि नव्याने शिबिरात कार्यकर्ते म्हणून सहभागी झालेला पालक गट अशा गटांबरोबर परिचय आणि काही मार्गदर्शन अशा स्वरूपाच्या बैठका झाल्या. याशिवाय मा. संचालकांच्या काही गृहभेटी झाल्या. मा. संचालकांच्या भेटीनंतर रत्नागिरीत पालक गटाची दरमहा नियमित उपासना आणि बैठक सुरू झाली आहे.

➢ **अन्य**

धावडशी (जि. सातारा), फुणगुस (जि. रत्नागिरी) या गावांमध्ये छात्र प्रबोधनच्या ग्रामीण वाचक मेळाव्यांच्या निमित्ताने संपर्क झाला. चिपळूण, फोंडा या दोन ठिकाणी विस्तार शिबिरे पुणे आणि निगडी येथील युवकांच्या सहकार्याने झाली.

कणकवली, कुडाळ, सावंतवाडी, पणजी, फोंडा, नागाव परिसर, पनवेल, पेण, सांगली, कोल्हापूर, सातारा या ठिकाणी वर्षभरात परिचय भेटी झाल्या.

पावस, कणकवली आणि खटाव (जि. सातारा) या ठिकाणी नव्याने छात्र प्रबोधनची नोंदणी केंद्रे सुरू झाली आहेत. अलीबाग आणि नागाव या दोन ठिकाणी गेल्या वर्षभरात विविध निमित्ताने भेटी झाल्या.

# नागरी वस्ती अभ्यास गट, पुणे

नागरी वस्ती अभ्यासगटाचे काम हे राष्ट्रीय एकात्मता कामातील एक भाग आहे. समाजातील दुर्लक्षित समाजगटांमध्ये वारंवार संवाद साधून त्यांची मने जाणून घेण्याचा प्रयत्न हा गट करतो. आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिकदृष्ट्या विविध कारणांनी मागे राहिलेल्या समाजबांधवांचे आजचे जीवन समजून घेणे, त्यांच्या विकासाच्या कल्पनांचा, अपेक्षांचा अभ्यास करणे हे या गटाचे मुख्य काम आहे. त्यांना जाणवणाऱ्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी स्थानिक नेतृत्व शोधणे व त्यांच्या पुढाकाराने त्यांना महत्त्वाच्या वाटणाऱ्या एखाद्या प्रश्नावर अथवा विषयावर एकत्र कामाचा अनुभव घेणे अशी कार्यपद्धती वापरली जाते.

या वर्षी नागरी वस्ती अभ्यासगटात २० जणांचा सहभाग होता. तसेच अभ्यासगटाच्या मासिक बैठकाही झाल्या. मुख्यत्वे पुढील वस्त्यांमधील लोकांबरोबर काम केले. मामासाहेब दांडेकर वस्ती, वडारवस्ती (फर्ग्युसन महाविद्यालयाजवळील), काशीवाडी (भवानीपेठ), मातंगवस्ती, किष्किंधानगर (पौडरोड).

➢ **दांडेकर वस्ती**

**स्नेहमेळावा** - एप्रिल महिन्यामध्ये पूर्वपरिचित मुले व त्यांचे पालक अशांसाठी स्नेहमेळावा झाला. त्यात एकूण ६० लोक उपस्थित होते. त्यामध्ये शिबिरे व वर्षभरातील कार्यक्रमांचे नियोजन यावर चर्चा झाली. उपासना व तीळगूळ वाटपाचा कार्यक्रम झाला.

**शिबिरे व प्रशिक्षण वर्ग** - या वर्षी मुलामुलींची दोन शिबिरे झाली. त्यात २५ जण सहभागी झाले. उपासना, खेळ, कलासत्रे, पद्य, गटचर्चा असे शिबिराचे स्वरूप होते. युवती व महिला यांच्यासाठी वारली पेंटींगचा वर्ग झाला. त्यात ८ जणी ही कला शिकल्या. रांगोळी प्रशिक्षण वर्ग झाला, त्यात ३० महिलांनी संस्कार भारतीच्या रांगोळी पद्धतीचे शिक्षण घेतले. या सर्व गटांशी पुढे वर्षभर संपर्क व संवाद चालू ठेवला होता.

वर्षाचा संपर्क व अनुभवाच्या आधारे वस्तीबरोबर स्थिर स्वरूपात काम करायचे ठरवले.

**वर्षारंभ** - जुलैमध्ये झाला. मुले, पालक व अभ्यासगटातील प्रबोधिनीतील सदस्य असे ३० जण उपस्थित होते. या मुलांचे साप्ताहिक दल व अभ्यासिका असा कार्यक्रम सुरू झाला. ही अभ्यासिका मार्च अखेरपर्यंत चालू ठेवली होती. त्यामध्ये प्रामुख्याने संवादिनी, युवती विभाग व प्रशालेतील इ.९ वी च्या २० मुलींनी कामाचा अनुभव घेतला. अभ्यासगट सदस्यांनी लॅपटॉप च्या आधारे संगणक हाताळण्याचा अनुभव मुलांना दिला.

## ➢ किष्किंधानगर

वर्षभराच्या कालावधीत मुलामुलींची स्वतंत्र शिबिरे झाली. २० मुली व १५ मुले यात सहभागी झाली. या शिबिराची वैशिष्टये म्हणजे मुलांनी पर्यावरणावर भेटकार्ड व पोस्टर्स गटकार्याचा भाग म्हणून तयार केली. तसेच निसर्गचक्र , पर्यावरण या विषयांवर चर्चा केली. कलासत्रामध्ये साच्याच्या सहाय्याने मातीच्या विविध मूर्ती तयार केल्या. वारली पेंटींग शिकवले. मुलींच्या शिबिरामध्ये भेटकार्ड, भरतकाम, विविध गीते व उपासना घेतली. शिबिरातील मुलांच्या घरी गृहभेटीतून पालकांशी संवाद साधला व प्रबोधिनीची माहिती दिली.

## ➢ वडारवस्ती

जानेवारी ते मार्च या कालावधीत अभ्यासगट सदस्यांच्या एकत्र तीन भेटी होऊन तेथील नवरात्र तरूण मंडळाच्या जागेत मुलामुलींसाठी कार्यक्रम सुरू झाले. एका सत्रामध्ये विशेष नोंद घ्यावी असे काम मुलांनी केले. आदर्श वस्ती या विषयावर मुलामुलींनी चित्रे काढली. त्यात त्यांनी पुढील कल्पना मांडल्या होत्या. स्वच्छता, सौंदर्य, आदर्श शाळा, वृक्षारोपण, बगीचा, सुंदर गृहरचना, आखीव वस्ती इ. या चित्रांवर झालेल्या परिसंवादात प्रत्येकाने चित्रामागील आपला विचार इतरांना समजावून दिला. नेहमीच्या सत्रांमध्ये विविध प्रकारचे खेळ, गप्पागोष्टी, अभ्यासाची व शाळेची चौकशी इत्यादि विषय झाले. सुट्टीमध्ये शिबिरांसाठी भेटायचे ठरवून हे वर्ष संपले. नवरात्र तरूण मंडळाच्या कार्यकर्त्यांशी वेळोवेळी संवाद साधून वैचारिक देवाणघेवाण केली गेली.

## ➢ काशीवाडी

या वस्तीमध्ये वर्षभर सर्व वयाच्या सामाजिक व राजकीय क्षेत्रातील लोकांच्या भेटी घेतल्या होत्या. एप्रिल व मे महिन्यात मुलामुलींची शिबिरे झाली. यामध्ये १५ मुली व १० मुले यांनी सहभाग घेतला. येथील मुलांची विविध कलागुणांच्या अभिव्यक्तीची आवड लक्षात घेऊन शिबिर योजले गेले. अभंग व गीतांवर मुलांनी नाट्य बसवून सादर केले व कलासत्रे, क्रीडासत्रे झाली. मातृभूमी पूजनाच्या कार्यक्रमाने शिबिराचा समारोप झाला. स्थानिक काशीविश्वेश्वर मंडळाचे कार्यकर्ते, महिला व पालक शिबिराचे कार्यक्रम पाहण्यास उपस्थित होते.

## ➢ मातंगवस्ती

मागील वर्षाच्या प्रशिक्षण वर्ग व शिबिरे यातील सदस्यांचा विविध भेटींच्या निमित्ताने पाठपुरावा केला. शिवणकाम शिकलेल्या मुली या कलेमधून स्वयंरोजगार निर्माण करू शकल्या आहेत, असे आढळले. वस्तीतील लोकांचे नियमितपणे कपडे शिवणे व बाहेरच्या ऑर्डर्स घेऊन पिशव्या तयार करून देणे असे काम दीपाली वैराट व मनिषा दोडके यांनी सुरू केले आहे. साप्ताहिक दल व अभ्यासिकेतील मुलांच्या पालकांच्या गृहभेटी केल्या गेल्या. स्थानिक गरज म्हणून अनेक मुलामुलींना व महिलांना त्यांच्या प्रश्न व अडचणीनुसार समुपदेशन केले गेले. त्यातून काहींचे वैयक्तिक व कौटुंबिक प्रश्न व अडचणी सुटायला मदत झाली. मुलींची स्थिर अभ्यासिकेची गरज लक्षात आली. यावर्षी प्रासंगिक मार्गदर्शनच करणे शक्य झाले. पुढील वर्षी अभ्यासिका सुरु करण्याचे ठरले आहे.

## ➢ प्रबोधिनीतील अभ्यासगट कार्यकर्त्यांचा मेळावा

मागील वर्षात अभ्यासगटाद्वारे काम केलेल्या सव्वाशे कार्यकर्त्यांशी जानेवारी-फेब्रुवारी या कालावधीत संपर्क करून सर्वांच्या सोयीने पहिल्याच मेळाव्याचे नियोजन केले. प्रत्यक्ष ३ फेब्रुवारीला अभ्यासगट कार्यकर्त्यांचा मेळावा झाला. ५० जणांच्या उपस्थितीत आत्तापर्यंतच्या कामाचा आढावा प्रा. हर्षाताईंनी घेतला. परस्पर परिचयातून प्रत्येकीने कामाचे निवेदन व पुढील नियोजन सांगितले. मान्यवर संचालक गिरीशराव बापट यांनी वस्तीपातळीवरील कामाची गरज आणि महत्त्व तसेच उपयुक्त कार्यपद्धती याबाबत सर्वांना मार्गदर्शन केले. कार्यवाह मा. सुभाषराव देशपांडे कार्यक्रमास उपस्थित होते. चहापानाच्या कार्यक्रमात संचालक व कार्यवाह यांच्यासोबत कार्यकर्त्यांच्या अनौपचारिक गप्पांमधून कार्यकर्त्यांची वस्तीकाम व प्रबोधिनी याबद्दलची आत्मीयता वाढली. मेळाव्याचे संपूर्ण नियोजन व संयोजन युवती विभागातील कार्यकर्त्यांनी यशस्वीपणे केले. मेळाव्यानंतर अभ्यासगटाची दर गुरूवारी साप्ताहिक बैठक विनायक भवनमधील नागरवस्तीच्या कार्यालयात सुरू झाली आहे.

⅄ ⅄ ⅄

# ग्रामविकसन प्रभाग

❖ पुणे जिल्ह्याच्या शिवगंगा व गुंजवणी खोऱ्यांमध्ये प्रबोधिनीचे पुणे केंद्राचे ग्रामविकसनाचे काम चालते. हवेली, भोर, वेल्हे व पुरंदर अशा चार तालुक्यांमधील २३६ गावांशी या ना त्या निमित्ताने प्रबोधिनीचा संपर्क आहे. त्यातील सुमारे ५० गावांमध्ये विविध प्रकारचे नियमित काम चालते.

## नैसर्गिक संसाधने विभाग

### ➢ झरे विकास

वेल्हे तालुक्यात गेली पाच वर्षे झरे विकासाचा कार्यक्रम चालू आहे. यंदा वरोती (बु।।) व केळद गावात दोन ठिकाणी, वरोती खुर्द, गेळगाणे व कुसगाव (ता. भोर) या गावांमध्ये प्रत्येकी एका ठिकाणी अशा एकूण पाच गावांमध्ये सात ठिकाणी झरे विकास कार्यक्रम घेण्यात आला.

या कार्यक्रमांतर्गत ज्या ठिकाणी पाण्याचे झरे आहेत, अशा जागी सुरुंगाच्या आधारे जमिनीत स्फोट घडवून आणून पाण्याच्या साठ्याच्या वाढीसाठी, विहिरीसारखी खोलगट जागा केली जाते. यामुळे उन्हाळ्यात गावाजवळ पाणी उपलब्ध होऊन महिलांची पाण्यासाठी रानोमाळ होणारी पायपीट थांबते. ज्या डोंगराळ व दुर्गम गावांमध्ये पिण्याच्या पाण्याचा टँकरही पोहचू शकत नाही, अशा गावांमध्ये हे काम केले गेले, हे विशेष. प्रामुख्याने वेल्हे तालुक्यातील तोरणा किल्ल्यामागील पासली खोऱ्यातील ही गावे आहेत.

या उपक्रमासाठी प्रबोधिनी प्रशालेच्या १९९९ च्या तुकडीच्या माजी विद्यार्थ्यांनी देणगी देऊ केलेली आहे. या उपक्रमात जमिनीत सुरुंग उडल्यानंतर निघणारी दगड-माती ग्रामस्थ स्वतः श्रमदानाने काढतात, ही उल्लेखनीय बाब आहे. या उपक्रमातील लोकांचे योगदान ५०% हून अधिक आहे. या कामासाठी आत्तापर्यंत सुमारे १ लक्ष रुपये खर्च आला आहे. यापैकी रु. ५० हजार खर्च हा लोकांच्या शारीरिक श्रमदानाच्या योगदानातून झाला आहे. सुरुंग उडविण्याचा खर्च हा माजी विद्यार्थ्यांच्या देणगीतून व नातू ट्रस्टच्या अंशतः देणगीतून झालेला आहे.

गेळगाणे सारख्या अत्यंत गरजू व धनगर समाजाची वस्ती असलेल्या गावात तर हातसुरुंगाद्वारे हे काम यंदाच्या वर्षी करण्यात आले. केळदच्या धनगरवस्तीने तर सुरुंग उडविणारा ट्रॅक्टर गावात यावा यासाठी स्वखर्चाने दोन तास जेसीबी चालवून व शारीरिक श्रमदान करुन रस्ता तयार केला, हे विशेष नमूद करण्यासारखे आहे.

### ➢ वसुंधरा पाणलोट प्रशिक्षण कार्यक्रम

राज्य शासनातर्फे सध्या पुणे जिल्ह्यात वसुंधरा पाणलोट प्रशिक्षण कार्यक्रम सुरु करण्यात आला आहे. या कार्यक्रमाअंतर्गत गावपातळीवर प्रशिक्षणासाठी यशदातर्फे पाणलोट क्षेत्र विकासामध्ये काम केलेल्या अनुभवी व तज्ज्ञ स्वयंसेवी संस्थांची निवड करण्यात आली. त्यानुसार खेड-राजगुरुनगर तालुक्यातील १५ व दौंड तालुक्यातील ६ गावांसाठीची प्रशिक्षणाची जबाबदारी ज्ञान प्रबोधिनीकडे सोपविण्यात आलेली आहे.

या कार्यक्रमाअंतर्गत गावपातळीवर पाणलोट समिती सदस्य व अन्य ग्रामस्थांना पाणलोटाची संकल्पना व विविध उपचारपध्दती समजावून सांगणे तसेच या कार्यक्रमातील लोकसहभागाचे आणि महिलांच्या सहभागाचे महत्त्व पटवून देणे, तसेच वसुंधरा प्रकल्पाची रचना समजावून सांगणे अपेक्षित आहे.

आत्तापर्यंत वर्षभरात खेड व दौंड तालुक्यात एकूण १४ जनजागृती मेळावे आणि ४४ परिचय प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यात आले. ५८ कार्यक्रमांचा हा पहिला टप्पा आता पूर्ण झाला असून यात एकूण २,९४१ व्यक्तींना प्रशिक्षण देण्यात आले. या कार्यक्रमात गावपातळीवर संगणक व LCD Projector चा वापर करुन छायाचित्रे व चित्रफिती ग्रामस्थांना दाखवण्यात आल्या.

या सर्व कार्यक्रमांचा सविस्तर अहवाल तयार करुन तो नुकताच यशदाकडे सादर करण्यात आला आहे.

**पाणलोट क्षेत्र विकास :** शिवगंगा व गुंजवणी खो-यात कपार्ट, नवी दिल्ली यांच्या अर्थसहाय्यातून सुरु असलेला पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम सध्या अंतिम टप्प्यात आहे. पुणे जिल्ह्यातील भोर तालुक्यातील ७ गावांमध्ये तर वेल्हे तालुक्यातील ४ गावांमध्ये गेली दहा वर्षे पाणलोट क्षेत्र विकासाची कामे चालू आहेत.

**माती नाला बांध :** करंदी (ता. भोर) या गावात गेल्या वर्षभरात तीन माती बंधारे नव्याने बांधण्यात आले. बापदरा या जागेवरील माती बंधाऱ्यासाठी लाभार्थी शेतक-यांनी पिचिंगसाठी श्रमदानाने दगड गोळा करण्यास मदत केली. सुमारे ५० मीटर लांब व ४ मीटर उंचीचा हा माती बंधारा आहे.

या तीनही बंधाऱ्यांसाठी मिळून एकुण सुमारे रु.३ लक्ष इतका खर्च आला. या माती बंधा-यामुळे परिसरातील भातशेतीला चांगला उपयोग झाला. मातीबांधाच्याखालील विहिरींचा पाणीसाठा वाढण्यास मदत झाली.

करंदी गावात आत्तापर्यंत एकूण १३ माती बंधारे बांधून पूर्ण झाले आहेत तर ५ शेततळी बांधलेली आहेत. याशिवाय बांधदुरुस्ती व शेतजमीन सपाटीकरणाची कामेही मोठ्या प्रमाणात झालेली आहेत. ही सर्व कामे बघण्यासाठी पुरंधर तालुक्यातील सुमारे ६० शेतकरी स्वतःहून येऊन गेले.

## राम-सीता पुराणिक तंत्रनिकेतन, शिवापूर

यावर्षी शिवणकलेचे विशेष वर्ग म्हणजे ब्लाऊज व स्पेशल ड्रेस यांचे शिक्षण शिवणवर्ग शिक्षिका सुनिता गायकवाड यांनी दिले. तसेच जर्दोसी, ज्वेलरी, ग्लास पेंटिंग, फॅन्सी बॅग इ. वर्गांचे शिक्षण अश्विनी ठाकर ह्या देत आहेत. प्रशिक्षणाबरोबरच काही विशेष उत्पादने तयार करून त्याच्या मार्केटिंगचा प्रयत्न करत आहोत.

शिवण कामाबाबत औद्योगिक शिवण उत्पादनास उपयुक्त शिक्षण देणाऱ्या महर्षी कर्वे शिक्षण संस्थेत तंत्रनिकेतनच्या शिक्षक गटाने भेट दिली व माहिती घेतली. पुढील वर्षात औद्योगिक शिवण या विषयावर भर देण्याचा विचार आहे. तंत्रनिकेतनमध्ये प्रशिक्षण व इंडस्ट्रियल प्रॉडक्शन सुरु करण्याबाबत युवतींचा अभ्यास सुरु आहे.

ऑक्टोबर महिन्यात गावांमध्ये वर्गांचा प्रचार प्रसार केला. दि. १४ ते १७ ऑक्टोबर मध्ये ईशान्या मॉल येथे प्रदर्शन झाले. दि. २१ ते २४ ऑक्टोबर मध्ये भीमथडी जत्रेत सहभाग घेतला. दि. १३ व १४ जानेवारी २०११ रोजी सिम्फनी या कंपनीमध्ये विक्री केंद्र लावण्याची संधी श्री. सचिन गाडगीळ यांनी दिली. वाख वस्तू व कापडी पर्स इ. वस्तू विक्रीसाठी ठेवल्या होत्या. त्या दोन ठिकाणी मिळून रु. ४,९००/- ची विक्री झाली.

दि. ३ फेब्रुवारी रोजी प्रकल्पाचे अर्थसहाय्य करणारे डॉ. सुभाषराव पुराणिक यांनी शिवापूर येथे पुराणिक तंत्रनिकेतनला भेट दिली. चालू असलेल्या प्रशिक्षण वर्गाची पाहणी केली. महिला व मुलींशी चर्चा केली आणि मार्गदर्शन केले. या वर्षभरात पुढील वर्ग झाले - शिवण (शिवापूर, वेल्हे), फॅन्सी बॅग, जर्दोसी, ज्वेलरी, ग्लास पेंटींग, मणी वर्ग, वाख वर्ग, रांगोळी; दांडेकर वस्ती (महिला व युवती) वारली पेंटींग (युवती) वर्षभरात मिळून २९३ जणींनी प्रशिक्षण घेतले.

## स्त्री शक्ती प्रबोधन

### ➢ किशोरी विकास

**व्यक्तिमत्त्व विकसन तासिका** : यावर्षी पासली, वेल्हे, विंझर, आंबवणे, शिवरे, कुसगाव, कल्याण, कोंढणपूर या ८ गावातील माध्यमिक शाळांमधल्या ८ वीच्या वर्गावर आपण तासिका घेतली. ही तासिका महिन्यातून एकदा २५० किशोरींसाठी घेतली. या वर्गात व्यक्तिविकासाची सत्रे, म्हणजे किशोरींना गटासमोर बोलणे, पुढे येऊन बोलणे यावर सराव घेतला तर आरोग्याची माहिती दिली व अभ्यास कसा करावा यावर मार्गदर्शन केले. याशिवाय, हात शिलाई, क्रेप कागदाची फुले, वायरपासून की-चेन अशी विविध कौशल्ये शिकविली.

**शिबिरे** : या सर्व गावात दिवाळीपूर्वी २ दिवसांचे व वार्षिक परीक्षेनंतर २ दिवसांचे शिबिर त्या त्या शाळेत झाले. याला उपस्थिती ऐच्छिक होती. प्रथम सत्रात साधारण १७५ तर दुसऱ्या सत्रात ९२ उपस्थितीत ही शिबिरे झाली. या शिबिरात मुलींना आकाश कंदिल, पणत्या रंगविणे या हस्तकौशल्या बरोबरच गटकार्य, गटचर्चा व बौद्धिक खेळ शिकविले. अनेक जणींनी या स्वरूपाच्या शिबिरात प्रथमच सहभाग घेतला होता.

**नेतृत्व शिबिर -** किशोरी विकासातील मुलींपैकी निवडक मुलींमध्ये नेतृत्व गुण विकसन व्हावे म्हणून दोन स्वतंत्र शिबिरे दोन्ही सत्रात झाली. त्यास अनुक्रमे १५ व २१ संख्या होती.

वेल्हे तालुक्यातील मुलींच्या शारीरिक क्षमतेच्या स्पर्धा घेतल्या. त्यास ५४ जणी आल्या होत्या. त्यातील सर्वात चांगली क्षमता असणारी अश्विनी वाडघरे हिला निगडीतील क्रीडाकुलमध्ये प्रवेश मिळाला.

**क्षमता विकास प्रकल्प :** कुसगावच्या शाळेत क्षमता विकासाचा प्रकल्प इ. ९ वीच्या वर्गासाठी प्रज्ञा मानस संशोधिके सोबत केला. या प्रकल्पा अंतर्गत विद्यार्थ्यांची ८ प्रशिक्षण सत्रे झाली.

### ➢ युवती विकास

**'जास्वंद' तुकडी आंबवणे :** दि. १ ऑक्टोबर २०१० ते ३१ मार्च २०११ या ६ महिन्यात 'शब्द ते शक्ती' प्रकल्पांतर्गत २० युवतींची 'जास्वंद' तुकडी आंबवणे येथे घेतली. त्यात व्यक्तिविकास व स्वयंरोजगाराची कौशल्य प्रशिक्षणे घेतली. मेंदी काढणे, पणत्या रंगवणे, क्रोशा काम, उन्हाळी वाळवणे बनविणे अशी कौशल्ये युवतींनी शिकली. या वर्गात शिवण कामही घेतले. तंत्रज्ञान या विषयात सौर ऊर्जेची उपकरणे कशी वापरावीत हे युवती शिकल्या. २० दिवस युवतींनी घरून शिधा आणून सौर कुकरमध्ये पदार्थ बनवून जेवण केले. १० गावात सौर कुकर नेऊन जवळ जवळ ३५० जणांना त्याचे प्रात्यक्षिक दाखवले.

या वर्गाची सहल प्रबोधिनीचे हराळी केंद्र बघायला व त्या सोबत तुळजापूर-गाणगापूर येथे जाऊन आली. विशेष म्हणजे सहलीला जाऊन आल्यावर या वर्गाने प्रबोधिनीची उपासना व्यवस्थित शिकून घेतली व उपासना हा रोजचा प्रार्थनेचा भाग केला. पहिल्या दिवशी स्वतःचे नाव सांगताना लाजणाऱ्या युवतींनी वर्गाच्या समारोपाला पुढे येऊन भाषणे केली.

**पुढे काय? मार्गदर्शन :** शिवगंगा व गुंजवणी खोऱ्यातील ६ शाळेत इ.१० वी व १२ वी नंतर पुढे काय? या विषयी मार्गदर्शन करणारी व्याख्याने ४०० जणांसाठी योजली.

**शिवणकला :** साखर, आंबवणे येथे ३ महिन्याचा शिवणवर्ग झाला. एकूण २४ जणींनी पंजाबी ड्रेस व ब्लाऊज शिवण्याचे प्रशिक्षण घेतले. त्यातील ६ जणी मशीन घेऊन गावात शिवणकामही करू लागल्या आहेत.

**होम नर्सिंग कोर्स :** १४ युवतींची होम नर्सिंग कोर्सची दुसरी तुकडी वेल्हे येथे सुरू झाली. हा वर्ग 'स्वरूपवर्धिनी' सोबत घेत आहोत.

**आरोग्य प्रबोधिका वर्ग :** युवतींसाठी प्रथमोपचाराची माहिती देणारा व किरकोळ आजारावर उपचार काय व कसे करावेत या संबंधी माहिती

देणारा वर्ग घेतला. वर्ग यशस्वीरित्या पूर्ण करून परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या १७ जणींना प्रशस्तिपत्रके देण्यात आली. हा वर्ग वैद्य मनिषाताई उपाध्ये यांनी घेतला.

## ➢ महिला विकास

### महिला : व्यक्तिविकास

**बचत गट :** ज्ञान प्रबोधिनीच्या वतीने चालणाऱ्या बचत गटांचे दैनंदिन व्यवस्थापन जिजामाता प्रबोधन केंद्राद्वारे केले जाते. सध्या ३६ गावात २८७ गटांमध्ये ५११६ सभासद सहभागी आहेत. मार्च २०११ अखेर सर्व गटांची मिळून बचत रु. १,०२,८६,०४५/- झाली. त्यातून रु.२,४२,३२,७०८/- एवढे आवर्ती कर्ज वाटप झाले. या व्यवहारातून सभासदांना रु. ३७,११,६९६/- व्याज मिळाले. बँकांनी या गटांना दिलेले अर्थसहाय्य ५० लाखांच्या घरात गेले आहे.

**मेळावे :** शिवरे गावात यंदाही संक्रांती निमित्त मेळावा झाला. त्याला ७० महिला उपस्थित होत्या. या मेळाव्यात महिलांच्या विविध स्पर्धा घेऊन त्यांना बक्षिसे देण्यात आली. कार्यक्रमाचे सर्व नियोजन स्थानिक महिलांनी केले. याचा खर्चही शिवरे विभागानेच केला.

मोरदरी गावात बचतगट सदस्याचा प्रथमच मेळावा झाला. त्यास २५ जणी उपस्थित होत्या. या मेळाव्यात स्वयंरोजगारावर चर्चा झाली. याच गटातील दोघींनी पुढे २ मोठ्या प्रदर्शात भाग घेतला.

धानेप गावात प्रथमच महिलांचा मेळावा झाला. त्याला संस्कार विभागातील सौ. आर्याताई जोशी प्रमुख पाहुण्या म्हणून आल्या होत्या. या मेळाव्यास ३५ जणी हजर होत्या. महिलांच्या विविध स्पर्धा घेऊन बक्षिसे देण्यात आली. आर्याताईंनी काही जणींना मंगलाष्टके म्हणायला शिकविली.

यावर्षी संस्कार विभाग-पुणे येथील पुरोहितांनी मार्गशीर्षातील वैभवलक्ष्मीचे गुरुवारचे व्रत कसे करावे, याविषयी मार्गदर्शन करुन प्रत्यक्ष उद्यापनाची पूजा सांगितली. हा कार्यक्रम वेल्हे गावात झाला. त्यास ३५ जणी हजर होत्या.

### महिला : आरोग्य

**डोळ्याची तपासणी :** ४ गावात मिळून १७६ ज्येष्ठ नागरिकांच्या डोळ्यांची तपासणी केली. त्यातून ८ जणांची मोती-बिंदूसाठीची मोफत शस्त्रक्रिया शिरवळच्या रुग्णालयात झाली. आपल्या आरोग्य प्रबोधिकांनी लासरुची शस्त्रक्रिया करायलाही ३ रुग्णांना पटवले व त्यांच्या शस्त्रक्रिया आयोजित केल्या.

**गरोदर महिला आरोग्य तपासणी :** गेल्या वर्षी प्रमाणे यंदाही डॉ.वैशाली बिनीवाले यांनी आंबवणे येथे दर महिन्याला गरोदर महिलांची आरोग्य तपासणी केली. या तपासणी केंद्रामुळे काही महिलांच्या वैद्यकीय प्रश्नांवर पुण्यात उपचार होऊन त्या महिला 'आई' होऊन कुटुंबात सुखाने नांदत आहेत.

**महिला आरोग्य तपासणी :** डॉ.स्नेहल पुरंदरे यांनी या वर्षी ग्रामीण महिलांची आरोग्य तपासणी व आरोग्य प्रबोधन केले. तपासणीच्यावेळी मेधाताई उपाध्ये यांनी हिमोग्लोबीन तपासणी केली. तपासणीमध्ये१० पेक्षा कमी प्रमाण असणाऱ्या ६२ जणी होत्या. त्यांना औषधेही दिली.

या तपासणीनंतर अंगावर आजार काढणाऱ्या बऱ्याच महिला उपचारासाठी आपणहून दवाखान्यात गेल्या हे लक्षात आले.

**कुपोषण मुक्त तालुका :** या वर्षी आपण 'वेल्हे तालुका कुपोषणमुक्त करणे' या कार्यक्रमात सहभाग घेतला . ११५ अंगणवाडीताईंचे दरमहा आरोग्य प्रशिक्षण घेतले. याची मुख्य जबाबदारी वैद्य मनिषाताई उपाध्ये यांनी घेतली. त्यात आहारावर मार्गदर्शन करायला डॉ. विजया साठे (आहारतज्ज्ञ), डॉ. वैशाली बिनीवाले (स्त्री रोगतज्ज्ञ), सौ. सुषमा साठे (आहारतज्ज्ञ), डॉ. मुडगीरीकर (बालरोग तज्ज्ञ) याही आल्या होत्या. जनकल्याण रक्तपेढीच्या मदतीने सर्व ताईंच्या रक्ताची तापसणी केली व ज्यांना कुठल्यातरी प्रकारचा ॲनिमिया आहे, अशांना औषधोपचारही केले.

अंगणवाडीत येणाऱ्या मुलांची तपासणी केली. तपासणी झाल्यानंतरही ज्या मुलांचे वजन वाढत नाही अशांची तपासणी दीनानाथ रुग्णालयातील डॉ. रश्मी गपचुप यांच्याकडून करुन पुढील उपचारांसंबंधी पालकांशी बोलणी केली.

**धुरांडीकौल :** महिलांना चुलीच्या धुरामुळे होणारा त्रास चुलीच्या वर धुरांडे कौल बसविले असता कमी होईल म्हणून रोटरी क्लबच्या अर्थसाहाय्यातून कोदवडी व सांगवी या गावी १५० घरांसाठी धुरांडी कौलाचे वाटप करण्यात आले.

**प्रशिक्षक - प्रशिक्षण वर्ग :** वाढत्या वयातील मुला-मुलींना आरोग्याची कशी माहिती द्यावी हे सांगणारा वर्ग संवादिनी या पुण्याच्या गटाने वेल्ह्याला घेतला. या वर्गास १७ जणी पूर्णवेळ उपस्थित होत्या.

### महिला : आर्थिक विकास

**स्वयंरोजगार केन्द्र :** महिलांनी स्वतंत्रपणे लावलेल्या मुंबई सरस प्रदर्शन, भीमथडी प्रदर्शन इ. स्टॉल्सवर वर्षभरात रू.३,७०,०००/-विक्री झाली, तर ज्ञान प्रबोधिनी स्वयंरोजगार केंद्राची रू.१,६५,४९४/-विक्री झाली. या वर्षी दिवाळी फराळ, उटणे व तिळगूळ याचे उत्पादन रू.१,३४,०००/- एवढे झाले.

**उन्हाळी वाळवणांचे प्रशिक्षण :** उन्हाळी वाळवणांचे प्रशिक्षण वेगवेगळ्या गावातील १६ जणींना दिले व त्यांनी जवळ जवळ २५० किलो उत्पादन केले.

**शिवण :** शिवणवर्ग करून चांगले शिवण शिकलेल्या ४ जणींनी हॉस्पिटलसाठी मास्क व टोप्या शिवण्याचे काम व्यावसायिक तत्त्वावर करायला सुरुवात केली.

**शेती व्यवसाय :** शेतकरी महिलांचे शेती 'व्यवसाय' म्हणून करणे यासंबंधीचे दोन दिवसांचे प्रशिक्षण शिवापूर कार्यालयात झाले.

**दुग्ध व्यवसाय प्रशिक्षण** : खोपीमध्ये SGSY योजनेतल्या लाभार्थी असणाऱ्या दारिद्र्यरेषेखालच्या १०० जणींचे दुग्ध व्यवसाय प्रशिक्षण झाले. त्यात खोपीतल्या आपल्या ६० जणींनी प्रशिक्षण घेतले.

*** पर्यटन सहली** : या वर्षी सहलीचे २ भाग केले होते. जुलै, ऑगस्ट महिन्यात 'भात लावणी करायला चला' असे आवाहन करुन ६ आठवड्यात २२५ जणांच्या ११ सहली एकूण ९ गावांना गेल्या. दुसऱ्या प्रकारच्या 'ग्रामीण जीवन परिचय' या सहलीला या वर्षी ६ शाळांतील ७१३ विद्यार्थी आले होते.

*** खरेदी विक्री** : भट्टी गावाने एकत्र येऊन गेल्या वर्षीप्रमाणेच प्रबोधिनीतून रु. ५०,००० कर्ज घेऊन बंबांची एकत्र खरेदी केली. त्यामुळे महिलांचे सरपण गोळा करायचे कष्ट वाचणार आहेत.

शिवापूरच्या विभागानी घाऊक बाजारातून गहू, ज्वारीची पुण्यातून खरेदी केली व गटात विक्री केली, तर श्रीरामनगरने बाजरीची खरेदी-विक्री केली.

ही खरेदी विक्री साधारण २ लाखाची झाली. महिलांची व्यावहारिक समज वाढत चाललेली या उपक्रमातून दिसते.

गुंजवणी खोऱ्यातील अनेक गावात गावकीचा होळी फंड असतो. त्या निमित्ताने लाखो रुपयांची उलाढाल खोऱ्यात चालते. हे फंड दरमहा ३ ते ५% व्याजाने असतात. ते कसे परवडत नाहीत यावर आर्थिक साक्षरतेचे प्रशिक्षण बचत गट प्रमुखांना दिले.

**महिला : नेतृत्व विकसन**

या वर्षी बचत गटातील यशस्वी महिलांवर २ छोट्या फिल्म्स् तयार केल्या. 'आता नाही मी एकटी' : भाग १ व २ अशी त्यांची नावे आहेत. या फिल्म्स्मध्ये गटामुळे सावकारीतून मुक्त होऊन स्वयंरोजगाराचा मार्ग कसा खुला झाला, हे भारती दळवी (शिवरे) यांचे अनुभव कथन आहे; तर बँकेच्या व्यवहारातून गटाच्या उद्योजकतेचे गावावर कसे परिणाम दिसतात, हे कावेरी शिवरकर व प्रतिभा कुंभार यांच्या अनुभव चित्रणातून दिसते.

राष्ट्रीय पातळीवरील We-meet या स्त्रीशक्ती संघटनेद्वारे भरवलेल्या परिषदेमध्ये आशा गोगावले यांना उद्योजिका म्हणून सन्मानित करण्यात आले, तर शोभा चोरगे, बागेश्री पोंक्षे, सुवर्णा गोखले यांनी त्यात स्वयंसेवी संस्थेच्या उद्योजकता विकासावर आपापल्या निबंधाचे वाचन केले.

पद्मश्री क्षमादीदी म्हेत्रे, हिमाचल प्रदेश, यांनी आपल्या पुणे कार्यालयाला भेट दिली आशाताई गोगावले यांना पुणे मराठी ग्रंथालयाने 'मातृस्मृती पुरस्कार' देऊन गौरविले.

रिझर्व बँकेने घेतलेल्या आर्थिक साक्षरता परिषदेस कावेरी शिवरकर व सुवर्णा गोखले या पूर्णवेळ हजर होत्या. रिझर्व बँकेचे गव्हर्नर मा. सुब्बाराव यांच्याशी बचतगट- बँक या संबंधी प्रत्यक्ष भेटून बोलण्याची संधी मिळाली. या दोघींनी गटांद्वारे गृहकर्ज द्यावे, महिला बचत गटांची खाती असणाऱ्या बँकेत किमान एक महिला अधिकारी असावी व बँकेत जाणे-येणे यासाठी होणारा खर्च कमी करण्यासाठी काहीतरी करावे, असे मुद्दे मांडले. या बैठकीला भारतभरातून निवडक ७५ जणांना आमंत्रित करण्यात आले होते.

**प्रशिक्षण** : प्रसाद चिकित्सा, सोस्वा प्रशिक्षण संस्था, सेंट्रल बँक ट्रेनिंग कॉलेज, यशदा, रिझर्व बँकेचे कॉलेज ऑफ ॲग्रि बँकिंग या ठिकाणी मिळून एकूण २६ प्रशिक्षण सत्रे घेतली. या सत्रांमध्ये भारती खासबागे, आशा गोगावले, गंगूताई सांगळे, भारती दळवी, आशा सुर्वे, सुरेखा दिघे, बागेश्री पोंक्षे व सुवर्णा गोखले यांनी बचत गटांचे अनुभवकथन केले व गटाच्या व्यवस्थापना बद्दल काय- काय व कुठे-कुठे काळजी घ्यायची या विषयीचे प्रशिक्षण दिले. जम्मू-काश्मिर राज्यातील रियासी जिल्ह्यातील अंगणवाडीताईंचे बचत गटासंबंधी संकल्पना स्पष्ट करण्याचे प्रशिक्षण देण्यासाठी बागेश्रीताई व सुवर्णाताई जम्मू काश्मीरला ६ दिवस गेल्या होत्या.

**सहल** : यंदा खोपी येथील ५५ महिलांची ६ दिवस घराबाहेर मुक्काम असणारी सहल बालाजीच्या दर्शनासाठी गेली होती. स्वतःच्या खर्चाने महाराष्ट्राबाहेर एका गावातून गेलेली आजपर्यंतची महिला महिलांची ही सगळ्यात मोठी सहल. ही सहल भारतीताई खासबागे यांच्या मार्गदर्शनाने काढली.

**मुंबई सहल** : वेल्हे तालुक्यातील ८ गावांतून १२ जणींची सहल मुंबई येथे काढण्यात आली. त्यांनी बचत गटाच्या सरस या प्रदर्शनाला भेट दिली व बाजार पाहिला. त्याच बरोबर बांद्र्याचा नवा पूल, विधान भवनाची इमारत, ताज हॉटेल व गेट वे ऑफ इंडिया हेसुद्धा पाहिले.

अशा सहलीच्या अनुभवाने स्थानिक महिलांचे नेतृत्व अधिक समृद्ध होते व त्यांचा आत्मविश्वास लक्षणीयरित्या वाढतो.

**विजया सौर ऊर्जा प्रकल्प** : दि. २ ऑक्टोबर २०१० ते २ फेब्रुवारी २०११ या कालावधीत सौ. नंदाताई काळे (अमेरिका) यांच्या अर्थसाहाय्यामुळे आपण त्यांच्या मातोश्रींच्या स्मरणाने 'विजया सौर ऊर्जा प्रकल्प' शिवगंगा-गुंजवणी खोऱ्यात राबवला. यामध्ये डिलाईट कंपनीच्या २ दिव्यांची जोडी आपण ५७ गावातील २५० कुटुंबांना दिली. त्यात १०४ कुटुंबे अशी होती की ज्यांच्या पर्यंत वीज अजून कधीच पोहोचली नव्हती. ही कुटुंबे मुख्यत: गावापासून लांब, शेतात वसलेली किंवा डोंगरावर २-४ घरे अशा स्वरुपातील वेल्ह्यातील दुर्गम भागातील होती. आपण दिलेल्या दिव्याला मोबाईल चार्जिंगची सोय आहे त्यामुळे रेंज आहे पण वीज नाही, म्हणून चार्जिंगसाठी गावात येणाऱ्या कुटुंबांची चांगली सोय झाली.

या निमित्ताने सौर ऊर्जेच्या दिवे वापराचे प्रशिक्षण दिले. सर्व काम बचत गटाच्या प्रमुखांनी गाव पातळीवर पुढाकार घेऊन केले. त्यामुळे ३० गावात पोहोचायचे ठरवले असताना आपण ५७ गावांपर्यंत पोहोचलो.

इनरव्हिल क्लबच्या अर्थसाहाय्याने केळद गावातील १६ कुटुंबांना असेच दिवे देण्यात आले.

**श्री. अनंत सेटलवाड यांची भेट** : के.एस. बी. पंप्स या कंपनीचे माजी अध्यक्ष व ज्ञान प्रबोधिनीचे हितचिंतक श्री. सेटलवाड यांनी नोव्हेंबर २०१० मध्ये कार्यक्षेत्राला भेट दिली. ह्यावेळी शिवरे, कुरुंगवडी, कोदवडी, हारपुड, वरोती,श्रीरामनगर या गावांना भेटी दिल्या. कोदवडी ह्या गावात मुक्काम केला व ग्रामस्थांशी विकासाच्या विषयावर चर्चा केली. सर्व कार्यकर्त्यांची वर्षभराच्या कामाची निवेदनेही ऐकली व त्यांना मार्गदर्शन केले.

# सीमावर्ती प्रांतांमधील काम

## ➢ ईशान्य भारत कार्यवृत्त

जानेवारी२०११ मध्ये श्री आदित्य पोंक्षे हे लडाख मधील बेमा या गावी तीन आठवडे गेले होते. या काळात त्यांनी त्या गावातील इयत्ता ८ वी ते १० वी तील विद्यार्थ्यांना इंग्रजी, गणित व शास्त्र या विषयांचे मार्गदर्शन केले.

दि.२३ ते २९ जुलै या कालावधीत ईशान्य भारत (आसाम, नागप्रदेश) येथील १० जिल्ह्यांमधून विवेकानंद केंद्राच्या १३ शाळांचे एकूण ४७ विद्यार्थी व १६ शिक्षक ज्ञान प्रबोधिनी, पुणे येथे अभ्यास दौऱ्याकरिता आले होते. त्यांच्याबरोबर विवेकानंद केंद्राच्या प्रमुख श्रीमती ललिता दीदी आल्या होत्या.

ह्या अभ्यासदौऱ्यात विमान छंद कार्यशाळा व प्रात्यक्षिके, ऊर्जा व तंत्रज्ञान, विद्युत प्रकल्प, शास्त्र व जीवशास्त्र, विज्ञान प्रयोग, जैववायु संयंत्र, आयुकामध्ये दुर्बिण बनवणे, विज्ञान खेळणी, आणि शिवाजी महाराजांचा इतिहास या विषयांवर सत्रे झाली.

मार्च २०११ मध्ये विवेकानंद केंद्राच्या अरुणाचल प्रदेशा मधील शाळांतील इयत्ता ९वीच्या सुमारे ७० विद्यार्थ्यांच्यासाठी विज्ञान प्रकल्प या विषयावर ३ दिवसांची कार्यशाळा घेण्यात आली. यासाठी, प्रा.विवेक पोंक्षे आणि श्री. तेजस पोळ प्रशिक्षक म्हणून गेले होते. तसेच रामकृष्ण मिशन, नरोत्तमनगर (अरुणाचल प्रदेश) यांनी आयोजित केलेल्या प्रशिक्षण शिबिरात अनुभवाधारित अध्ययन या विषयाचे मार्गदर्शन केले. त्यात ५० शिक्षकांचा सहभाग होता.

ऑगस्ट ते ऑक्टोबर २०११ या काळात आसाम मधील गोलाघाट, कारबी व आंगलांग या दोन जिल्ह्यातील ५ युवक व १ युवती यांना विज्ञान आश्रम, पाबळ, यांच्या मदतीने व्यावसायिक प्रशिक्षण देण्यात आले.

अरुणाचल प्रदेश मधील एक ज्येष्ठ नागरिक व ज्ञान प्रबोधिनीचे हितचिंतक श्री जतनपुलू यांच्यावर पुणे, येथे दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात एक जोखमीची शस्त्रक्रिया यशस्वीपणे करण्यात आली. त्यासाठी आवश्यक ती मदत व सहकार्य प्रबोधिनीतून व रुग्णालयातून करण्यात आले.

# मध्यवर्ती कार्यक्रम

## ➢ नवीन वास्तू उद्घाटन समारंभ

दि. २९ जानेवारी २०११ रोजी ज्ञान प्रबोधिनी संशोधन व प्रशिक्षण केंद्राचे उद्घाटन डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या हस्ते झाले. या वास्तूचे उद्घाटन अतिशय अभिनव पद्धतीने झाले. डॉ. माशेलकरांनी त्यांच्या जागेवरून कळ (बटन) दाबताच बाहेरील ''ज्ञान प्रबोधिनी : संशोधन व प्रशिक्षण केंद्र'' या फलकावरील पडदा दूर झाला. या नवीन वास्तूच्या जागी मूलतः प्रबोधिनीचे संस्थापक कै. विनायक विश्वनाथ तथा आप्पा पेंडसे यांचे निवसस्थान होते. म्हणून त्यांच्या स्मृतिप्रित्यर्थ नव्या वास्तूचे ''विनायक भवन'' असे नामकरण करण्यात आले.

''नाविन्यपूर्ण अभ्यास व अभ्यासात नाविन्यता आणण्याची नितांत गरज आहे'', असे प्रतिपादन ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांनी केले. ते ज्ञान प्रबोधिनीच्या संशोधन व प्रशिक्षण केंद्राच्या नूतन वास्तूच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते. ''मी अतिशय आशावादी असून काही वर्षातच भारत इतर राष्ट्रांच्या पुढे राहील असे मला वाटते.'' शिक्षणाचे देशघडणीतील व मनुष्यघडणीतील महत्त्व सांगताना - ज्ञान प्रबोधिनी सारख्या अनेक शिक्षण संस्था महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात उभ्या रहायला हव्यात, अशी इच्छा त्यांनी व्यक्त केली.

माशेलकरांसारख्या ऋषितुल्य शास्त्रज्ञांची साथ मिळाल्यास प्रबोधिनीत संशोधनासाठी वेगळ्याच पद्धतीचे मुक्त विद्यापीठ तयार करता येईल, असे मत ज्ञान प्रबोधिनीचे संचालक मा. गिरीश श्री. बापट यांनी मांडले. व्यासपीठावर डॉ. माशेलकरांबरोबरच ज्ञान प्रबोधिनीचे अध्यक्ष डॉ. वसंत गोवारीकर, संचालक डॉ. गिरीश बापट तसेच कार्यवाह श्री. वि. शं./सुभाष देशपांडे व प्राचार्य विवेक पोंक्षे होते. ज्ञान प्रबोधिनीच्या प्रज्ञा मानस संशोधिकेच्या प्रमुख वा. सुजलताई वाटवे यांनी प्रास्ताविकात १९८५ पासूनची प्रबोधिनीची संशोधनाची वाटचाल मांडली.

मा. सुभाष देशपांडे यांनी डॉ. माशेलकरांची ओळख करून दिली व प्रा. विवेक पोंक्षे यांनी देणगीदार व वास्तूशिल्पी यांच्याबद्दल माहिती दिली. या सर्वांचा माशेलकरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. वा. अनघाताई लवळेकर यांनी सूत्रसंचालन केले.

## ➢ भगिनी निवेदिता स्मृतिशताब्दी कार्यक्रम

ज्ञान प्रबोधिनी, पुणे, स्व-रूपवर्धिनी, विवेकानंद केंद्र, भ. निवेदिता सह. बँक, भगिनी निवेदिता प्रतिष्ठान, राष्ट्रसेविका समिती, ग्राहक पेठ, जन्मदा प्रतिष्ठान, महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था, श्री. ना. दा. ठाकरसी महिला प्रशिक्षण महाविद्यालय अशा पुण्यातील दहा संस्था व सासवडची एक अशा एकूण ११ संस्थांनी, १३ ऑक्टोबर २०१० ते १३ ऑक्टोबर २०११ हे भगिनी निवेदितांचे स्मृतिशताब्दी वर्ष निवेदितांचे कार्य आणि विचारधनाच्या प्रचारार्थ वापरले.

भगिनी निवेदिता स्मृतिशताब्दी निमित्त अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. न्यू इंग्लिश स्कूल रमणबाग येथे दि. ९ ऑक्टोबर रोजी हा कार्यक्रम झाला. कार्यक्रमासाठी मा. निवेदितांताई भिडे (उपाध्यक्षा, विवेकानंद केंद्र, कन्याकुमारी) या प्रमुख वक्त्या आणि मा.स्वर्णलताताई भिशीकर (विश्वस्त, ज्ञान प्रबोधिनी, सोलापूर) कार्यक्रमाच्या अध्यक्षा होत्या.

'निवेदिता ह्याचा अर्थच संपूर्ण समर्पण'. भारतासाठी काम करतानाच भारताची ओळख संपूर्ण जगाला त्यांनी करून दिली, असे मा. निवेदिताताई भिडे यांनी सांगितले. स्वामीजींच्या विविध कसोट्यांना उतरत अत्यंत कष्टप्रद अशा जीवनशैलीत त्यांनी स्वतःला कसे झोकून दिले याबद्दल अत्यंत ओघवत्या भाषेत बोलत भगिनी निवेदितांचा जीवनपट त्यांनी सर्वांसमोर मांडला. अशा भगिनी निवेदितांच्या कार्याचा वारसा पुढे चालविण्याची आज गरज आहे, असे प्रतिपादन त्यांनी केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षा वाच. स्वर्णलता भिशीकर यांनी निवेदितांची भारतीय भाषांविषयीची तळमळ, त्यांनी भारतातील लेखक, क्रांतिकारक, कलावंतांना दिलेली प्रेरणा, त्यांचे ज्वालाग्राही तसेच मृदू व्यक्तिमत्त्व, ही सगळी ओळख भारतीयांना करून देण्याचे गरजेचे असल्याचे सांगितले.

जिजामाता, राणी लक्ष्मीबाई, अहिल्याबाई अशा भारतातील कर्तृत्ववान महिलांच्या ओळीत निवेदिताही आहेत असे सांगून त्यांच्या विचाराने जाण्याचा संकल्प करा, असे आवाहन केले. स्मृतिशताब्दी वर्षानिमित्त आयोजित केल्या जाणाऱ्या कार्यक्रमांना दि. ९ ऑक्टोबरपासून सुरुवात झाली. ह्या कार्यक्रमात भगिनी निवेदितांवरील पुढील चार पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले.

१) भगिनी निवेदिता-एक चिंतन शास्त्र-शिक्षण-कला : श्री. दिलीप कुलकर्णी/सौ. संध्या गुळवणी/सौ. चारुता पुराणिक (ज्ञान प्रबोधिनी, पुणे)

२) अगिनीशिखा भगिनी निवेदिता : प्रा. प्रमोद डोरले (भारतीय विचार साधना, पुणे)

३) भारताच्या पाऊलखुणा : वा. सुरुचि पांडे

४) शतरुपे निवेदिता : अनुवादक - साने गुरुजी
(राष्ट्र सेविका समिती, पुणे) य. शं. लेले, वा.सुरुचि पांडे

भगिनी निवेदिता स्मृतिशताब्दी संयोजन समितीच्या वतीने दि. ५ व ७ फेब्रुवारी रोजी आंतरशालेय स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. वक्तृत्व, चित्रकला, उतारा पाठांतर, कथाकथन या स्पर्धांमध्ये ३० शाळांमधील सुमारे ३०० विद्यार्थी-विद्यार्थिनींनी भाग घेतला. दि. ११ फेब्रुवारी रोजी झालेल्या बक्षिस समारंभात ३६ स्पर्धकांना पारितोषिके दिली.

**⁕ या वर्षभरात घेतलेले अन्य कार्यक्रम पुढीलप्रमाणे :**

- छात्र प्रबोधन, एकता साहित्य प्रेमी, साप्ताहिक विवेकनेही एका लेखमालेद्वारा निवेदितांच्या चरित्रावर प्रकाश टाकण्याचे कार्य केले.
- सौ. संगिता कानडे यांनी वर्षभरात १२ किर्तने केली. वा. सुरुचि पांडे यांनी पंधरा व्याख्याने दिली. याशिवाय काही व्यक्तींचीही पंधरा व्याख्याने झाली.
- ग्राहकपेठेने भगिनी निवेदितांचे चित्र असणाऱ्या वह्या निवेदिता विचारांसह छापल्या.
- श्रीमती उषाताई कुलकर्णी यांनी पुण्यात तीन ठिकाणी तर पूर्वांचलात अकरा ठिकाणी भगिनी निवेदिता यांचे चरित्र स्वरचित गीतांच्या आणि परिणामकारक निवेदनाच्या माध्यमातून सादर केले.

**⁕ निवेदिता चरित्रावरील पुढील पुस्तके या वर्षभरात समितीच्या वतीने प्रकाशित करण्यात आली**

१) 'समर्पिता निवेदिता' : श्रीमती अंजली गोखले

२) 'कर्मयोगिनी निवेदिता : श्री. सुरेश शास्त्री

३) 'भगिनी निवेदिता प्रश्नमंजूषा' : प्रा. माधवी कवी

**विशेष : राष्ट्रसेविका समितीने 'समर्पिता निवेदिता' हे पुस्तक ब्रेल लिपीमध्ये छापले.**

# ज्ञान प्रबोधिनीचे सन्माननीय देणगीदार
## (२०१० - २०११)

**(सर्व देणगीदारांबद्दल कृतज्ञता आहे. येथे उल्लेख रु. १,०००/- च्या पुढच्या देणग्यांचा केला आहे.)**

❀ ₹ ५००/- पर्यंतच्या देणग्यांची एकूण वार्षिक रक्कम ₹ १२,२६,१७७/-

❀ ₹ ५०१/- ते रु. १,०००/- पर्यंतच्या देणगीदारांची एकूण रक्कम ₹ २,५९,२७६/-

**❀ ₹ १००१/- प्रत्येकी**

१) श्री. संजीव गोखले
२) श्री. बी. आर. सबनीस
३) श्रीमती अश्विनी मुंडे
४) श्री. प्रवीण यादव
५) श्री. उदय हर्षे
६) श्री. मिलिंद साठे
७) श्री. सुधीर लवाटे
८) श्री. कृष्णाजी देवधर
९) श्री. मंदार आपटे
१०) श्रीमती स्मिता बेडेकर
११) श्रीमती अमिता पणशीकर
१२) श्री. मनोहर जोशी
१३) श्री. प्रभाकर पाध्ये
१४) श्री. महेश फणसे
१५) श्री. आमोद वर्तक
१६) श्री. अविनाश खांडकर
१७) श्री. नितीन कुलकर्णी
१८) श्रीमती देवयानी भावे
१९) श्री. विद्याधर पुरंदरे
२०) श्रीमती मालती पेंढारकर
२१) श्री. स्वप्नील कमलाकर
२२) श्री. शशांक धर्माधिकारी
२३) श्री. आदित्य किर्पेकर
२४) श्री. प्रमोद वकील
२५) श्रीमती नंदा काणे
२६) श्री. गोपाळ काळे
२७) श्री. यशवंत लिमये
२८) श्री. सचिंद्र जोशी
२९) श्री.अरुण फडणीस
३०) श्री. आशीष कुलकर्णी
३१) श्री. संदीप पानट
३२) श्री. कौस्तुभ दाते
३३) श्रीमती क्षमा साठे
३४) श्रीमती अस्मिता बंगाळे
३५) श्री.प्रकाश वैद्य
३६) श्री. अरूण गोखले
३७) श्री. गिरीश कुलकर्णी
३८) श्री. आर. पाठक
३९) श्रीमती सुषमा कपूर
४०) श्री. मिलिंद गडकरी
४१) श्री. विनोद आठले
४२) श्री. कुमुदिनी पुरंदरे
४३) श्री. संजय दंडवते
४४) श्री. प्रदीप देव
४५) श्री.अनिरुद्ध गोडबोले
४६) श्री. अभय जावडेकर
४७) श्री. अजित बडवे
४८) श्री. उदय पाटणकर
४९) श्रीमती क्रांती दयाळ
५०) श्री. निलेश ताम्हाणे
५१) श्री. अमित बेल्हेकर
५२) श्री. सुभाष सोमण
५३) श्री. धनंजय विध्वंस
५४) श्री. शंतनू निगवेकर
५५) श्री.भालचंद्र देव
५६) श्री. उमेश अभ्यंकर
५७) श्री. रविंद्र पालेकर
५८) श्रीमती रेखा देशपांडे
५९) श्रीमती सुनिता शेळके
६०) श्री. राम देऊसकर
६१) श्री. जयंत कुलकर्णी
६२) श्री. विश्वास सबनीस
६३) श्री. अशोक गोसावी
६४) श्री.महेश पटवर्धन
६५) श्री. संदीप शिवांगी
६६) श्री. विनीत माझगांवकर
६७) श्री. केळकर
६८) श्री. विजय अत्रे
६९) श्री. प्रदीप देशपांडे
७०) श्री. मनोहर ओक
७१) श्री. भालचंद्र बर्वे
७२) श्री. आनंद नवजुंदाईल
७३) श्री. पद्माकर दिसकळकर
७४) श्री. प्रभाकर प्रभुदेसाई
७५) राणी लक्ष्मीबाई गर्ल्स सैनिक स्कूल

**❀ ₹ १००१/- ते २,०००/-**

१) श्री. निरंजनघाटपांडे १,०५१/-
२) श्रीमती चित्रा जोगळेकर १,०५१/-
३) श्रीमती वृषाली जोगळेकर १,०५१/-
४) श्रीमती सुनंदा चितळे १,०५१/-
५) गणेशोत्सव देणगी १,१००/-
६) श्री. सतीशचंद्र गुप्ता १,१००/-
७) श्री. अविनाश दाते १,१००/-
८) श्री. वसंत कुलकर्णी १,१११/-
९) श्री. अरुण शिंगणापूरकर १,१११/-
१०) श्रीमती कुमुदिनी केळकर १,१११/-
११) श्री. अरविंद चांदोरकर १,१११/-
१२) श्री. सुबोध असोटकर १,२००/-
१३) श्री. संजय कुंटे १,२१०/-
१४) सौ. ज्योती दीक्षित १,४७६/-
१५) श्री. श्रीपाद कुलकर्णी १,५००/-
१६) श्रीमती सीमा अटेकर १, ५००/-
१७) श्री. चैतन्य कुलकर्णी १,५००/-
१८) श्री. जे. एम्. भागवत १,५००/-
१९) श्रीमती अमिता सहस्रबुद्धे १,५००/-
२०) श्री. देवेंद्र पाटोळे १,५००/-
२१) श्री. दत्तोबा करंजावणे १, ५००/-
२२) श्री. अनंत मराठे १,५००/-
२३) श्री. नरेंद्र इनामदार १,५००/-
२४) श्री. महेश गोखले १,५०१/-
२५) श्री. विक्रम चाफेकर १,६००/-

❀ ₹ २,०००/- प्रत्येकी

| | | | |
|---|---|---|---|
| १) श्री. एम्. डी. फडके | २) श्री. मयुरेश कुलकर्णी | ३) श्री. ओमकार मराठे | ४) श्री. किशोर पंडित |
| ५) श्री. चंद्रशेखर चितळे | ६) श्री. रविंद्र महाजन | ७) श्री. योगेश केतकर | ८) ओम इंजिनीअर्स |
| ९) श्री. अजित बापट | १०) श्री. श्रीकृष्ण चांदवडकर | ११) लक्ष्मी नारायण संस्था | १२) श्री. मदनमोहन गोखले |
| १३) श्रीमती संध्या गजेंद्रगडकर | १४) श्री. मिलिंद कुलकर्णी | १५) श्रीमती स्मिता चावरे | १६) श्रीमती दिनेश कुलकर्णी |
| १७) श्रीमती चित्रा ठाणेकर | १८) श्री. अभय कुलकर्णी | १९) श्री. भिवाजी पराड | २०) श्री. संजय चावरे |
| २१) श्रीमती राजश्री चावरे | २२) श्रीमती सोनल जांभेकर | २३) श्रीमती स्मिता धर्माधिकारी | २४) श्री. संजीव करंदीकर |
| २५) श्रीमती सरोज पेठे | २६) श्री. वैभव बर्वे | २७) श्रीमती संजीव गुमास्ते | २८) श्री. केदार सहस्रबुद्धे |
| २९) श्रीमती सुनंदा पेंडसे | ३०) श्री. अनिल जोशी | ३१) श्री. विश्वास हर्षे | ३२) श्री. चंद्रकांत चावरे |
| ३३) श्रीमती अनिता कौलगुड | ३४) श्रीमती कल्याणी नासेरी | ३५) श्रीमती अनिता देशमुख | ३६) श्री. ब्रिजेश लुथ्रा |
| ३७) प्रतिमा ऑफसेट | ३८) श्रीमती वैद्य | ३९) श्रीमती सीमा भाकरे | ४०) श्रीमती मंजिरी जोशी |
| ४१) श्री. निर्भय करंदीकर | ४२) श्री. सुमीत गोडबोल | ४३) सहस्रबुद्धे एक्झि. ट्रस्ट प्रा. लि. | |

❀ ₹ २,००१/- ते ३,०००/-

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १) इन्शुरन्स इन्फो सि. | २,००१/- | २) श्री. सुनील रेगे | २,००१/- | ३) श्री. सुबोध गोवर्धन | २,००१/- |
| ४) श्रीमती पद्मजा भोसले | २,००१/- | ५) श्री. चंद्रशेखर वाचासुंदर | २,००१/- | ६) श्री. संजीव अक्षीकर | २,००१/- |
| ७) श्री. विद्यासागर पी. | २,००१/- | ८) श्री. गिरीश मुजुमदार | २,००५/- | ९) श्री. दीपक कुलकर्णी | २,०५१/- |
| १०) श्रीमती कुंदा डोळे | २,१००/- | ११) श्रीमती वसुधा पंतसचीव | २,१००/- | १२) श्री. चंद्रशेखर आझाद | २,१११/- |
| १३) श्रीमती सुप्रिया शिलेदार | २,४००/- | १४) सौ. चित्रा भालेराव | २,५००/- | १५) मित्र मंडळ सोसायटी | २,५००/- |
| १६) श्री. योगेश कुलकर्णी | २,५००/- | १७) श्री. रविंद्र आपटे | २,५००/- | १८) श्रीमती ऋतुजा कुलकर्णी | २,५००/- |
| १९) श्रीमती संध्या गोखले | २,५०१/- | २०) श्रीमती लता दातार | २,६००/- | २१) श्री. मधुकर गोगटे | २, ७५०/- |

❀ ₹ ३,०००/- ते ५,०००/-

| | | | |
|---|---|---|---|
| १) श्री. अद्वैत कुलकर्णी | २) श्री. विनीत बेर्डे | ३) श्री. नागेश साने | ४) श्री. संजय रुईकर |
| ५) श्री. अजीत परांजपे | ६) श्री. अभय लिमये | ७) श्री. अजीत शेटे | ८) श्री. अतुल धारप |
| ९) श्री. रत्नाकर जावडेकर | १०) श्री. चेतन कारखानीस | ११) श्री. नरेंद्र तांबे | १२) बडवे इंजिनिअरिंग प्रा. लि. |
| १३) श्री. निखील कात्रे | १४) श्री. बळवंत बापट | १५) श्री. अच्युत दामले | १६) श्री. सागर सुरगा |
| १७) श्री. संजय जोशी | १८) परीमल ट्रस्ट | १९) श्री. कुलदीप खुशु | २०) श्री. अभय लिमये |
| २१) मुंजाबा बोळ मित्र मंडळ ४,५००/- | | २२) श्री. रमाकांत भुतडा ४,५००/- | |

❀ ₹ ५,०००/- ते ६,०००/-

| | | | |
|---|---|---|---|
| १) श्री. एस्. एस्. जोशी | २) श्रीमती स्नेहल वैद्य | ३) श्री. योगेश पाठक | ४) श्रीमती इंदुमती हुद्दार |
| ५) श्री. भूषण थिटे | ६) श्री. निरंजन कुलकर्णी | ७) श्री. विजय कोळेकर | ८) श्री. प्रसाद भिडे |
| ९) श्री. दिवाकर भिडे | १०) श्रीमती राखी भुतडा | ११) गुरुपौर्णिमा | १२) श्रीमती शामली नारप्पनवर |
| १३) डॉ. अरविंद पटेल | १४) श्रीमती वंदना शेट्टे | १५) शिवनेरी मित्र मंडळ | १६) श्री. अमोल पाटील |
| १७) श्री. प्रवीण सावंत | १८) लुंकड ग्रीन लँड | १९) सदाशिव पेठ मित्र मंडळ | २०) श्री. रविंद्र गोरे |
| २१) श्री. चेतन घोलप | २२) श्री. महेश पाटणकर | २३) सौ. उषा देव | २४) श्री. अनंत सेवक |
| २५) श्री. तेजस बेरी | २६) सौ. हिमानी अर्जुनवाडकर | २७) डॉ. आनंद राव | २८) श्रीमती स्मिता आठवले |
| २९) श्रीमती उषा वाटवे | ३०) श्री. अच्युत हिरवे | ३१) श्री. गणेश जाधव | ३२) श्री. अभिजीत हडप |

३३) श्री. नितीन सावंत
३४) श्री. चेतन पटवर्धन
३५) श्रीमती सुरेखा भट
३६) श्री. सुरेश जोशी
३७) श्रीमती शमिका केणेकर
३८) श्री. हृषीकेश देशमुख
३९) श्री. मिलिंद पाध्ये
४०) गुरुपौर्णिमा
४१) श्री. श्रीराम करंदीकर
४२) श्री. हरी रानडे
४३) श्री. जयंत अडवाणी
४४)श्रीमती अवंतिका चित्रे
४५) श्री. देगवेकर
४६) श्री. सारंग लागू
४७) श्री. संदिप वेलिंग
४८)श्री. अमर परांजपे ५,२००/-
४९) विठ्ठल मंदिर ५,५००/-
५०) श्री. वसंत खळदकर ५,५००/-
५१) स्त्री शक्ती प्रकल्प ५,५००/-
५२) डॉ. शुभांगी काटकर ६,०००/-
५३) हिमाली सोसायटी ६,०००/-
५४) डॉ. संतोष काकडे ६,०००/-
५५) श्री. उदय कुलकर्णी ६,०००/-
५६) श्री. सदाशिव भावे ६,०००/-
५७) श्री. अतुल नेने ६,०००/-

### ₹ ७,०००/- ते ₹ ९,००० पर्यंत

१) श्री. अभिजीत मराठे
२) बालाजी मित्र मंडळ
३) श्री. सारंग गोसावी
४) श्रीमती आरती देडगांवकर
५) श्री. सुबोध पटवर्धन
६) कुबेर कॉलनी
७) श्री एन्टरप्रायझेस्
८) श्रीमती वनिता पटवर्धन
९) धनुर्विहार मित्र मंडळ
१०) श्री. अमित बागाईतकर

### ₹ १०,०००/- प्रत्येकी

१) श्री. रघुनाथ खाडिलकर
२) श्री. रविंद्र भोसले
३) श्री. विनायक हळबे
४) श्री. श्रीरंग सुपनेकर
५) श्री. शिरीष जोशी
६) श्री. श्रीकांत कुलकर्णी
७) श्री. महेश आठवले
८) डॉ. संदीप पारखी
९) श्री. उदय पळसुले
१०) श्री. किशोर पाटील
११) डॉ. नितीन दाणी
१२) श्री. विनायक गोरे
१३) सौ. गौरी कापरे
१४) श्रीमती अक्षता मदाने
१५) श्री. जयंत पाटील
१६) श्री. बिपीनचंद्र भागवत
१७) डॉ. सुभाषचंद्र भागवत
१८) श्री. कौस्तुभ गाडगीळ
१९) श्री. प्रदीप कुलकर्णी
२०) श्री. शिरीष देशमुख
२१) श्री. विक्रम कामठे
२२) श्री. किरण आवटे
२३) श्री. रवि आवटे
२४) श्री. प्रशांत माने
२५) श्री. राहूल नागरे
२६) श्री. अमित गाडगीळ
२७) श्री. विनीत दंडवते
२८) श्री. मकरंद गद्रे
२९) श्री. आर्. एम्. सप्रे
३०) आझाद हिंद मंडळ
३१) विहार मित्र मंडळ
३२) आझाद मित्र मंडळ
३३) अशोक मित्र मंडळ
३४) श्री. प्रसाद पुरंदरे
३५) श्रीमती अनिता जोशी
३६) श्री. मिलिंद काळे
३७) श्री. सुदर्शन हसबनीस
३८) खडकी मित्र मंडळ
३९) बृयंगन सोसायटी
४०) ग्राहक पेठ
४१) श्री. अजित कानिटकर
४२) श्रीमती सुधा मोने
४३) श्रीमती स्नेहल दाते
४४) श्री. कृष्णा अर्जुनवाडकर
४५)श्री. मिहिर अर्जुनवाडकर
४६) श्री. किरण पोतदार
४७) श्री. अनिरुद्ध मांडके
४८) श्री. सदाशिव आपटे
४९) श्री. अमरेंद्र भट
५०)श्रीमती कल्पना अय्यर
५१) सेवक सहकारी पतसंस्था
५२) श्री. विद्याधर सहस्रबुद्धे

### ₹ १०,००१/- ते ₹ २०,०००/-

१) श्री. आदित्य सायगांवकर १०,००१/-
२) श्री. संदीप राक्षे १०,००१/-
३) श्री. विवेक कुलकर्णी १०,२००/-
४) श्री. अतुल एदलाबादकर ११,०००/-
५) श्रीमती अर्चना सामक ११,०००/-
६) श्री. विकास बनसोड ११,०००/-
७) क्रांती उत्सव मित्र मंडळ ११,०००/-
८) रामकृष्ण परमहंस नगर ११,०००/-
९) श्रीमती कालिंदी वैद्य ११,०००/-
१०) कु. मनिषा बाठे ११,०००/-
११) दत्त मित्र मंडळ ११,१११/-
१२) श्री. श्रीकांत आफळे १२,०००/-
१३) डॉ. जयेश रहाळकर १२,०००/-
१४) श्री. शैलेंद्र म्हसकर १२,०००/-
१५) श्री. शशांकचांदोरकर १२,५००/-
१६) श्री. रघुनाथ खाडीलकर १२,५००/-
१७) श्री. संदीप पारखी १२,५००/-
१८) डॉ. विनायकदेसुरकर १२,०००/-
१९) डॉ. स्मिता आठवले १५,०००/-
२०) श्री. शैलेंद्र जोशी १५,०००/-
२१) श्री. मकरंद सुपनेकर १५,०००/-
२२) श्री. आनंद आगाशे १५,०००/-
२३) श्री. अमित गद्रे १५,०००/-
२४) श्री. शशांक बिवलकर १५,०००/-
२५) मिनीलेक प्रा. लि. १५,०००/-
२६) श्रीमती वैजयंती वैद्य १५,०००/-
२७) श्री. चिन्मय कानिटकर १५,०००/-
२८) श्री. विजय देशपांडे १५,०००/-
२९) श्री. नितीन बर्वे १७,०००/-
३०) श्री. प्रफुल्ल देशमुख १७,०००/-

| | | |
|---|---|---|
| ३१) श्री. श्रीकांत कुलकर्णी १७,५००/- | ३२) किशोरी विकास १७,५१० /- | ३३) यश इव्हेंट मॅनेजमेंट १८,०००/- |
| ३४) क्रांती उत्सव तरुण मंडळ १८,०००/- | ३५) खंडोबा मित्र मंडळ १८,०००/- | ३६) श्री. भूषण वाणी २०,०००/- |
| ३७) श्रीमती स्नेहल शहा २०,०००/- | ३८) श्री. मिलिंद पटवर्धन २०,०००/- | ३९) पद्मावती मित्र मंडळ २०,०००/- |
| ४०) श्री. कमलाकर वैद्य २०,०००/- | ४१) श्रीमती शुभांगी नित्सुरे २०,०००/- | ४२) कु. धनश्री बोधनी २०,०००/- |
| ४३) श्री. सच्चिदानंद कुलकर्णी २०,०००/- | ४४) नरवीर तानाजी मित्र मंडळ २०,०००/- | |

### ❀ ₹ २०,००१/- ते ३०,०००/-

| | | |
|---|---|---|
| १) श्री. नंदकुमार कानडे २०,००२/- | २) श्री. समीर ताटके २०,००५/- | ३) श्री. सतीश जातेगांवकर २१,०००/- |
| ४) श्री. विजय कुलकर्णी २१,००१/- | ५) श्रीमती अरुणा संत २५,०००/- | ६) श्रीमती अश्विनी संत २५,०००/- |
| ७) श्री. वसंत हजरनीस २५,०००/- | ८) प्रबोधवर्धिनी २५,०००/- | ९) श्री. एम. एन जोशी २५,०००/- |
| १०) श्रीमती सविता गिजरे २५,०००/- | ११) स्थापत्य गंगोत्री २५,०००/- | १२) श्री. सदानंद दाते २५,०००/- |
| १३) ओ. एन्. जी. सी. २५,०००/- | १४) रोटरी क्लब ऑफ पुणे, मिडटाऊन २५,०००/- | १५) खजिना विहीर मित्र मंडळ २५,०००/- |
| १६) श्री. सुनील दाढे २५,००१/- | १७) श्री. दिलीप गुळे २५,२५०/- | |
| १८) श्री. विनय हर्डीकर २७,०००/- | १९) गुरुपौर्णिमा २७,२००/- | |

### ❀ ₹ ३०,०००/- ते ₹ ५०,०००/-

| | | |
|---|---|---|
| १) रुईया नाका मित्र मंडळ | २) डॉ. प्राची साठे | ३) श्री. उदय केळकर |
| ४) डॉ. सुरेश धायगुडे | ५) हत्ती गणपती मित्र मंडळ | ६) श्री. उपेंद्र काळे |
| ७) इनरव्हिल क्लब, पुणे ३०,५००/- | ८) श्री. अमित घैसास ३५,०००/- | ९) गुरुपौर्णिमा ३५,०००/- |
| १०) श्री. प्रशांत जोशी ३५,०००/- | ११) श्री. मयुर हरके ३८,०००/- | १२) श्रीमती प्राची हांडे ४०,०००/- |
| १३) श्री. विनायक देशपांडे ४०,५३०/- | १४) श्री. शंतनू महाजन ४६,८५१/- | १५) श्री. प्रकाश जोशी ५०,०००/- |
| १६) पर्सिसस्टंस् सिस्टीमस् ५०,०००/- | १७) श्री. अभय खेर ५०,०००/- | |

### ❀ ₹ ५०,०००/- च्या पुढील

| | | |
|---|---|---|
| १) श्री. मिलींद संत ५१,०००/- | २) श्री. श्रीकांत लिमये ५१,०००/- | ३) श्री. अजित कोटीभास्कर ७५,०००/- |

### ❀ ₹ १,००,०००/- व त्या पुढील

| | | |
|---|---|---|
| १) श्री. गजानन नेने | २) श्री. अनिरुद्ध पाटणकर | ३) डॉ. सी. डी. थत्ते |
| ४) पुणेकर विजया | ५) सुलोचना नातू ट्रस्ट | ६) श्रीमती मोहना बोडस |
| ७) डॉ.एम्. डी. भाटे | ८) सुबोधन इंजिनिअर्स (पुणे) प्रा. लि. | ९) श्री. नितीन देशपांडे |
| १०) नातू फाऊंडेशन १,०१,९१७/- | ११) श्री. विनोद नासेरी १,११,०००/- | १२) श्री. सचिन गाडगीळ १,६२,०००/- |
| १३) श्री. व्हि.एन्. दांडेकर ४,००,०००/- | १४) दि महाराष्ट्र एक्झिक्युटर ॲन्ड ट्रस्ट कं. लि. ४,९४,७७१/- | |
| १५) सौ. जेरु सेटलवाड ७,५०,०००/- | १६) श्री. सेटलवाड अनंत ६,००,०००/- | १७) सौ. काळे नंदा ६,००,०००/- |

## ✽ उपासनेची जोड हवी ✽

इतिहासाची उलटुन पाने
भविष्यवेधी कृती हवी
अभ्युदयाला परमार्थाच्या
उपासनेची जोड हवी ।। धृ. ।।

हिंदुत्वाचे पुनर्जागरण
विरक्तीतही करूणासिंचन
जेत्यांच्या उन्मत शिरावर
धर्मध्वजेचे हो आरोहण

अद्वैताच्या त्या पथिकासम
जागृत अर्पण वृत्ति हवी ।।१ ।।

निःशस्त्रांची उभवुन सेना
सत्यव्रताचे मार्ग निर्मिले
अंत्यजपूजा सार्थक मानुन
राष्ट्रशक्तिचे मर्म जाणले

त्या द्रष्ट्याचे शब्द उमगण्या
अंतःकरणा साद हवी ।।२ ।।

ध्येय एक, जरि भिन्न साधने
कोटि मनांचे बळ जागविणे
समर्थ वाणी - सहज कृतीतुन
'राष्ट्रधर्म' अवघा उलगडणे

त्या धर्माचे स्वत्व राखण्या
तेज-सत्त्व, अन् भक्ति हवी ।।३ ।।